UNIVERSAL LIBRARY
OU_192124
UNIVERSAL LIBRARY

OUP—881—5-8-74—15,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M923 M46M Accession No. M1087

Author मावळणकर, दादासाहेब.

Title मानवतेचें पाझर

This book should be returned on or before the date last marked below.

# मानवतेचे पाझर

लेखक

नामदार श्री. दादासाहेब मावळंकर

अनुवादिका

डॉ. सुमति क्षेत्रमाडे

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

( नोव्हेंबर १९५२ )

प्रकाशक :
गोविंद वामन कुलकर्णी
महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

किंमत २॥ रुपये

मुद्रक
माधव कृष्णाजी सहस्रबुद्धे
श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

# अमृत-झरे

पायाळू माणसांच्या पायांत अशी कांहींतरी एक विलक्षण शक्ति किंवा दिव्यदृष्टि असते कीं त्या योगानें त्यांना जमिनीच्या पोटांत अगदीं खोल अदृश्य स्थितींत असलेले पाण्याचे झरे दिसतात असा अद्यापहि एक समज रूढ आहे. माझ्या प्रसूतिगृहांत पायाळू बालकें जन्माला आलीं कीं न जाणो भविष्यकाळीं भारतभूमि सुजलाम् होण्यास यांपैकीं कांहींचा हातभार लागेल या श्रद्धेमुळें माझी नजर त्यांच्या पायांकडे आकृष्ट व्हायची. पण श्रद्धा ही दुधाच्या दातासारखी असते. मूल मोठं झालं कीं दुधाचे दांत आपोआप पडून जातात. तसंच अनुभवानें नि विचारशक्तीनें मनाची पातळी वाढली कीं कांहीं कांहीं श्रद्धा आपोआप गळून पडतात. पायाळू माणसाविषयींची ही श्रद्धा अशापैकींच आहे. माणसाच्या पायांत अशी दिव्यशक्ति नसली तरी कांहीं माणसांत अशी कांहींतरी शक्ति असते कीं त्यांना, " माणसांत " जमा नसलेल्या, अमानुषतेचे शिक्के मिळालेल्या, पाषाणा-समान मानले गेलेल्या पापी चांडाळ माणसांतहि ' मानवतेचे झरे ' दिसतात. हे झरे ज्या शक्तीमुळें दिसतात ती शक्ति पायांत नसते, डोक्यांतहि नसते, हृदयांत असते. या दिव्यदृष्टीचें नांव " सहृदयता—माणसाला ' माणूस ' म्हणून ओळखण्याची जाणीव ! "

श्री. दादासाहेब मावळंकर यांचें " मानवतानां झरणां " हें मूळ गुजराथी पुस्तक जेव्हां मीं वाचलं तेव्हां माणुसकीची ही जाणीव, ही सहृदयता त्यांच्या कथा—कथांतून, पाना—पानांतून प्रकट झालेली दिसली. एका नव्या जगाचं—समाजांतील उपेक्षित लोकांच्या अंतरंगाचं खरंखुरं दर्शन झालं. मन भारावून गेलं. समाजानें झिडकारलेल्या या फत्तरांच्या पोटीं अखंड झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्यांचं दर्शन मराठी वाचकांना व्हावं अशीहि इच्छा मूळ गुजराथी पुस्तक वाचतांना झाली; आणि जेव्हां या पुस्तकाचा मराठी अनुवाद करण्याचं काम माझ्याकडे सोंपविण्यांत आलं तेव्हां तें काम मीं मोठ्या आनंदानें पत्करलं.

प्रस्तुत पुस्तकांतल्या कथा या काल्पनिक कथा नाहींत. या प्रत्यक्ष जीवनकथा आहेत. लेखक महाशयांच्या अनुभवाचे हे अमोल बोल आहेत. विविध कथांतून विविध हकीकती आहेत, विविध नायक आहेत, पण "कर्ता करविता" खुद्द लेखक महाशय आहेत. प्रत्येक कथेंत त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्याचं, त्यांच्या विविध भावनांचं स्पष्ट प्रतिबिंब पडलेलं आहे. "सत्यापरता नाहीं धर्म!" हें महान तत्त्व या 'कथामंदिरा'चा पाया आहे. समता, सेवा-वृत्ति, आंतरिक तळमळ, अखंड कार्यमग्नता हे या मंदिराचे सुंदर संगमरवरी खांब आहेत. 'सर्वांठायीं प्रेम' हा त्याचा सुवर्णकळस आहे. पूजास्थानीं प्रत्यक्ष मानवतेची मूर्ति आहे.

सत्य बोलण्यानें किती फायदा होतो याचा अनुभव प्रत्यक्ष मृत्यूच्या दारांत उभे राहून, कानजी, ब्रह्मानंद साधु, डाही अन् क्षणिक क्रोधाच्या भरांत पत्नीला मारणारा तो प्रेमळ पति या मंडळींनीं घेतला. त्यांच्या बाबतींत सत्य-वचन हें संजीवनीसारखं ठरलं. अन् सुरवातीपासूनच जर सत्यवचनाचा मार्ग चोखाळला असता तर 'महमद मूसा', 'शिवराम', 'शहाजादा', वगैरे मंडळीच्या बाबतींतहि तें संजीवनीसारखंच ठरलं असतं. पण—पण आरोपीला पिंजऱ्यांत उभं करतांना ज्या पद्धतीनें त्यांना "गुन्ह्यासंबंधीं मला कांहीं माहीत नाहीं. मीं केला नाहीं." असं पिंजऱ्यांतल्या पोपटासारखं पढविण्यांत येतं त्या पद्धतीनें गुन्हेगार सुटण्याऐवजीं त्याच्या गळ्याला असा फांस लागतो. वेळ टळून गेल्यामुळें सत्यकथनाचा ऐहिक फायदा या उपरोक्त मंडळींना मिळाला नाहीं हें खरं. पण आत्मिक लाभ जरूर झाला. सत्यसामर्थ्यामुळेंच मृत्यूवर ते विजय मिळवूं शकले. शांत चित्तानें, हंसतमुखानें फांशीवर चढूं शकले. सुरवातीला मृत्यूच्या भीतीनें ढसढसां रडणारा महमद फांशी जाण्याच्या दिवशीं सारी रात्र ईश्वरचिंतनांत घालवून पहाटे पहारेकऱ्यांना म्हणतो, "आंघोळीला पाणी मिळेल का? अल्लाच्या दरबारांत जायची वेळ होत आली आहे." जणूं कांहीं एकादा आनंदाचा मंगल प्रसंगच जीवनांत घडणार आहे! केवढा हृदयपालट हा!! हा हृदयपालट जेवढा अलौकिक, तेवढीच एका खुनी, अशिक्षित, संस्कारहीन सामान्य माणसाच्या हृदयांत हा असा अलौकिक बदल घडवून आणणारी व्यक्तिहि असामान्य म्हटली पाहिजे. ग्रंथ

एका दिवसांत लिहिला जात नाहीं. हृदयपालटहि एका दिवसांत करतां येत नाहीं. अनेकांनीं आपल्या कारागृहवासदरम्यान महान ग्रंथ लिहिले. श्री. दादासाहेबांनीं वीस महिन्यांच्या तिथल्या आपल्या वास्तव्यांत चालते बोलते सजीव महान् अमर ग्रंथ बनवले. त्यासाठीं अपार श्रम घेतले.

त्यांच्या स्वभावाच्या विविध छटा या पुस्तकांत पहावयास मिळतात. मोती झेणा बडोद्याच्या तुरुंगांत असतांना, श्री. दादासाहेब कांहीं कामानिमित्त जेव्हां जेव्हां बडोद्याला जात तेव्हां तुरुंगांत मोती झेण्याला भेटायला जात, विचारपूस करीत, त्याला धीर देत. समाजांत अतिश्रेष्ठपदीं असणाऱ्या एका प्रतिष्ठित महान व्यक्तीनें एका अट्टल दरोडेखोराला इतक्या अगत्यानें भेटायला जाणं, इतकी आपुलकी दाखवणं-अशीं दृश्यें समाजांत उंबराच्या फुलांसारखीं दुर्मिळ असतात. मोती झेणा तुरुंगांतून सुटल्याबरोबर घरीं वणसोलला न जातां सरळ श्री. दादासाहेबांकडे येतो. पंचवीस वर्षांच्या दीर्घकालानंतरहि आपल्या एकुलत्या एक पुत्राला नि पत्नीला भेटण्याआधीं श्री. दादासाहेबांना भेटण्याची त्याला जास्त ओढ लागली होती. यांत असीम भक्ति होती हें निःसंशय! देव देवळांत नसून देवळाबाहेरच असतात. पण ही ओढ नुसत्या भक्तीची नव्हती. तसं असतं तर त्यांचं दर्शन घेऊन तो लगेच घरीं गेला असता. पण भक्तीइतकीच दुसरी एक भावना त्यांत तीव्रतेनें वसत होती. ती भावना श्री. दादासाहेबांच्या उद्गारांत प्रतीत होते—

"मोतीला आम्ही सर्वजण ओळखत होतों. मोती आला तेव्हां आमच्या कुटुंबांतलाच कुणीतरी यावा इतका आम्हां सर्वांना आनंद झाला." समतेचं, विश्वबंधुत्वाचं हें किती दुर्मिळ दृश्य आहे!!

अशीं अनेक दुर्मिळ दृश्यें यांत जागोजागीं विखुरलेलीं आहेत.

या पुस्तकाचा अनुवाद पूर्ण केल्यानंतर थोड्या दिवसांनीं श्री. दादासाहेबांना प्रत्यक्ष भेटण्याचा आयुष्यांत प्रथमच सुयोग आला. गेल्या मे महिन्यांत (मे १९५२) मुंबईला कांहीं कामानिमित्त ते आले असतां त्यांची भेट झाली, अल्पपरिचय झाला. असं म्हणतात कीं मोठ्या माणसांचा

मोठेपणा दुरून जितका आदरणीय, तेजोमय वाटतो तितका तो त्यांच्या-जवळ गेल्यावर वाटत नाहीं. त्यांच्या सान्निध्यानें त्या मोठेपणांतलं तेज फिकं वाटूं लागतं. श्री. दादासाहेबांच्या बाबतींत तसं वाटलं नाहीं. हिमालयाची भव्यता, विशालता, विविध मनोरम छटा जवळ जातांच अधिक स्पष्ट होतात. श्री. दादासाहेबांच्या स्वभावाच्या विविध छटा मीं प्रस्तुत पुस्तकांत पाहिल्या त्याच छटा त्यांच्या प्रत्यक्ष परिचयांत अधिक प्रकर्षानें दिसून आल्या. "बोले तैसा चाले" अशी ही एक व्यक्ति आहे अन् म्हणूनच श्रेष्ठ नि आदरणीय आहे हें दोन दिवसांच्या त्यांच्या अल्प सहवासांत कळून आलं. त्यांच्याजवळ विविध अनुभवांचा अमाप सांठा आहे. ते खूप बोलके आहेत. विविध अनुभव सांगतांना ते इतके समरस होतात कीं ऐकणारा मंत्रमुग्ध होतो. दोन दिवसांत हा मीं अनुभव घेतला. त्यांच्या तोंडून ब-याच सत्यकथा ऐकल्या.

प्रस्तुत पुस्तकांत एका नवीन जगाचं त्यांनीं दर्शन घडवलं आहे, काळ्या कुळकुळीत कठीण कातळाखालीं मधुर पाण्याचा झरा सांपडतो त्याप्रमाणें फत्तरासमान मानले गेलेल्या पापी, क्रूर, माणुसकीहीन म्हणून आपण धिक्कारिलेल्या लोकांच्या हृदयांतहि खोल 'मानवतेचे मधुर झरे' अखंड झुळझुळ वाहात असतात. त्या अमृत–झ-यांचा शोध श्री. दादासाहेबांनीं लावला. ह्या पुस्तकाची अमोल वाङ्मयांतच गणना होईल. यापुढें अशाच दुस-या कथा आपणांस वाचावयास मिळतील अशी आशा आहे.

कोल्हापूर
३।११।'५२

– सुमति क्षेत्रमाडे

# प्रयोजन

( मूळ गुजरातीवरून—आवश्यकतेप्रमाणें फेरफार करून )

या पुस्तकांत वर्णिलेला प्रत्येक प्रसंग एकेक सत्यकथा आहे. लेखकाच्या कल्पनेनें भरलेले रंग यांत आढळणार नाहींत. संवादांतील भाषा त्यावेळची जशीच्या तशी नाहीं पण संवादाचा मथितार्थ शंभर टक्के खरा आहे.

या गोष्टी लिहिण्याची प्रेरणा मला कशी झाली ? मुख्य हेतू तर अर्थात् आत्मसंतोष. गेले दिवस एकवार न्याहाळून गत आयुष्याचें स्मरण करावें आणि अशा प्रकारें त्याच जीवनाचा पुनः अनुभव घेण्यांत एक विशिष्ट स्वरूपाचा आनंद असतो. आत्मकथा लिहिण्यांत प्रायः हाच हेतू असतो. स्वतःची प्रसिद्धि करावी; अगर लोकांना उपदेशात्मक गोष्टी सांगाव्यात; किंवा सुंदर भाषेनें नटविलेलें साहित्य निर्माण करावें हा आत्मकथेचा हेतू असत नाहीं. पण या सर्व गोष्टींचा ठसा आत्मकथेवर—नकळत कां होईना—पण उमटतो हें स्वाभाविक होय.

बऱ्याच वर्षांपासून मला वाटतें कीं मीं आपली जीवनकथा लिहून काढावी. आत्मकथा लिहिण्याची जाणीव होण्यालाहि असेंच कारण घडलें. आमच्या घराण्याचा इतिहास लिहिण्याचें काम आमच्या आप्तमंडळींतील कांहीं श्रेष्ठ व व्यासंगी मंडळींनीं हातीं घेतलें व माझ्या शाखेची सर्व माहिती त्यांनीं मजकडून मागितली. त्यावेळीं वडिलांची अगर चुलत्यांची किंवा आजोबांची एकूण माहिती मला फारच कमी होती. उपलब्ध असलेले जुने कागदपत्र अगर मातोश्रींनीं किंवा आजीनें सांगितलेली हकीगत हींच काय तीं माझीं साधनें. त्या अनुभवावरून मला वाटतें कीं इतिहासाचें साधन म्हणून आणि भावी पिढीस उपयोग व्हावा या दृष्टीनें प्रत्येकानें आपआपली जीवनकथा लिहून काढली पाहिजे. तसें करण्याची संधि मला माझ्या १९४०-४१ व १९४२-४४ च्या बंदिवासांत प्राप्त झाली. तेथें मीं जीवनांतील लहानथोर प्रसंगांचीं कांहीं टांचणें केलीं पण त्यावेळची सारी माहिती १९२२ पर्यंतच्याच जीवनाची होती. काम तेथवर येऊन थांबलें तें कांहीं पुढें हाललें नाहीं !

त्या प्रसंगाच्या अनुरोधानेंच १९४२–४४ मध्यें मी साबरमती तुरुंगांत असतांना आलेले तेथील अनुभव लिहून ठेवावेत असा विचार चालला होता. ता. १० मार्च १९४४ रोजीं सुटका झाली तेव्हांपासून हें मनांत घोळत असे. पण नाना व्यवधानांत गुंतल्यानें या संकल्पाला मूर्तस्वरूप देण्यास सवड होईना. आत्मचरित्राचें पर्यवसान या थोडया सत्यकथा लिहिण्यांत कसें झालें ? या प्रश्नाला थोडी पूर्व-भूमिका आहे. येथील एका जुन्या वृत्तपत्रसंस्थेचा मी अध्यक्ष आहें. "प्रजाबंधू" नांवाचें साप्ताहिक गेले ५२ वर्षांपासून व 'गुजरात समाचार' नांवाचें दैनिक गेले सुमारें २० वर्षांपासून या संस्थेमार्फत निघत असतें. साप्ताहिकाचे दिवाळी अंक गेले कित्येक वर्षें निघत असतात. प्रजाबंधूचे संपादक महाशयांचा दरवर्षीं ससेमिरा लागावयाचा कीं, "येत्या दिवाळी अंकासाठीं कांहींतरी लेख द्या." "मी कामें बरींच करतों पण लेख लिहिण्याला–म्हणजे जें वाचण्यांत लोकांस बोध मिळून गोडी वाटेल असें–माझेजवळ नाहीं विद्वत्ता, भाषाज्ञान वगैरे कांहींहि साधनसंपत्ति ! विचार करतां वाटलें कीं वकिली अनुभवांतील व तुरुंगांतील अनुभवांच्या गोष्टी घ्याव्यात, म्हणजे सामान्य पाठांतराचें किंवा वाचनाचें माझें अज्ञानहि नडणार नाहीं, व अनायासें आत्मचरित्रहि भाग लिहिणें होईल. म्हणून दिवाळी अंकासाठीं एक एक गोष्ट लिहीत गेलों. त्यांतील कांहीं आपल्यास आवडल्याचें मंडळींनीं सांगितलें त्यामुळें गोष्टीरूपानें अनुभव देण्यास मला उत्तेजन मिळालें.

पुढें गुदस्ता माझ्या मातोश्री पक्षाघातानें आजारी पडल्यामुळें मी पार्लमेंट बैठकीसाठीं दिल्लीस न जातां ३–३।। महिने अमदाबादेसच त्यांचेजवळ राहिलों होतों. तेव्हां विचार आला कीं संकल्पित लेखनकार्य रोज नियमित हातीं घ्यावें. संकल्प तर ऱ्याच प्रकारच्या लेखनांचा व फार मोठा सोडलेला आहे. पण जेवढें होईल तेवढेंच पदरांत पाडून घ्यावयाचें असें ठरवून जेलच्या गोष्टी लिहाव्या असें ठरविलें. त्यांत हेतु हाहि होता कीं थोड्या गोष्टी तयार असल्या तर दिवाळी किंवा इतर खास अंकांचे वेळीं धांवाधांव नको. रोज थोडें थोडें करतां दहा गोष्टी झाल्या. त्या लिहिण्याचे काम माझे तरुण मित्र व गुजरात युनिव्हर्सिटीचे कामांतील माझे सहकारी व

ह्लीं आमच्या एज्यूकेशन सोसायटीच्या व्यापारविषयक कॉलेजांतील प्रा. श्री. पुष्कर चेंदरवारकर हे नियमित रोज येऊन करीत असत. हे साहित्यिक, खादीधारी, भावनाशील व प्रेमळ स्वभावाचे आहेत.

दहा गोष्टी झाल्यावर ते म्हणाले, 'दादासाहेब, या गोष्टी फारच चांगल्या साहित्यांत मोडतील अशा आहेत, तर मासिकांतून तुटक तुटक देण्याऐवजीं एकदम पुस्तकरूपानें कां प्रसिद्ध करूं नयेत ?" यावर मी म्हणालों कीं, "तुम्हांस या चांगल्या वाटत असल्या व इतर बाबतींत तुमचा अभिप्राय मी स्वीकारीत असलों तरीहि माझ्याविषयींचा तुमचा आत्मीयभाव पहातां माझ्या अपत्याविषयींचा अभिप्राय कोणा स्वतंत्र साहित्यिकाकडून मिळवून प्रथम मी त्यांच्या परीक्षेंत पास झालों पाहिजे."

यावरून या गोष्टींचे परीक्षक म्हणून कोणाकडे जावें हा प्रश्न निघाला. परीक्षक तरुण हवा असाहि माझा आग्रह होता. तारुण्याची धमक, धडाडी, नवी दृष्टि ज्याला आहे त्यानें जर या गोष्टी प्रसिद्ध करण्यासारख्या आहेत असें सांगितलें तरच प्रकाशन करूं असें ठरविलें व आमच्या दोघांचीहि नजर श्री. उमाशंकर जोशी–ख्यातनाम साहित्यिक, 'संस्कृति' मासिकाचे संपादक–यांचेवर गेली. त्यांना विनंति केली; त्यांनीं ती मान्य केली; मी त्यांच्या परीक्षेंत बऱ्याच वरच्या नंबरानें पास झालों. तेव्हां प्रस्तावना त्यांनींच लिहावी अशी विनंति केली. ती मान्य करून व आपला अमूल्य वेळ खर्चून विवेचनात्मक अशी मार्मिक व सुंदर प्रस्तावना लिहिली; व गुन्हे आणि त्यांची उत्पत्ति व त्यासंबंधीं समाजाचें कर्तव्य या समाजास स्पर्शणाऱ्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाची सांगोपांग चर्चा केली म्हणून त्या प्रस्तावनेचें मराठी रूपान्तर पुस्तकाचे शेवटीं स्वतंत्र परिशिष्ट म्हणून दिलें आहे.

श्री. पुष्कर यांनीं आणखीहि ख्यातनाम व कसलेल्या गुजराथी साहित्यिकांचे अभिप्राय मागविले व ते त्या सर्वांनीं मोठ्या आस्थेनें दिले तेहि गुजराती मूळ पुस्तकांत देणें प्राप्तच झालें. पण ते सर्व येथें देण्याची जरूर नसल्यामुळें दिले नाहींत.

गुजराती वाचकांनीं पुस्तकाचें ठीक ठीक स्वागत केलें. तेव्हां मराठी वाचकांपुढेंहि जावें असें स्वाभाविकच वाटलें; व कांहीं मित्रांस तसें कळविलेंहि. त्यापैकीं श्री. गो. वा. कुलकर्णी यांनीं ताबडतोब हें काम हातीं घेतलें व डॉ. सुमतिबाई क्षेत्रमाडे यांनीं याचा अनुवाद तत्परतेनें पुरा केला आहे असें श्री. कुलकर्णी यांचेकडून कळल्यामुळें मला स्वाभाविकच विशेष आनंद वाटला. त्यांचा अनुवाद सुंदर अशा मराठी वेशानें वाचकांपुढें येत आहे. तो मीं तपासला आहे व म्हणून त्यांत राहिलेल्या किंवा आलेल्या दोषांबद्दल त्या जबाबदार नसून मीच आहें हें लक्षांत ठेवूनच वाचकांनीं व टीकाकारांनीं चालवें अशी विनंति आहे. मूळ पुस्तकांत नव्हत्या अशा तीन नवीन गोष्टी यांत आहेत. (१) उदार-चित्त बापू (२) धोरणी व धाडसी लखाजी व (३) सरकारी तंत्रांतील मानवता या गोष्टींचे प्रकार पहिल्या गोष्टींहून कांहीं वेगळे आहेत. पण एकंदर सर्वांमध्यें मानवतेचे निरनिराळे पैलू दृष्टीस पडतात असें म्हणावयास हरकत नाहीं. या थोड्या गोष्टी लिहून झाल्या खऱ्या, पण त्यांत सर्व अनुभव येऊन गेले असें अर्थात्च नाहीं.

९ ऑगस्ट १९४२ ला फारच मोठ्या प्रमाणावर आम्हां मंडळींची तुरुंगांत रवानगी झाली. त्याचा परिणाम असा झाला कीं, एवढ्या मंडळींना राजबंदी म्हणून अलग ठेवणें तुरुंगाच्या अधिकारीवर्गाला अशक्य झालें. सरकारच्या कायदेकानूंची सारी भिंत एकदम कोसळली असें कांहीं अवचित घडलें नाहीं; पण ठिकठिकाणीं त्या अभेद्य भिंतीला भगदाडें मात्र पडलीं. राजबंद्यांच्या सोयीसाठीं आणि स्वतःच्या सोयीसाठीं म्हणूनहि सामान्य कैद्यांना वेगळ्या वार्डांत व आम्हां लोकांना वेगळ्या वार्डांत अशी वर्गवारी केली.

स्वाभाविकच अशा परिस्थितींत सत्ताधारी अधिकारीवर्ग आणि कॉंग्रेसचे अनुयायी यांच्यांत अनेक खटके उडण्याचे प्रसंग येऊं लागले. अधिकाऱ्यांना स्वतः कॉंग्रेसजनाविषयीं सहानुभूति वाटे म्हणून शपथ घेण्याइतपत नियमांची अंमलबजावणी करीत. बाकी बऱ्याच बाबतींत राजकीय कैद्यांना सवलती मिळत व आंत डांबून टाकल्यानंतर त्या कैद्यांची व्यवस्था

काय, कशी करावयाची याची चर्चा करून व परस्परांत समजूत घडवून आणून तुरुंगांतला कारभार चालत असे.

या परिस्थितीचा फायदा घेऊन मी तुरुंगाच्या सुपरिंटेंडेंटनां एक दिवस विनंति केली कीं, " मला कायद्याचें थोडें ज्ञान आहे. तेव्हां मला वाटतें कीं इथें कुणाला कायद्याच्या बाबतींत कांहीं मदत लागली किंवा सल्ल्याची जरूरी भासली तर त्याचे कागदपत्र वाचून, तपासून, अर्ज करण्याबाबत वगैरे कांहीं करणें असेल तें सर्व मी करूं इच्छितों. त्यांतल्या त्यांत फांशी कैद्यांना जर मला रोज भेटतां आलें तर मी आपला फार ऋणी होईन."

समय ओळखून वागण्यांत सुपरिंटेंडेंटसाहेब फार कुशल होते. सन १९१२ मध्यें जेव्हां बंगालच्या क्रांतिकारकांना तुरुंगांत डांबण्यांत आलें आणि दहा दहा व वीस वीस वर्षांच्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या तेव्हां त्यांत कितीतरी कर्तबगार आणि भावनाशील व त्यागी तरुण होते. त्यांचा तो निर्धार व स्वदेशाविषयींची निष्ठा पाहून लॉर्ड हार्डिंजसाहेबांनीं ( त्या काळचे हिंदुस्थानचे व्हॉइसरॉय ) सरकारी अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या कीं " तुरुंगांत येणारे हे तरुण म्हणजे कांहीं गुन्हेगार कोटींतले नव्हेत, ही गोष्ट अधिकाऱ्यांनीं नीट ध्यानांत धरावी. हे असामान्य देशभक्त आहेत. आज ते सरकारचे कैदी म्हणून येथें जखडले जात आहेत. उद्यां सरकारचे सल्लागार म्हणून ते झळकतील. हें लक्षांत ठेवा आणि या मंडळींशीं अदबीनें, विवेकानें वागा." हार्डिंजसाहेबांचा हा संदेश आमच्या सुपरिंटेंडेंटसाहेबांना पूर्णपणें अवगत असावा अशा धोरणानें ते वागत असत.

सामान्य कैद्यांना भेटण्या बोलण्याची सवलत तर मला अशा प्रकारें मिळाली आणि त्याचा भरपूर उपयोग पण मीं करून घेतला. आमचें बोलणें चालणें होऊं लागलें आणि साहेब मजकुरांची खात्री झाली कीं सामान्य कैद्यांवर मी कांहीं भलतीसलती छाप पाडणार नाहीं त्यामुळें मला आणखी सवलती मिळूं लागल्या. अमूक वेळेस जा, अमक्या वेळेला परत या, अमक्यासच भेटा, याच मुद्यावर त्याचेशीं बोला इत्यादि सर्व नियम

ढिले होऊन मी वाटेल तेथें वाटेल तेव्हां जावें आणि वाटेल त्याला भेटावें, वाटेल तें त्याचेशीं बोलावें अशी प्रथा पडून मला हे अबाधित हक्कच मिळाले. तुरुंगांतल्या तुरुंगांत माझा असा अनिरुद्ध संचार सुरू झाला आणि सामान्य कैद्यांच्या जीवनांतील ओलेसुके प्रसंग मला त्यांच्यापासून समजावून घेतां आले. त्यामुळें लिहिलेले नाहींत असे समाजशास्त्र, अर्थशास्त्र, समाजजीवन वगैरे नानाविध चालतेबोलते ग्रंथ पहावयास व अभ्यासावयास मिळाले.

तुरुंगांतील सर्व कैद्याशीं संपर्क साधतां आल्यानें आणि त्यांची सेवा करण्याचें सद्भाग्य लाभल्यानें मला कुणाचें अपील लिहिण्याचें काम करावें लागलें तर कुणाची सुटका व्हावी म्हणून अर्ज लिहिण्याचें काम आलें; कुणाला औषधपाणी हवें नको तें कधीं पाही, तर कधीं इतर कांहीं जरूर पण किरकोळ बाबतींत मदत करण्यांत माझा वेळ जाई. तेथें मला या मंडळींची सेवा करण्याचे अनेक मार्ग होते व एका दृष्टीनें पाहूं गेलें तर सर्वांत कळकळीचा मार्ग म्हणजे फांशीची शिक्षा झालेल्या कैद्यांची थोडी फार होईल ती सेवा. त्यांना भेटून चार धीराचे शब्द सांगावेत, त्यांचें अपील लिहावें, नंतर जरूर पडेल त्याप्रमाणें दयेचे अर्ज तयार करून धाडून द्यावेत, फांशीची शिक्षा वरपर्यंत कायम झाली तर अखेरच्या दिवसापर्यंत रोज भेटून नित्य धीर देत राहणें हें सर्वांत महत्त्वाचें काम. त्यांच्याशीं माझा असा परिचय झाला; त्यांतून त्यांच्या जीवनाची मला कितीतरी माहिती मिळाली. व फांशीची सजा झालेल्या कैद्यांचें मन कसें असतें, त्याची अवस्था पुढें काय होतें इत्यादि गोष्टींचा पण मला अभ्यास करतां आला. अशा कैद्यांना भेटण्याची मला विलक्षण आतुरता असे. आणि ही आतुरता तृप्त करण्याची संधि साबरमतीच्या तुरुंगांतच विशेषतः मला मिळाली.

ही उत्सुकता अगर आतुरता असण्याला थोडा पूर्वेतिहास आहे. ‘ महमद मूसा ’ याची कथा या पुस्तकांत दिली आहे त्यांत हा इतिहास आनुषंगिकपणें दिलाच आहे. पण या प्रयोजनांत ओघाचा तुटकपणा राहूं नये म्हणून त्या इतिहासाची येथेंहि पुनरुक्ति करीत आहे. १९४१ सालीं वैयक्तिक सत्याग्रहांत मला येरवड्याच्या तुरुंगांत नेण्यांत आलें. त्यावेळीं

सरदार वल्लभभाई, श्री. भुलाभाई देसाई, श्री. बाळासाहेब खेर, श्री. पकासा, श्री. मोरारजी देसाई, आदि आम्ही सात आठ जण एकाच वार्डात होतों. आमच्या वार्डाबाहेरच्या रस्त्याच्या दुसऱ्या बाजूस समोरच फांशी देण्याची जागा होती. मध्यें उंच भिंती असल्यानें तिकडचें इकडे कांहींहि दिसत नसे. पण आमच्या वार्डापासून जवळच फांशीच्या कैद्यांना ठेवण्यांत येई. एक दिवस रात्रीं मी मध्येंच जागा झालों तेव्हां मोठ्या आवाजांत एका कैद्यानें चालविलेला रामनामाचा गजर कानीं पडला. रात्रीं मोठ्यानें ओरडणें, बोलणें अगर हांका मारणें हा तुरुंगाच्या नियमाप्रमाणें गुन्हा आहे. म्हणून रामधून ऐकून मी जरा विचारांत पडलों. कुणी बिचारा दुसरे दिवशीं फांसावर लटकणार असेल म्हणून तो जीव रात्रीं अखेरचें नाम घेत असेल असें वाटलें! हा विचार मनांत आला मात्र, मन अस्वस्थ होऊन डोळ्यावरची झोंप एकदम उडाली. मृत्यूच्या भेटीची तयारी माणूस कसा करीत असेल? त्याचे अखेरचे काय काय विचार चालले असतील? इत्यादि विचारांनीं माझ्या डोक्यांत थैमान घालण्यास सुरुवात केली. आपल्या शासनशास्त्रांत फांशीची शिक्षा कां, तिचें प्रयोजन कोणतें, व ती कशासाठीं चालू ठेवायची? गुन्हा कितीहि भयंकर असला तरी, गुन्हेगाराला मारून टाकणें हें योग्य आहे का? कित्येक वर्षांपासून ही फांशी देण्याची शिक्षा चालत आली खरी, पण खुनाचें प्रमाण कांहीं समाजांत कमी झालेलें दिसत नाहीं. अनेक कारणांमुळें मनुष्य गुन्हा करण्यास प्रवृत्त होतो; अशा गुन्ह्यांची समाजावर यत्किंचित्‌हि जबाबदारी नाहीं काय? राज्यशासनसंस्थेचा पण थोडाफार दोष खरा कीं नाहीं! आणि हें जर असेल तर मग त्या एकट्या गुन्हेगारालाच कां सजा आणि तीहि फांशीची? त्यापरतें अशा पतिताला जीवें न मारतां, जिवंत ठेवून त्याचें जीवन सुधारण्याचा प्रयत्न करणें हा समाजाच्या दृष्टीनें जास्त इष्ट मार्ग नव्हे काय? या प्रकारचें विचारचक्र सुरू झालें! मग उरल्या रात्रीं त्या दिवशीं झोप कुठली?

दुसरे दिवशीं लवकर सकाळीं तुरुंगाचे डॉक्टर आले व म्हणाले कीं, "आज फांशी आहे तेव्हां आपणा मंडळीकडे येण्यास जरा उशीर लागेल." आदल्या रात्रीं मीं जो तर्क केला तो खरा ठरला. समोरचें कांहींहि प्रत्यक्ष

दिसत नव्हतें; पण मन आणि कान अगदीं त्या फांशी खोलीच्या दिशेकडे खिळले. फांशीच्या माच्याकडे ओढला जाणारा कैदी कसा पावलें टाकीत असेल? त्याच्या चेहऱ्यावर कोणते विकार अगर कोणते भाव दिसत असतील? कोणकोणत्या विचारांचीं आंदोलनें या अखेरच्या क्षणाला त्याच्या मनांत येत असतील? हें सर्व आपल्याला कसें समजावून घेतां येईल? तें सर्व जाणण्याची इच्छा एकसारखी बळावत चालली.

आमच्या वार्डांतून बाहेर जाणाऱ्या दरवाजाच्या पायऱ्या होत्या. त्या चढून वरतीं मान करून पाहूं लागलों. फांशी कैद्याला घेऊन त्या खोलीकडे निघालेली मंडळी पाहिली. कैद्याचे दोन्ही हात एका हातकडींत बांधलेले व मागेंपुढें संगिनीनें सज्ज अशा बंदुका घेतलेले सशस्त्र दहा बारा शिपाई, सुपरिंटेंडेंट, मॅजिस्ट्रेट, डॉक्टर, इत्यादि सर्व लवाजम्यानिशीं निघालेली ही स्वारी! बांधल्या हातीं "नमः शिवाय, नमः शिवाय" म्हणून तोंडानें म्हणत तो कैदी जरा झपझपच पावलें टाकीत चालला होता. यमराजाला भेटण्यासाठीं का तो उतावळा झाला होता! त्याचें वय असेल बावीस ते पंचवीस. तें सर्व पाहतांच माझें मन थरारलें. चालताबोलता हा उभा जीव १।२ मिनिटांत आतां निःशेष आणि निःशब्द होणार! क्षणा दोन क्षणांत जगाचा अखेरचा निरोप घेऊन तो दुनिया सोडून चालता होणार! हृदय अगदीं पिळवटलें; पण त्या स्थितींत माझ्या स्थितींत करण्याजोगें काय होतें? कांहींच नाहीं! मी कळवळलें, व्याकुळ झालों; आणि पायऱ्यावरून खालीं उतरलों. फांशी खोलीचे दरवाजे उघडल्याचा आवाज आला. खट्...खट्...खट्...तो दुर्दैवी जीव फांशीच्या माच्यावर जाण्याचा जिना चढला. पुनः क्षणभर सारें शांत; आणि खट्ट असा मोठा आवाज झाला! फांशी उरकली! कैद्याच्या गळ्याभोंवतीं दोरी घट्ट बसली! तो देह लोंबूं लागला! तें सारें दृश्य मला डोळ्यानें दिसलें नाहीं, पण मानसचक्षूंनीं मीं तें सर्व न्याहाळलें. आणि चित्त विव्हळ झालें. सर्व सुन्न भासूं लागलें! जो जीव त्या फांसावर टांगला त्याच्याबरोबर कांहीं बोलतां आलें असतें; त्या दुर्दैवी कैद्याची भेट झाली असती तर अशी एक प्रकारची हुरहुर मनाला सारखी लागून राहिली! मनाला झालेल्या या वेदना—त्यामुळेंच

साबरमतीच्या तुरुंगांत जेव्हां सामान्य कैद्यांना मिळण्या-भेटण्याची सवलत मला मिळाली तेव्हां फांशीची सजा झालेल्या कैद्यांना भेटण्याची मीं इच्छा प्रदर्शित केली आणि त्याप्रमाणें तशी सवडहि मला मिळाली. मी साबरमतीच्या तुरुंगांत त्यावेळीं एकोणीस महिने होतों. दरम्यान पांच जणांना तेथें फांशी देण्यांत आलें व या पांची कैद्यांच्या अत्यंत निकट सहवासांत मी येऊं शकलों.

तुरुंगांत तर बऱ्याच गोष्टींचें ज्ञान मला झालें. अनेक कैद्यांच्या हकीकती ऐकल्या. प्रत्येकाची जीवनकथा एक प्रकारें मोठी बोधप्रद आणि रोमांचक तर खरीच. त्या सर्व कथांचा संग्रह करण्याला पुरेसा वेळ नाहीं; आणि त्याची तादृश जरूरी पण नाहीं. अतएव थोड्याच प्रसंगांचें वर्णन येथें आलें आहे.

तुरुंगांतील विश्वाविषयीं बाहेर जगाला असलेली माहिती बरीचशी निराधार, सत्याहून वेगळी व विकृत स्वरूपाची अशीच आहे. जगाला जणूं असेंच वाटतें कीं तुरुंग म्हणजे तेथें केवळ डाकू, दरोडेखोर, खुनी, लुटारू, खोटें बोलणारे किंवा नीतिभ्रष्ट पतित लोकांचाच भरणा. आणि जेलबाहेरचें सारें विश्व म्हणजे सर्वत्र निर्दोष स्वच्छता ! तुरुंग म्हणजे समाजाचा केवळ उकिरडा ! माझ्या दृष्टीनें, लोकांचा हा समज अगदीं साफ चूक आहे. समाजांत प्रतिष्ठा पावलेले व उजळ माथ्यानें वावरणारे गुन्हेगार तुरुंगांत डांबलेल्या कैद्यांपेक्षां कितीतरी पटीनें अधिक आहेत ! आणि समाजाला या असल्या गुन्हेगारापासून भयंकर धोका आहे. याविषयीं मतभेद अवश्य असूं शकेल. तुरुंगांतील सामान्य कैद्यांच्या ठायीं दिसून येणारी हिंमत, सचाई, त्यागवृत्ति, कृतज्ञतेची भावना इत्यादि सद्‌गुण, जगांत शिकल्या-सवरल्या मंडळींत आढळतात त्याहून कितीतरी मोठ्या व विशाल प्रमाणांत या कैद्यांत दिसतात. याला अपवाद हे असणारच. समाजाची पातळी वर नेऊं पहाणारे समाजसेवक आणि सरकार यांनीं तुरुंगाकडे या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. तुरुंगाचें स्वरूप कोणतें असलें पाहिजे, मनुष्याच्या सुधारणेसाठीं शिक्षा-पद्धतीचा खराखुरा उपयोग कितपत होऊं शकतो, फांशीच्या शिक्षेचा आजवर एकंदर काय परिणाम झाला, याचा संपूर्ण खोलवर विचार करून, गुन्हे

व गुन्हेगार यांच्याविषयीं सामाजिक दृष्टिकोण कोणते हवेत व गुन्हे कमी व्हावेत म्हणून कोणकोणते उपाय अंमलांत आणले पाहिजेत याचा निखालस व सर्व दृष्टींनीं विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. सामान्य शिक्षणाच्या आयोजनाचाच हा एक अंगभूत भाग होय असें म्हटलें तरी चालेल इतकें या प्रश्नाचें महत्त्व आहे.

या गोष्टींपैकीं कांहीं गोष्टी तरी अशा आहेत कीं ज्यांमधून सत्याच्या माहात्म्याचें दर्शन होईल. सत्यामुळें नुकसान झाल्याचे दाखले अगदीं विरळा. नफानुकसानीच्या दृष्टीनें नुकसानीपेक्षां नफाच अधिक झाल्याचें आढळून येईल. सत्याची ही व्यावहारिक बाजू लोकांनीं—विशेषतः वकील व राजकारणी पुरुषांनीं—समजून घेतली पाहिजे, हें देखील किती आवश्यक आहे याची प्रतीति या गोष्टींवरून येईल. सत्याच्या मदतीनें परस्पर संबंध दृढ होतात; एकमेकांचा विश्वास वाढतो; सहकार्य घडतें आणि समाजाची पातळी उंच जाते. कोर्टांत तर खोटें सांगितल्यानेंच निभाव लागतो अशी भ्रामक समजूत समाजांत अगदीं पक्की होऊन बसली आहे. समाजाचा विकास होण्यास अगर प्रगति साधण्यास हा एक मोठा अडथळा आहे. समाजांतील सुखी जीवनाची धूळधाण या वृत्तीनें होत आहे असा माझ्या वकिलींत व पुढें तुरुंगांत मिळालेल्या अनुभवांचा निष्कर्ष आहे.

सत्याचा आधार घेता तर महंमद फांशीच्या शिक्षेंतून सुटता. पण कायदेपंडितांनीं त्याला सल्ला दिली व त्याला तो अक्षरशः बळी पडला ! किती करुण आहे ही जीवनकथा ! कोर्टानें काय निर्णय दिला असता हें सांगणें कठीण, पण कानजीचा बचाव सत्य सोडून मुळींच झाला नसता. तो वाचला तो केवळ सत्याची कांस धरली म्हणून.

यांतील कांहीं गोष्टींकडे जर मानसशास्त्राच्या दृष्टीनें पाहिलें तर आपणाला आढळून येईल कीं अनेक वेळां माणसाचा हेतू आणि त्याच्या विचाराची दिशा याची कल्पनाच नीटशी करतां येत नाहीं. वरवरचीं कारणें पाहून खरी कल्पना मुळींच येत नाहीं. स्वतःची मंत्रविद्या नीट चालावी म्हणूनच केवळ माधा अजाण अर्भकांची हत्या करण्यास प्रवृत्त

झाला. ही गोष्ट प्रथमदर्शनीं कुणाला तरी पटण्याजोगी आहे काय? पण हेंच सत्य आहे.

विजोड लग्नाचे काय परिणाम घडतात याचा दाखला शहाजाद्याच्या गोष्टीवरून मिळेल. बबलीला जर योग्य पति मिळता तर तिच्या संसाराची सारी काया पालटली असती. सामाजिक प्रतिष्ठा व द्रव्यलोभ यामुळें आज समाजांत जीं विजोड लग्नें होतात, त्याचा परिणाम सोमाच्या गोष्टीवरून सहज ध्यानीं येईल. पैशाखातर समाजांत अनीति कशा स्वरूपांत लपत छपत आपला धंदा चालविते याचा दाखला शिवरामाच्या गोष्टींत आहे. हें सर्व उघड आहे व त्याबरोबरच विषयवासना किती प्रबळ असते व एकदां हा विकार जडला कीं माणसाच्या मनांत रागद्वेषादि विरोधी विकार पण त्या मनांत कसें घर करून बसतात, एकदां मरणाची घटका निश्चित झाली कीं माणसाच्या वृत्तींत किती आश्चर्यकारक बदल होतो, गीता ग्रंथांत वर्णिलेलें जीवनमरणाचें तत्त्वज्ञान, शिक्षणादि संस्कार मुळींच नसतांनाहि साधींसुधीं माणसें आपल्या जीवनांत कशी उतरवूं शकतात इत्यादि बाबींचें पण आपणाला या विविध कथांत दर्शन होतें. त्याप्रमाणें सामान्य माणसांचे विचार, त्यांच्या आकांक्षा, त्यांची नैसर्गिक वृत्ति, त्यांचे गुणदोष इत्यादि गोष्टीहि या कथांत वेगवेगळ्या प्रसंगावरून वाचकांच्या ध्यानीं येतील.

तुरुंगांत मी वीस महिने राहिलों त्या अवधींत अशा शेंकडो जीवनकथा माझ्या नजरेस आल्या व मीं त्या तपासून पाहिल्या. गरीबांच्या, पतितांच्या सुखदुःखांत भाग घेण्याची संधि मला प्राप्त झाली. दवाखान्यांतील आजारी कैदी तसेंच घरगुती प्रसंगामुळें ज्यांची मनोवृत्ति अस्थिर झाली आहे असे कैदी, (उदाहरणार्थ उदार-चित्त बापूची कथा.) यांच्या पण जीवनकथा मीं नीट न्याहाळल्या व अशा रीतीनें मानवी जीवनाच्या विविध बाजूंचें दर्शन मला भरपूर घडलें. सामान्य कैद्यांची होईल तितकी सेवा करण्याचें मला भाग्य लाभलें आणि या संधीच्या योगानेंच माझा बंदिवास म्हणजे एक प्रकारचें अमूल्य असें विद्यार्थीजीवनच असें मला वाटतें. राजबंदींचा सहवास, त्यांच्याशीं झालेल्या चर्चा व त्यांच्या सान्निध्यांत केलेलें

थोडेंफार लिखाण तसेंच आमचें समूह वाचन, कांतण वगैरे गोष्टींचा आनंद तर मला प्राप्त झाला होताच.

मला जें वाटलें व जे विचार माझ्या मनांत आले त्यांत सर्व बंधुभगिनींना वाटेकरी करावें या हेतूनें मी या सर्व गोष्टी लिहिण्यास उद्युक्त झालें. याचें मूल्यमापन करणें हें अर्थात् माझें काम नव्हे.

या मराठी वेशास प्रस्तावना लिहिण्यास कोणास सांगावें? येथील कॅलिको मिल्चे मॅनेजर सुविद्य, साहित्यिक, सज्जन समाजसेवक व माझे स्नेही श्री. शंकर अमृत खेर यांसच विनंति करण्याचें ठरविलें. ही करण्यांत ते चांगलेच साहित्यिक किंवा माझे स्नेही एवढेंच नसून, या पुस्तकांतील कांहीं गोष्टी जेलमध्यें घडल्या त्यावेळीं ते जेलमध्यें माझेबरोबरच या कार्यातील सहकारी होते–कांहीं घटना जितक्या मला तितक्याच त्यांनाहि अवगत आहेत–त्यांनीं माझी विनंति स्वीकारून मार्मिक अशी प्रस्तावना लिहून दिली याबद्दल त्यांचे आभार न मानले तर तो माझ्या गुणग्राहकतेच्या अभावाचा बाहेरच्या जगास पुरावा होण्याचा संभव. बाकी आमचे परस्पर संबंध व खेरांचा स्वभाव, मित्रकार्य व सार्वजनिक कार्य, याविषयींची त्यांची तत्परता, वगैरे पाहतां या माझ्या उल्लेखानें त्यांना संकोच वाटेल–पण त्याला मीं तरी काय करावें?

सेवा कुटीर,<br>
महाराष्ट्र सोसायटी<br>
एलिस ब्रिज अहमदाबाद<br>
ता. २२–८–५२

गणेश वासुदेव मावळंकर

# प्रस्तावना

'मानवतेचे पाझर' हें ना. श्री. दादासाहेब मावळंकर यांच्या "'मानवतानां झरणां' या उत्कृष्ट गुजराती पुस्तकाचें मराठी रूपांतर. या रूपांतराला प्रस्तावना लिहिण्यास श्री. दादासाहेबांनीं मला सांगितलें. मला लिहिण्याचा सराव नाहीं. मधून मधून थोडें लिहितों. पण तें आपलें "कांहींतरी." अशा लिहिण्याचा आत्मानंदाहून अन्य असा हेतू अर्थातच नसतो. मी साहित्यिक नाहीं. कार्यकर्ता तर नाहींच नाहीं. तेव्हां अशा सुंदर पुस्तकाला प्रस्तावना लिहिणें ही गोष्ट माझ्या आटोक्याच्याच काय पण अधिकाराच्याहि बाहेरची आहे हें मी प्रांजलपणें कबूल करतों. श्री. दादासाहेबांच्या अनेक चाहात्यांपैकीं मी एक आहे व साहजिकच त्यांच्याविषयीं मला मोठा आदर वाटतो. त्यांच्याठायीं माझी भक्ति पण खरी. तथापि प्रस्तावना लिहिण्याची योग्यता ठरविण्याचे कामीं असा आदर आणि ही भक्ति जमेस धरतां येत नाहींत, याची जाणीव मला आहे. श्री. दादासाहेबांनीं हें काम आपुलकीनें मजवर सोपविलें व त्यांच्या शब्दाला 'नाहीं' म्हणणें कठीण वाटतें म्हणूनच मी तें करण्यास धजत आहें.

हें पुस्तक मी सुंदर म्हणतों याचें कारण त्यांतील कथांत लेखकानें आपला प्राण ओतला आहे हें होय. कथा लिहिण्यांत नव्हे. पण त्या घडविण्यांत. त्या जशा झाल्या तशा सवडीप्रमाणें लिहिल्या. गांधीजींच्या चळवळींत हजारों लोक तुरुंगांत गेले, व तेथून परत आले. पण बंदिवासांतील काळाचा एवढा सदुपयोग करणारे श्री. दादासाहेबांसारखे विरळा. जनसेवेचें आपलें आवडतें व्रत श्री. दादासाहेबांनीं तेथेंहि अखंड चालविलें. विशेषत: त्यांनीं १९४२–४४ च्या दरम्यान साबरमती जेलमधून जनताजनार्दनाची केलेली सेवा खरोखरी अपूर्व व अलौकिक अशी आहे. लहानसहान गुन्हेगारांपासून तों मोठाल्या खुनी, लुटारू, दरोडेखोरापर्यंत सर्व प्रकारच्या कैद्यांबरोबर

बंधुत्वानें वागून त्यांनीं त्या मंडळींचें प्रेम संपादन केलें. आर्ताला औषध-पाणी द्यावें, गरिबांना सर्वतोपरी मदत करावी, कुणाचीं अपीलें लिहावींत तर कुणाचे दयेचे अर्ज करावेत; कुणाची शिक्षा कमी करण्यासाठीं आटोकाट प्रयत्न करावेत तर कुणावर झालेला अन्याय दूर करण्यासाठीं सर्व हकीगत तपशीलवार लिहून वर पाठवून द्यावी, अशी ही त्यांची निःस्वार्थी तपश्चर्या प्रत्यक्ष पहाण्याचें भाग्य मला लाभलें होतें. खुनाच्या आरोपीजवळ जाऊन त्याच्याशीं सुखदुःखाच्या मनमोकळ्या गोष्टी कराव्यात; त्यांना धीर द्यावा; सत्यकथन करण्यास उद्युक्त करावें, आणि फांसावर जाण्याचा प्रसंग टळला नाहीं तरी सत्य सांगून त्या सत्याच्या प्रकाशांत अशा दुर्दैवी जीवांची अखेरची घटका तरी तेजःपुंज करावी, ही श्री. दादा-साहेबांची खरोखरी मोठी असामान्य कामगिरी होय. सत्याचा प्रभाव केवढा असतो आणि पापी मनुष्यदेखील प्रोत्साहन मिळतांच पुण्यमार्गावर कसा सत्वर धांवत येतो याची प्रचीति श्री. दादासाहेबांच्या या छोट्या पुस्तकावरून येते.

ज्यांना आपण पतित, पापी, चांडाळ म्हणून उपहासानें दूर करतों ती मंडळी मनानें कशी निर्मळ असतात आणि योग्य मार्गदर्शन मिळालें तर किती उत्सुकतेनें सन्मार्गाला लागण्यास अधीर असतात तें पाहिलें म्हणजे या देशांतील माणसें सुधारण्यास खरी उणीव सत्यनिष्ठ व सत्वनिष्ठ समाज-सेवकांचीच असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. हाडामासांचीं हीं चालतीं बोलतीं माणसें, त्यांना बरें वाईट समजण्याइतकी उपजत बुद्धि आहे, भावना आहेत, विकार आहेत, दयामाया आहे; असें असून तीं पापी कां होतात? गरिबींतहि सुखासमाधानानें नांदणारे साधे शेतकरी खुनासारखे भयंकर गुन्हे करण्यास प्रवृत्त होतात तें कां? आणि प्राणांचीहि पर्वा न करणारे हे खुनी लोक, "न मया, न मया," म्हणून कोर्टासमोर एकच मंत्र जपत राहतात तें तरी कां? वेड लागलें तर चावडींत कोंडावें, आणि गुन्हा केला तर तुरुंगांत डांबावें यापरतें या दुर्दैवी जीवांना सुधारण्याचे व त्यांना माणसांत परत आणण्याचे कोणतेच का मार्ग आपल्या समाजाजवळ शिल्लक नाहींत? माणसाच्या हातून कांहीं गुन्हा झाल्याचें सिद्ध होतांच

त्याला एखाद्या भयंकर रोग्याप्रमाणें समाजांतून कायमचें उठवून लावलें कीं बाकी सारा समाज निरोगी आणि निर्दोष राहाणार आहे का? कायद्यानें केलेली शिक्षा भोगून परत आल्यावरहि जर अशा जीवांना समाज तिरस्कारानें वागवूं लागला तर या जीवांकडून पुढें होणाऱ्या गुन्ह्यांची जबाबदारी त्या समाजावर येते कीं नाहीं? आणि न्यायासनासमोर शपथेवर खोटें बोलण्याचा जो हा बुद्धीचा खेळ सतत चालू आहे यानें समाजांतील गुन्ह्यांचें प्रमाण एकंदरींत वाढतें कीं कमी होतें? खरोखरी हे अत्यंत खळबळीचे प्रश्न आहेत. पण आमच्या समाजाला या असल्या प्रश्नांनीं कधीं अस्वस्थ केल्याचें दिसत नाहीं. कोर्टांत इन्साफ व्हावा म्हणून लोक जातात. वकील आणि साक्षीदार यांच्या साहाय्यानें न्यायाधिशानें सत्य काय तें हुडकून काढण्याचा प्रयत्न करावयाचा असतो. पण ही जबाबदारी न्यायाधिशाखेरीज अन्य कोणावरच नसावी असें तेथील कामकाजाच्या पद्धती-वरून दिसतें. सत्य लपविण्यासाठीं जो हा बुद्धीचा, वेळेचा आणि द्रव्याचा सारा अपव्यय होतो तो जर सत्य शोधून काढण्यासाठीं झाला तर न्यायदान किती सुलभ आणि सोयीस्कर होईल! गुन्ह्याचा इनकार करण्यांत कांहींच चूक नाहीं असें गृहीत धरल्यानें तो गुन्हा सिद्ध झाल्यानंतर दयेची याचना आरोपी करणार तरी कोणत्या तोंडानें? आणि कितीहि उदार मनाचा न्यायाधीश असला तरी तो दया दाखविणार तरी कसा? प्रत्येक गुन्ह्याला कारण हें असतेंच. तेव्हां गुन्हा झाल्यानंतर त्याचें कारण काय यावर जर आरोपीनें आणि त्या वकिलांनीं व साक्षीदारांनीं आपल्यापरी प्रकाश पाडला तर न्यायदानाला त्याची होणारी मदत खात्रीनें आरोपीच्या फायद्याची होईल. पण आरोपीवर कसलीच जबाबदारी नाहीं असा सिद्धांत मान्य केल्यानंतर तो प्रतिपक्षाच्या दुबळेपणानें सुटण्याचा जितका संभव तितकाच प्रतिपक्षाचा पुरावा सबळ ठरला कीं पूर्णपणें कायद्याच्या कचाट्यांत अडकण्याचाहि संभव आहे इकडे तज्ञांचें लक्ष दिसत नाहीं. भर कोर्टांत सत्याला सोन्यानें झांकून टाकूं पाहाणारी वकिली बुद्धि जर त्या सोन्याचा मोह सोडून सत्याचें दर्शन करून देईल; तर ती आपल्या प्रतिभेनें सारें न्यायालय क्षणार्धांत प्रकाशमय करून, आरोपीच्या भावी जीवनाचा मार्गहि

अचूक दाखवील. आजच्या समाजव्यवस्थेंत अशा मार्गदर्शनाची अत्यंत जरुरी आहे.

तुरुंगांतून सुटून आलेल्या दुर्दैवी जीवाला समाजांत कुठेंच थारा मिळत नाहीं; आणि चहूंकडून कोंडमारा झाल्यामुळें पुन्हां गुन्हा करून तुरुंगांत जाणें हाच एक मार्ग त्याला शिल्लक राहातो. गुन्ह्याच्या प्रमाणांत त्याला योग्य शिक्षा व ती भोगल्यानंतर गुन्हेगाराच्या जीवनाला योग्य वळण या दोन्ही गोष्टी न्यायव्यवस्थेंत जरूर हव्यात. दुसरी गोष्ट सर्वस्वीं देहदंडानें साधणारी अशी अर्थांतच नाहीं. त्या बाबतींत गुन्हेगाराबरोबर साऱ्या समाजाचा दृष्टिकोणच बदलण्यास हवा. बहुतेक गुन्हे हे दुबळ्या अगर विकृत मनाचे उद्रेक होत. आणि अशा मनाला ताळ्यावर आणण्याला योग्य उपचार हीच त्या गुन्ह्यांना शिक्षा होय. अर्थात् शिक्षा अशी हवी कीं जी भोगल्यानें मनाचा दुबळेपणा अगर विकृति नाहींशी होऊन तें परिस्थितीशीं टक्कर देण्यास खंबीर होईल. खराखुरा पश्चात्ताप ही अशी एकच शिक्षा आहे. पोळणारें मन तापविलेल्या सोन्याप्रमाणें स्वच्छ, शुद्ध आणि सकस होतें; व फक्त अशा मनालाच सर्व आघात सोसण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें. आपल्या सध्यांच्या शिक्षाशास्त्रांत मनाला आणि विवेकबुद्धीला कुठें वाव नसल्यानें हा जरा निराळाच मार्ग वाटेल. पण तसा तो निराळा नाहीं. ऋषि-मुनींनीं या देशाला उपदेशिलेला तो सनातन मार्ग आहे. व तो आपल्या प्राचीन संस्कृतीशीं सर्वस्वी सुसंगत असा आहे. कोणत्याहि परिस्थितींत पतितांना पावन करणारा हा दिव्य मार्ग आहे. जिवाचें खऱ्या अर्थानें सोनें करणारी ही एक आध्यात्मिक किमया होय. आणि ही किमया साध्य करायची म्हणजे सत्यव्रत आलेंच. त्या सत्यव्रताचे प्रयोग श्री. दादासाहेबांनीं साबरमतीच्या बंदिगृहांत करून पाहिलें. समाजानें झिडकारून फेकून दिलेले कांहीं दगड त्यांनीं तेथें बसल्या बसल्या पूजिले. त्यावर अनेक संस्कार केले. शिल्पकाराच्या तन्मयतेनें ते त्या दगडाधोंड्यांशीं तन्मय झाले. मूर्ति सुबक व्हावी, निर्दोष व्हावी म्हणून त्यांनीं टाकीचे घाव घातले. घाव घालण्यापूर्वीं अशा वेळीं दगडावर पाणी शिंपडावें लागतें. श्री. दादासाहेबांच्या डोळ्यांतून तें पवित्र पाणी घळघळा वाहूं लागतांच ते

पत्थर पाझरले आणि त्यांच्याहि पोटीं मानवतेचे अखंड झरे आहेत हें मंगलदर्शन श्री. दादासाहेबांना तेथें झालें. संस्कार सुटले कीं देवाचे दगड होतात हें आपण प्रत्यहीं पाहातों. त्याच दगडावर संस्कार झाले कीं त्यांना देवत्व येतें हा प्रत्यक्ष अनुभव श्री. दादासाहेबांना आला. दगड आणि देव यांच्यांत फरक काय तो संस्कारांचा. त्या संस्कारांचा ज्याला लाभ होईल त्याला देवकळा प्राप्त होण्यास काय अवधि? तेव्हां समाजाला सुसंस्कृत करण्याची ज्याची पवित्र जबाबदारी त्या बुद्धिमंतांनीं व कायदेपंडितांनीं आमच्या शिक्षासत्रांत कालेंकरून नष्ट झालेल्या या मनःपूत मार्गांचा अवलंब करून अवश्य पाहावा.

जीवनकथा म्हणून तर साऱ्या गोष्टी चित्तवेधक आहेतच. पण त्याहून जास्त चित्तवेधक म्हणजे प्रत्येक गोष्टींत दिसून येणारी श्री. दादासाहेबांची तळमळ. चौदा जणांच्या या चौदा कथा खऱ्या, पण साऱ्या पुस्तकाचे खरे नायक स्वतः लेखकच होत. वेगवेगळया कथा वाचतांना त्या त्या कथानायकांची आपल्याला पुरेपूर ओळख होते व त्याबरोबर सारें पुस्तक वाचल्यानंतर श्री. दादासाहेबांच्या विशाल हृदयाची ओळख अगदीं सहजपणें होते.

या पुस्तकाचा आणखीहि एक विशेष म्हणजे वाचकाला आपल्या हृदयाची ओळख करून घेण्यास तें प्रद्युक्त करतें. अनुभवाचा हा सिद्धांत असून प्रत्येक वाचकानें आपल्या अनुभवाशीं ताडून पाहावा. कथानकाशीं लेखक समरस होतो याचें कारण कथानकांत सर्वत्र सत्य भरलेलें आहे; वाचतांना वाचक समरस होतात याचें कारणहि तेंच. प्रत्येकाच्या जीवनांत सांगण्यासारखें म्हणून कांहीं असतें. मग तें कोणत्याहि रूपांत अगर रूपकांत असो. असें जें सांगण्यासारखें विशेष तें त्या व्यक्तीचें पुस्तक होय असें रस्किन म्हणतो. या छोट्या पण सुंदर पुस्तकाकडे पाहून श्री. दादासाहेबांच्याविषयीं असें जरूर म्हणतां येईल कीं This is his Book.

अहमदाबाद.
१५–८–५२

—शं. अ. खेर.

# ★ अनुक्रम ★

अमृत झरे— डॉ. सुमति क्षेत्रमाडे
प्रयोजन — दादासाहेब मावळंकर
प्रस्तावना— शं. अ. खेर

खंड १ ला—**सत्याची प्रचीति**

| | पृष्ठ |
|---|---|
| कानजी ... ... ... | १ |
| ब्रह्मानंद साधु ... ... ... | ९ |
| बिचारी आई ! ... ... ... | १६ |
| कोपिष्ट पण प्रेमळ पति ... ... ... | २४ |

खंड २ रा—**मृत्यूवर विजय**

| | |
|---|---|
| महमद मूसा ... ... ... | ३१ |
| स्वाभिमानी शिवराम ... ... ... | ४७ |
| ही तर नुसती कुडीच आहे ! ... ... | ५७ |
| प्रेमी शहाजादा ... ... ... | ६७ |
| हृदयपालट ... ... ... | ७४ |
| उलाढाली मांत्रिक ... ... ... | ७७ |
| मोती झेणा ... ... ... | ८८ |

खंड ३ रा—**विविध**

| | |
|---|---|
| १ उदार-चित्त बापू ... ... ... | १०० |
| २ धोरणी व धाडसी लाखाजी ... ... | १०६ |
| ३ सरकारी तंत्रांतील मानवता ... ... | ११४ |

**—: परिशिष्ट :—**

| | |
|---|---|
| मंगल दर्शन —उमाशंकर जोशी ... ... | ११९ |

# कानजी

एक दिवस कानजी नांवाचा एक खुनाचा आरोपी कैदी माझ्याकडे आला. त्याला माझं मार्गदर्शन हवं होतं. थोड्याच दिवसांत मॅजिस्ट्रेट-समोर त्याची केस चालायची होती. त्यासाठीं त्यानें वकील पण दिला होता. वकिलानें त्याला असें सांगण्याचा सल्ला दिला होता कीं, "मला कांहीं माहीत नाहीं. माझ्या दावेदारांनीं खोटें सांगून माझ्याविरुद्ध पोलीसना उठविल्यामुळें त्यांनीं उगीचच ही खोटी केस भरली आहे."

वकिलानें शिकवल्याप्रमाणें सांगावं कीं नाहीं याचा त्या बिचाऱ्याच्या मनांत मोठा गोंधळ उडून गेला होता. एक मन सांगे, "खरंच वकिलानें पढवल्याप्रमाणें सांगितलं तर पुराव्याच्या अभावीं आपण सुटून पण जाऊं. काय नेम!"

खरोखर काय घडलें हें त्यानें कबूल करावें असें मीं त्याला सांगितलें. जर त्यानें सत्यच हकीकत सांगितली तर त्यांतून बचावाचा कांहीं मार्ग निघेल असेंहि मी म्हणालों.

तुरुंगांत आल्यावर इतरांकडून माझेविषयीं त्यानें बऱ्याच गोष्टी ऐकल्या होत्या. त्यामुळें त्याला माझेबद्दल विश्वास वाटत होता.

खुनाची हकीकत थोडी व साधी होती. तो आणि त्याचा मित्र (ज्याचा कानजीच्या हातून खून झाला तो) दोघेजण एकाच गिरणींत काम करीत असत. एक दिवस कसल्याशा आनंदप्रसंगीं दोघेजण दारू प्याले आणि नंतर एका हॉटेलांत चहा प्यायला गेले. हॉटेलबाहेर फूटपाथवर असलेल्या बाकावर दोघेजण एकत्र बसले. चहाफराळाचं मागवलं. चहा पीत होते, फराळाचा फन्ना उडवीत होते नि गप्पागोष्टींनाहि रंग चढत होता. इतक्यांत कांहींतरी विषय निघाला. कुठल्याशा मुद्द्यावर मतभेद झाला. आवाज चढले. बोलचालीनें उग्र रूप धारण केलें. अन् शेवटीं चांगलंच भांडण जुंपलं. त्या भांडणांत त्याचा मित्र असें कांहीं बोलला कीं तें ऐकतांच कानजी

एकदम भडकला. त्यानें खिशांतून चाकू बाहेर काढला आणि ठार मारण्याच्या हेतूनें नव्हे, पण हात दाखविण्यासाठीं मित्राला मारला. पण दुर्दैव कानजीचं! चाकूचा वार बरोबर काळजावर पडला आणि तो मित्र बाकावरून खालीं कोलमडला!

एकदम कानजीचे डोळे उघडले! तो घाबरला, अपार दुःखी पण झाला! रक्तबंबाळ मित्राला पाहून त्याचं हृदय थरारलं. सर्व शरीर शहारलं. पण त्याच क्षणीं मनांत विचार आला कीं, "आतां मला पोलीस पकडतील आणि फांसावर लटकावें लागेल."

या इशाऱ्यानें मन सावध झालं. शरीर सांवरलं. आजूबाजूला नजर टाकली. जवळच कुणाची तरी सायकल पडली होती त्याच्यावर टांग मारून भरवेगांत त्यानें सायकल पिटाळली. हा सर्व प्रकार निमिषमात्रांत घडला. हॉटेलांत जवळ बसलेल्या लोकांचं लक्ष बाहेर गेलं तेव्हां कानजी सायकलस्वार होऊन वायुवेगानें धांवत होता.

"खून" "खून" म्हणून ओरडत लोक त्याच्यामागें धांवले. पण व्यर्थ! वायुवेगानें निघालेला कानजी थोडाच हातीं लागणार?

कानजी झपाट्यानें पुढें चालला होता. इतक्यांत एक दहाबारा वर्षांचा मुलगा रस्त्यांत उभा होता. मागचा घोळका पाहून नि ओरडा ऐकून तो पण त्याला पकडायला धांवला आणि त्या हिंमतबहादूर छोकऱ्यानें कानजीच्या धांवत्या सायकलचं मागचं चाक मोठ्या शिताफीनें पकडलं! सायकलबरोबर घसपटत पण गेला, पण चाक सोडलं नाहीं. कानजी सायकलवरून खालीं पडला. पण लगेच उठून धांवूं लागला. लोक मागें लागलेलेच होते. जवळच्याच एका म्हातारीच्या घरांत घुसला. पण म्हातारीनें लागलीच बाहेर हुसकलं. पुन्हां धांवत सुटला. लोक कंटाळून मागें फिरले.

लोकांचा पाठचा ससेमिरा चुकल्यावर तो निर्धास्त झाला नि थांबून विचार करूं लागला कीं आतां कुठंतरी बाहेर गांवीं जावं हेंच चांगलं. त्याशिवाय सुटका नाहीं, म्हणून मणीनगरकडे जाणाऱ्या बसमध्यें चढला. मणीनगरला जाऊन बडोद्याचं तिकिट काढून तो गाडींत बसला अन् त्यानें

सुटकेचा निःश्वास सोडला, "आतां सुटलों खरा!" पण ईश्वर त्याला असा सोडणार होय?

खुनाची बातमी पोलिसांना लागतांच पोलिस अधिकारी मागोसा घेत मणीनगर स्टेशनवर येऊन पोंचले. गाडी अगदीं सुटण्याच्या बेतांत होती. पण—दुर्दैव कानजीचं! पकडला गेला. कानजीभाई सरकारी तुरुंगांत पाहुणे झाले!

ही सर्व हकीकत ऐकून मीं मनाशीं विचार करूं लागलों, "आतां या केसमध्यें बचाव कसा करायचा?"

वकिलांच्या रीतीप्रमाणें त्याला सल्ला मिळाला कीं कानजीनें खून केला असें म्हणणाऱ्या साक्षीदारांचा पुरावाच मुळीं लंगडा आहे. कारण तो सायकलवर बसून पळाला, म्हातारीच्या घरांत शिरला, तेथून त्याला हुसकून लावला, वगैरे साक्षीदारांनीं पाहिलं हें जरी खरं असलं तरी प्रत्यक्ष चाकूचा वार करतांना त्यांनीं कांहीं त्याला पाहिलं नव्हतं. सर्व पुरावा प्रत्यक्ष खून होऊन गेल्यानंतरचा आहे. ज्या मुलानें सायकल पकडली, ज्या बाईनें त्याला आपल्या घराबाहेर काढलें व हॉटेलांतील मंडळीपैकींहि कोणीच चाकू मारतांना कानजीस पाहिलें नव्हतें. खुनानंतरच्या गोष्टींचा हा पुरावा होता, पण प्रत्यक्ष खुनाचा नव्हता. त्यामुळें हा पुरावा कोर्टाला संतोषकारक न वाटण्याचा पुष्कळसा संभव आहे. आणि त्यामुळें कानजी सुटण्याचीहि आशा आहे. या विचारसरणीनें त्याच्या वकिलानें त्याला पढवलं होतं कीं, "मला कांहीं माहीत नाहीं" असंच कोर्टात सांगावयाचं.

कानजी साहजिकच शंकाशील मनाचा होता. त्याला सुटण्याची लालूच तर होतीच पण कदाचित् फांशी जावें लागेल अशीहि धास्ती होती. अशा स्थितींत त्याच्या मनाचा गोंधळ उडाला कीं "काय करावं? गुन्हा कबूल करावा कीं सर्व छपवून 'मला कांहीं माहीत नाहीं' असें म्हणावें?" हा प्रश्न त्याचेपुढें होता. गुन्हा कबूल केला तर फांशी ठरलेलीच. नाकबूल केला तर सुटण्याची कांहींतरी आशा आहे अशी त्याची कल्पना. जीवन—मरणाचा प्रश्न! जीवनाची आशा, मृत्यूचं भय—या दोहोंमध्यें त्याचं मन

हेलकावे खात होतं. मनाच्या अशा अवस्थेंत असल्यामुळें त्याला माझं मार्गदर्शन हवं होतं आणि तेवढ्यासाठीं तो माझ्या खोलींत आला होता.

त्याची हकीकत ऐकत असतांना मला वाटत होतं कीं फांशीच्या शिक्षेसारखें महासंकट पत्करूनहि त्यानें आपला गुन्हा कबूल केला पाहिजे. त्याच्या एकंदर हकीकतीचा विचार करतां, त्याला फांशीची शिक्षा होण्याचा संभव खरोखर फारच कमी होता. स्वतांच्या मित्राचा खून करण्याचा त्याचा इरादा नव्हताच. भडकलेल्या मनःस्थितींत ती गोष्ट त्याच्या हातून होऊन गेली, आणि त्याबद्दल त्याला अति पश्चात्ताप नि दारुण दुःखहि होत होतं. मला नक्की वाटत होतं कीं जर यानें खरी हकीकत छपवून ठेवली तर याची त्या प्रसंगावेळची बेभान, भडकलेली मनःस्थिति, त्याला होणारा पश्चात्ताप नि दुःख वगैरे ज्या कांहीं गोष्टी त्याच्या बचावाला उपयोगीं पडणाऱ्या आहेत तो पुरावा पुढें कसा नि कुठून येणार? अन् त्यामुळेंच मला वाटलं कीं बेहेत्तर, कीं त्यानें आपला गुन्हा सरळ कबूल करावा, हृदयांतलं दुःख व्यक्त करावं आणि न्यायाधिशांच्या दयेवर आधार ठेवून स्वस्थ बसावं.

या प्रकारच्या विचारसरणीबरोबर माझा आग्रह होता कीं कोणताहि नि कसलाहि प्रसंग येवो, माणसानें सत्य बोलण्याची हिंमत प्रयत्नपूर्वक दाखवलीच पाहिजे. खोटं बोलून संकटांतून सुटण्यापेक्षां सत्य बोलून दुःख सहन करणें मला अधिक श्रेयस्कर वाटतं. माझी स्वतांची अशी समजूत असल्यामुळें मीं कानजीला म्हटलं,

"कानजी, मला तर असं वाटतं कीं तूं आपला गुन्हा कबूल करायला हवास. उगीच वकिलांना पैसा चारून पैसा नि जीव दोन्ही गमावण्यापेक्षां खरं बोल. खरं सांगितलंस तर कदाचित् तुला जीवदान मिळण्याचाहि संभव आहे. माझं तर स्पष्ट मत आहे कीं सत्य सांगून जीव बचावण्याची ही संधि साधून घे आणि पैसा व जीव दोन्ही बचावून घे."

माझं म्हणणं त्यानें एकदम झिडकारलें नाहीं. पण मनांत शंका डोकावत होत्या. त्यानें चर्चा सुरू केली.

" पण साहेब, माझे वकील तर म्हणतात कीं मीं गुन्हा कबूल केला तर फांसावर लटकेन, आणि नाकबूल झालों तर सुटण्याची कांहीं तरी शक्यता आहे. मग तसंच कां करूं नये?"

" अस्सं! म्हणजे तूं अन् तुझा वकील–तुम्ही असंच समजून चाल्तां आहांत ना कीं तुमचा खोटेपणा कोर्टाला उमगणार नाहीं? आणि तुमचें म्हणणें खरें समजून कोर्ट तुला सोडून देईल! असंच ना?"

" पण साहेब, चाकू मारतांना मला कांहीं कुणीं पाहिलं नव्हतं तर मग तो मींच मारला कशावरून?"

" हें बघ, हें कृत्य करतांना तुला ईश्वराशिवाय कुणींहि पाहिलं नव्हतं हें खरं, पण तुझा मित्र रक्ताच्या थारोळ्यांत पडला नि तत्क्षणीं तूं सायकल-स्वार होऊन वेगानें पळून गेलास, हें तर बघणारे होतेच ना? जर तूं चाकू मारला नव्हतास, तूं अगदीं निर्दोष होतास तर तशा त्या अवस्थेंत मित्राला टाकून तूं पळून कां गेलास? त्याची व्यवस्था त्याला इलाज करायला थांबला कसा नाहींस? तूं पळून गेलास यावरून तुझं मन तुला दोषी मानीत होतं असंच नाहीं का सिद्ध होत?"

" खरंच, हा मुद्दा विचार करण्यासारखा आहे. पण–पण साहेब, त्याला मारल्याचा माझ्यावर आळ येईल या भीतीनें मी पळालों असं मी सांगेन. मग?"

" तूं असं सांगशील रे. पण कुणीहि अक्कलवान माणूस तुझी ही गोष्ट खरी मानील का? शक्यच नाहीं, कारण हॉटेलांतले तुला बघणारे साक्षीदार, तुझी सायकल पकडणारा तो मुलगा, तुला घरांतून हुसकून लावणारी म्हातारी, यापैकीं तुला कुणी ओळखीत नाहीं. तूं कुणाला ओळखीत नाहींस. यापैकीं तुझे कुणी दावेदार नाहींत. मग या सर्व लोकांना तुझ्याविरुद्ध खोटी साक्ष देण्याचं कारण काय? या सर्व लोकांची साक्ष खोटी असण्यापेक्षां तुझेंच म्हणणें खोटें आहे हें कुणालाहि सहज वाटेल. अरे! एवढे सगळे साक्षी-दार सर्वच कसे खोटे बोलतील? आणि तें पण केवळ तुला फांसावर लटकवण्यासाठीं?"

“ साहेब, आपलं म्हणणं खरं आहे. पण मी असं सांगेन कीं हे सारे साक्षीदार माझ्याविरुद्ध पोलिसांनीं उभे केले आहेत. ”

“ तूं ढीग सांगशील, पण तुझं कोणी खरं मानलं पाहिजे ना ? कुणीहि खरं मानणार नाहीं. खून करण्याचाच तुझा उद्देश होता हें मात्र वाटेल आणि मग मात्र तूं नक्कीच फांसावर लटकशील. हें बघ, तूं मेलास म्हणून तुझा आत्मा मरणार आहे का ? आत्मा अमर आहे हें तुला माहीत आहे ना ? समज मरण यायचंच असलं तर सत्य बोलून मरण आलं, तर त्या पुण्याईनें तुला स्वर्गांत जाण्याची संधि मिळेल. खोटं बोललास तर फांशीं जाशीलच आणि वर नरकांतहि जाशील, हें तुला जास्त पसंत पडेल का ? ”

कानजीच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला ! त्याला माझं म्हणणं पूर्णपणें पटलं. नैतिक दृष्टिकोनाबरोबर व्यवहारी दृष्टिकोनहि किती बरोबर आहे हें त्याच्या मनावर ठसवलं तर पुन्हां त्याचं मन फिरणार नाहीं आणि कदाचित् फांशीची शिक्षा झालीच तर त्यावेळींहि मला दोष देणार नाहीं या विचारानें मीं म्हटलं,

“ हें बघ, सत्य हकीकत सांगण्यांत नीति तर आहेच, पण व्यवहारी दृष्टीनेंसुद्धां त्यांत फायदा होण्याचा, तूं वांचण्याचा जास्त संभव आहे. कारण तूं सत्य न सांगितलंस तर कोर्टाला असेंच वाटेल कीं फांशीची शिक्षा न देण्यासाठीं विचारांत घेण्यासारखें या केसमध्यें कांहींहि नाहीं, पण उलट जर सत्यच सांगितलेंस तर कोर्टावर त्याचा अनुकूल परिणाम होईल, तुझ्या सांगण्यावर विश्वास ठेवण्याची कोर्टाची वृत्ति होईल आणि क्षणिक आवेशाच्या, क्रोधाच्या भरांत तुझ्या हातून असं घडलं असं समजून कोर्ट फांशीची शिक्षा करणार नाहीं. ”

शेवटीं मीं म्हटलं,

“ हें बघ, माझं मत मीं तुला सांगितलं. आतां तुझी मनोदेवता तुला सांगेल त्याप्रमाणेंच कर. मीं सांगितल्याप्रमाणें करशील तर त्यांत मला आनंदच आहे. पण केवळ मी सांगतों म्हणून तूं करावंस असं नाहीं. तुझ्या मनाचा कौल घेऊन जें कांहीं करायचं तेंच केलें पाहिजे. पण मला असं वाटतं कीं खरं सांगितलंस तरच फांशीच्या शिक्षेतून तुझी मुक्तता

होण्याची शक्यता आहे. पण, तरीसुद्धां न करो नारायण, दुर्दैवानें तुला फांशी झालीच तर फांसावर चढतां चढतांहि तुझ्या मनांत आलें, कीं "दादामुळें मी लटकतों आहें" तर तें मला असह्य होईल. म्हणूनच तुला पुन्हां बजावतों कीं तुझं मन तुला जें सांगेल, तुझी मनोदेवता तुला जो कौल देईल त्याप्रमाणेंच कर."

"आपला सल्ला मला पूर्णपणें पटला आहे. मी गुन्हा कबूल करणार. आपण खात्री बाळगा, मला फांशीची शिक्षा झाली तरी फांसावर चढतां चढतां आपण दाखवलेल्या मार्गाबद्दल आपले उपकारच मानीन. मी जगेन अगर मरेन, पण खोटं बोलण्याचं पाप मी करीत नाहीं, या विचारानें माझं मन संतुष्ट राहील."

त्याच्या उत्तरानें मला अर्थातच आनंद झाला. त्याच्या मनाची उदारता, आणि मानवी मनाचा कल स्वाभाविकपणेंच कसा सत्याकडे झुकलेला असतो हें बघून आनंद होणार नाहीं कुणाला?

(२)

त्यानंतर कानजीच्या कसोटीची वेळ आली. खालच्या (माजिस्ट्रेटच्या) कोर्टात केस चालली त्यावेळींच त्यानें गुन्हा कबूल करावा असा माझा त्याला खूप आग्रह होता, पण त्याच्या वकिलानें तें ऐकलें नाहीं. आणि त्यानें कानजीकडून एवढंच पढवून घेतलं, "मला जें कांहीं सांगायचें आहे तें मी वरच्या (सेशन) कोर्टात सांगेन."

संध्याकाळीं कानजी तुरुंगांत परत आल्यानंतर त्यानें येऊन मला ही गोष्ट सांगितली तेव्हां मला फार वाईट वाटलं आणि धास्ती पण वाटली कीं, काय नेम? सेशनमध्यें सरकारी वकील असा पण मुद्दा मांडील कीं "क्षणिक आवेशाच्या भरांत चाकू मारला, खुनाचा उद्देश नव्हता वगैरे गोष्टी फांशींतून मुक्त होण्यासाठीं आतां बनावट रचून सांगत आहे!" स्वाभाविकच आहे. कारण, खालच्या कोर्टात खुलासा करण्याच्या वेळीं तो गप्प कां राहिला? त्याच्या वकिलाच्या असल्या उलट सल्ल्यामुळें केस मात्र

बिघडण्याचा संभव होता. हा विचार मनांत येऊन कानजीच्या भवितव्या-विषयीं मी अगदीं चिंतातुर होऊन गेलों.

यथाकाल सेशनमध्यें केस सुरू झाली. आनंदाची गोष्ट म्हणजे कानजी स्वतांच्या निश्चयापासून यत्किंचितहि ढळला नाहीं. अन् कुणाचाहि सल्ला न ऐकतां कोर्टांत त्यानें सत्य हकीकत संपूर्णपणें सांगितली. गुन्हा कबूल केला. परिणाम माझ्या अंदाजाप्रमाणेंच झाला. फांशींतून तो मुक्त झाला. न्यायाधिशांनीं त्याला चार वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा दिली.

त्यानंतर कानजी सक्तमजुरीचा कैदी बनून माझ्याकडे आला. तेव्हां तो खूप आनंदी नि उत्साही दिसत होता. हर्षयुक्त समाधानानें त्यानें म्हटलं,

" दादासाहेब, फक्त चा – र – च वर्षं ! "

मीं हंसून म्हटलं, " फार छान ! बोल ही शिक्षा कमी करण्यासाठीं अपील करायचं आहे का तुला ? "

त्यानें मान हलवून चटकन् म्हटलं, " छेः छेः ! नाहीं साहेब ! मला अपिलबिपिल कांऽहीं करायचं नाहीं. "

कानजीच्या हृदयांत पसरलेल्या या नव्या प्रकाशाकडे मी पाहातच राहिलों !

—※—

# ब्रह्मानंद साधु

एक दिवस श्रीरविशंकर महाराजांनीं * मला म्हटलं,

" दादा, आमच्या वॉर्डांत एका साधूला खुनाच्या आरोपाखालीं पकडून आणलेला आहे. त्या बिचाऱ्याला कांहीं सल्ला देऊं शकाल का ? "

मीं लागलीच हो म्हटलं आणि तुरुंगाधिकाऱ्यांना कळवून त्या साधूला माझ्या खोलींत मला भेटायला येण्याची व्यवस्था केली.

साधुमहाराज मला भेटायला आले. मीं विचारलं, " कसं काय साधुमहाराज ? काय हकीकत आहे ? "

साधूनें कांहींएक आडपडदा न ठेवतां सर्व सत्य हकीकत मला सांगितली. ती ऐकून घेतल्यावर मीं विचारलं,

" बरं मग ? तुमचा काय विचार ठरलाय ? तुम्ही स्वतांचा बचाव कसा करणार आहांत ? "

---

* रविशंकर महाराज हे गुजराथेंतील एक प्रख्यात व आदरणीय असे मूक प्रजासेवक आहेत. त्यांचें संपूर्ण नांव श्री रविशंकर शिवराम व्यास. जातीनें ब्राह्मण. साधे, कष्टाळू, सत्यशील; गरीब व पीडितांविषयीं कनवाळू. रहाणी अत्यंत गरिबीची पत्करलेली. गांधीजी हिंदुस्थानांत येण्यापूर्वीपासून समाजसेवा करणारे. त्यांचें वय हल्लीं सुमारें ७१–७२ असावें. कॉंग्रेसच्या प्रत्येक लढ्यांत भाग घेऊन वर्षांनुवर्षें जेलमध्यें काढलीं. फारच सेवाभावी, निर्लोभी अशी ही गुजरातची पूजनीय व अलौकिक व्यक्ति आहे. राजकारणांत पडत नाहींत. सेवाकार्यांत खेडोपाडीं असतात. गुजरातेंत सामान्यपणें ब्राह्मणांस " महाराज " असें म्हणतात; व नुसता " महाराज " शब्द वापरला तर त्याचा अर्थ " रविशंकर महाराज " असा होतो, इतके ते लोकांत ख्यातनाम आहेत.

" माझा बचाव दुसरा काय असणार ? ' मला कांहीं माहीत नाहीं, पोलिसांनीं खोटा आरोप ठेवून ही बनावट केस केलीय ' असंच सांगणार. "

" पण महाराज, असं खोटं बोलणं तुम्हांला शोभतं का ? इतर लोकांचं टीक, पण तुम्हीं भगवीं वस्त्रें धारण केलीं आहेत ना ? तुम्ही खोटं कसं बोलूं शकाल ? "

" भगवीं वस्त्रें नेसलों म्हणून काय झालं ? या भगव्या वस्त्रांसाठीं माझ्या जीवाचं मोल देऊन मी काय फांसावर लटकूं ? खरं बोललों तर फांसावरच चढेन ना ? "

" खरं बोललांत तर तुम्ही फांसावरच लटकाल असं कांहीं नाहीं. उलट खरं बोललांत तर तुमचीं हीं भगवीं वस्त्रें बघून न्यायाधिशांच्या मनांत तुमच्याविषयीं आदर उत्पन्न होऊन शिक्षेंत कांहीं सूट मिळेल. वास्तविक तुम्हीं तर सत्याचीच कास धरली पाहिजे. "

साधुमहाराज विचारांत तर पडले. पण " मूलम् नास्ति कुतः शाखा " अशी वृत्ति दिसली म्हणून मीं पुढें म्हटलं,

" महाराज, तुम्ही लोकांना खऱ्या धर्माची शिकवण देणारे ना ? "

" अर्थात् ! यांत काय संशय ? "

" मग तुम्ही लोकांना काय धडा घालून देणार ? तुमचा जीव अथवा तुमचं शरीर म्हणा, हें धर्मापेक्षांहि तुम्हांला अधिक प्रिय आहे असाच ना ? "

महाराज विचारमग्न झाले. भगवद्गीतेंतले बरेचसे श्लोक त्यांना येत होते. त्यामुळें " केवळ नाशवंत देहासाठीं आत्म्याचं बलिदान करायला आपण तयार झालों आहोंत याची जाणीव त्यांना झाली. आणि ते गंभीर विचारांत पडल्याचं त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसून आलं. तें पाहून मीं म्हटलं,

" महाराज, सत्य बोलण्याचा धर्म सोडून तुम्ही स्वतांचं शरीर बचावाल, पण त्या बचावलेल्या नाशवंत शरिराचा शेवटीं काय उपयोग करणार ? "

महाराज स्तब्ध बनले. एवढं सगळं सांगितल्यावर सत्याची कास सोडूं नका असा मीं त्यांना आग्रह केला. मीं म्हटलं,

" माझ्या म्हणण्याचा तुम्ही शांतपणें विचार करा. चार दिवसांनंतर पुन्हां आपण भेटूं आणि मग त्यावेळीं तुमचा बचाव कसा करायचा त्याचा विचार करूं. "

(२)

गोष्ट अशी घडली होती कीं अहमदाबादला दर्यापूर भागांत शेठ अचरतलाल बैरागी नांवाचे ट्रस्टनें एक अन्नसत्र चालविलेलं आहे. तिथें साधूंना जेवण देतात. आरोपी साधुमहाराज त्या अन्नसत्रांत जेवत व आपला बाकी सर्व वेळ झोप ताणणें नि गांजा ओढणें यांत घालवीत. शिष्यांबरोबर मधून मधून कधींतरी गप्पागोष्टी मारणें, थोडेसे संस्कृत श्लोक म्हणणें तत्त्वज्ञानपर थोडीं वाक्यें पोपटासारखीं बोलून दाखवणें, एवढंच या साधू-बुवांचं भांडवल. त्यांचे ते भगवे कपडे नि वरवरची दिखाऊ साधुवृत्ति यामुळें अंधश्रद्धाळू लोकांवर त्यांची थोडीफार छाप पडली होती.

त्याच अन्नसत्रांत जेवायला येणाऱ्या एका तशाच प्रकारच्या पण म्हाताऱ्या साधूबरोबर कांहीं गोष्टींत त्यांचे मतभेद सुरू झाले. दिवसेदिवस ते वाढत गेले. शेवटीं एक दिवस त्याचा इतका अतिरेक झाला कीं त्या दिवशीं जेवणानंतर हात धुवून दोघेहि बाहेर पडत होते, तितक्यांत तो वृद्ध साधू कांहीं बोलला. तें या तरण्याबांड साधूच्या वर्मी लागलें अन् त्यानें त्वेषानें त्या वृद्ध साधूला उचलून रस्त्यावर आदळलं. अर्थात् त्याला मारून टाकण्याचा त्याचा उद्देश किंवा इच्छा नव्हतीच. पण वार्धक्यामुळें आणि रस्ता डामरी–दगडासारखा टणक असल्यामुळें रस्त्यावर डोकें आपटतांच तो वृद्ध साधु एकदम बेशुद्ध झाला. या साधूला त्याच वेळीं कांहीं कामासाठीं बाहेरगांवीं जायचं होतं, आणि गाडीची वेळ होत आली होती, म्हणून न थांबतां तो तडक स्टेशनवर गेला. त्याला कल्पनाहि नव्हती कीं हा वृद्ध साधु इकडे मरेल म्हणून.

त्या वृद्ध साधूला त्या स्थितींत बघून लोक जमूं लागले. " काय झालं ? " " काय झालं ? " एकमेकाला विचारूं लागले. आपटणारा साधू तर केव्हांच निघून गेला होता. लोकांनीं ताबडतोब कांहीं इलाज केले आणि त्याला

बेशुद्ध स्थितींत दवाखान्यांत नेलं, पण साधूचे प्राण केव्हांच निघून गेले होते, असें तेथें कळून आलें. पोलिसांत केस दाखल झाली. ज्या कोणी दोन चार लोकांनीं पाहिलं होतं त्यांनीं सांगितलं कीं दोन साधूंच्या भांडणांत एकानें दुसऱ्याला उचलून रस्त्यावर फेंकलें. फेंकणाऱ्या साधूच्या खाणाखुणा त्यांनीं पोलिसांना सांगितल्या. तपास सुरू झाला. पण साधुबुवा बाहेरगांवीं गेले असल्यामुळें त्यांचा पत्ता लागला नाहीं.

इकडे या आरोपी साधूला त्याच्या पश्चात् झालेल्या या एकंदर घटनेची वृद्ध साधूचें काय झालें, तोच मृत्यु पावला वगैरे कांहींच कल्पना नव्हती. तो आपलं बाहेरगांवचं काम संपवून सुमोरें १५ दिवसांनंतर पुन्हां अहमदाबादला परत आला. पोलीस तपासांत होतेच. तो परत आल्याची बातमी मिळतांच त्याला गिरफदार करण्यांत आलें व केस भरण्यांत आली.

( ३ )

नक्की ठरल्याप्रमाणें चार दिवसांनीं साधुमहाराज पुन्हां मला भेटायला आले, तेव्हां मी म्हणालों :

" मग काय महाराज ? आपला काय विचार ठरला ? "

" आपण म्हणतां तें ठीक आहे, पण एकटा मनुष्य दुसऱ्याला एकाद्या लहान मुलाला उचलावं तसं उचलून फेंकून देईल हें कुणाला खरं तरी वाटेल का ? "

" हें बघा, दुसऱ्याला खरं वाटो न वाटो, पण ही अशक्य वाटणारी गोष्ट प्रत्यक्ष घडली आहे हें तुम्हाला तर माहीत आहे ना ? "

" हो. पण ही गोष्ट न्यायाधीश किंवा ज्युरी खरी मानतील का ? "

" न मानायला काय झालं ? त्या म्हाताऱ्याचें दुबळं शरीर आणि तुमचा हा दणगट देह आणि तरुण वय पाहून कुणीहि ही गोष्ट मानील. "

आपल्या बळकट देहाकडे नजर टाकीत त्यानें म्हटलें, " खरंच ! हें आतांपर्यंत माझ्या लक्षांतच आलं नव्हतं. हा मुद्दा विचारणीय आहे. "

" आणि हें बघा, तुम्हीं बाबाजीला फेंकलंत अशी ज्या दोनचार लोकांनीं साक्ष दिली आहे, ते खोटी साक्ष कशाला देतील ? "

" देतील. पोलिसांच्या शिकवणीमुळें देतील. "

" पण पोलीस तरी तुमच्याविरुद्ध असा कट रचतील कशाला ? तुमचा, त्यांचा कांहीं वैरभाव आहे का ? "

" मुळींच नाहीं. "

" नाहीं ना ? मग या इतक्या सगळ्या लोकांना तुमच्याविरुद्ध जाण्याचं कारण काय ? "

" साहेब, पोलिसांना गुन्हा पकडतां आला नाहीं कीं वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून त्यांना बोल बसतात, म्हणून पोलीस कोणा वाटेल त्याला पकडून आरोपी बनवतात ना ? "

" तुमच्या या सगळ्या गोष्टी वाह्यात् आणि निरर्थक आहेत. कुणाचाहि त्यावर विश्वास बसणार नाहीं आणि निष्कारण फांसावर मात्र लटकाल. खून करण्याचा तुमचा उद्देश नव्हता, रागाच्या भरांत तुम्हीं त्याला आपटलंत, आणि अकल्पित मृत्यु घडला. ही सर्व हकीकत तुम्हीं सत्य सांगितल्याशिवाय कोर्टापुढें कशी येणार ? न्यायाधिशांना कळणार कशी ? सत्य हकीकत लपवलीत तर असंच सिद्ध होईल ना कीं जाणूनबुजून त्याचा तुम्हीं खून केला ? साधुमहाराज, " मला कांहीं माहीत नाहीं. पोलिसांनीं बनावट केस भरली " असं सांगण्यांत तुम्ही स्वतांच्या पायानें फांशीच्या पायऱ्या चढत आहांतच, पण त्याशिवाय तुम्ही एक दुष्ट, खुनी, असत्यवादी, भगव्या वस्त्राला लांछन लावणारे म्हणून लोकांच्या धिक्काराला पात्र होत आहांत ! तेंहि सगळं ठीक. पण धर्माचा सेवक म्हणवून घेऊन, त्याच धर्माचा तुम्ही नाश करतां आहांत. केलेल्या कर्माचें प्रायश्चित्त म्हणून पश्चात्तापहि न करणारे असे महान पापी म्हणून तुम्ही ईश्वराच्या घरीं गणले जाल. म्हणून सांगतों कीं प्राणाची पर्वा न करतां सत्य हकीकत सांगा. सत्य हकीकत सांगण्यानेंच फांशीची शिक्षा न होण्याचा संभव आहे. एवढेंच नव्हे तर प्रमाणांत शिक्षाहि कमीच होईल. "

महाराज विचारांत पडले. माझं म्हणणं त्यांना पटल्याचं चिन्ह दिसूं लागलं, म्हणून मीं म्हटलं,

" आतां तुम्हांला जायला हरकत नाहीं. जाऊन नीट शांतपणें विचार करा आणि आपल्या महान् धर्माचं चिंतन करा. केस सुरू झाली कीं तुम्हांला अहमदाबादला नेण्यांत येईल. त्यापूर्वी मला भेटून जा. त्यावेळीं तुमचा ठाम विचार काय होतो तें पाहून मग आपण अधिक विचार करूं. "

( ४ )

त्यानंतर सुमारें एक महिन्यानंतर साधुबुवा मला भेटायला आले. मीं विचारलें,

" कसं काय महाराज ! केस सुरू होण्याची तारीख ठरली का ? "

" ठरली साहेब. उद्यांपासून सेशनमध्यें चालणार आहे. "

" मग ? तुम्हीं काय ठरवलंत ? "

" दुसरं काय साहेब ? सत्य हकीकत संपूर्ण सांगायची. आपलं म्हणणं मला एकूणएक पटलं. भगवीं वस्त्रें धारण करून खोटं बोलणं हें मृत्युपेक्षांहि भयंकर आहे. "

मला मोठं समाधान वाटलं. मीं एवढंच म्हटलं,

" महाराज, तुमचा निश्चय कायम राखण्याइतकं मानसिक बळ ईश्वर तुम्हांला देवो, अशी मी तुमच्या वतीनें प्रार्थना करीन. सत्य हाच तुमचा बचाव ! आतां तुमच्या नि न्यायाधिशांच्यामध्यें कुठच्याहि वकिलाची वकिली नको कीं कायदेसल्लेगाराची सल्लेगारी नको. तुमचा प्रामाणिकपणा, तुमची सत्यता तुमच्या वतीनें सर्व कांहीं करील. "

दुसरे दिवशीं कोर्टांत हजर राहाण्यासाठीं बाबाजी निघून गेले.

( ५ )

एक दिवस संध्याकाळीं माझ्या मातोश्री आणि इतर कुटुंबीय मंडळी नऊ महिन्यानंतर पहिल्यादांच मला भेटण्यासाठीं आली होती. भेट संपल्या-

नंतर मी आंतल्या दरवाजांतून तुरुंगांत शिरलों त्यावेळीं तिथें सुमारें २५ कैदी दोन दोनच्या रांगेंत उभे होते, त्यांना कैद्याचे कपडे चढविण्यांत येत होते. मी त्यांच्याजवळून माझ्या खोलीकडे पुढें जात होतों. इतक्यांत मागून शब्द आला, " दादासाहेब — "

मीं एकदम मागें वळून पाहिलं. हांका मारणार दुसरातिसरा कुणी नसून ब्रह्मानंद साधुच होते. अर्थात् भगवीं वस्त्रें त्यांच्या आंगावर नसल्यामुळें त्यांच्याजवळून जाऊनहि मी त्यांना ओळखूं शकलों नव्हतों. त्यांना तिथं बघून मनाला शांति वाटली. मनांत म्हटलं, " चला, फांशी तर नाहींच झाली." त्यांनीं म्हटलं, " शिक्षा होऊन आतांच आलों आहें." मीं विचारलं, " किती वर्षांची शिक्षा झाली ?"

महाराज मोठ्या खुशींत होते. त्यांनीं तीन बोटें दाखवलीं. मी समजलों. तीन वर्षांची झाली. पण माझ्या चेहऱ्यावरचा भाव महाराज समजले असावेत. कारण त्यांनीं लागलीच म्हटलं,

" साहेब, फक्त ती – न महिने !"

—*—

# बिचारी आई !

" सुमारें बावीस एक वर्षांची एक तरुण ठाकरडी* बाई नुकतीच आमच्या वार्डांत आली आहे, तिच्यावर आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचा आणि स्वतांच्या दोन लहान मुलांचा खून केल्याचा आरोप आहे. बाई तर सारखी रडते आहे. आपण याल का ? "

असा स्त्रियांच्या वार्डांतून श्रीमती ज्योत्स्नाबेन शुक्ल§ यांचा निरोप माझ्याकडे आला.

लगेच मी जेलरची संमति घेऊन स्त्रियांच्या वॉर्डांत गेलों. त्या बाईचं नांव बहुतकरून " डाही " होतं. श्रीमती ज्योत्स्नाबेननां बरोबर घेऊन मी तिला भेटलों. आणि अधिक चौकशी करायला सुरवात केली. चौकशी करतांना माझी सहानुभूति जसजशी वाढत गेली तसतसा बाईचा भावनावेग अनावर होऊन अश्रूंचा पूर वाहूं लागला. तिचं हृदय दुःखानें तुडुंब भरलं होतं. आणि भावनावशतेमुळें ती स्वतांची पुरती हकीकत पण सांगूं शकत नव्हती. म्हणून त्यावेळीं तिला अधिक कांहीं विचारणें मला बरं वाटलं नाहीं, म्हणून मीं म्हटलं,

" हें बघ ! बिल्कूल घाबरूं नकोस. जेवढं म्हणून कांहीं तुझ्यासाठीं करतां येणं शक्य आहे तेवढं सगळं आम्ही करूं. "

---

*हें एका जातीचें नांव आहे. कोळी, कुणबी वगैरे जातींचे दर्जाची ही जात आहे. अशिक्षित व दरिद्री असेच हे लोक सामान्यतः आहेत. " टाकूर " या शब्दाचें " ठाकरडा " हें तुच्छतादर्शक रूप आहे. सामान्यतः या लोकांस " ठाकरडा " म्हणतात. " ठाकरडी " हें त्याचें स्त्रीलिंगी स्वरूप.

§ या सुरतेच्या एक प्रसिद्ध व कांग्रेस कार्यकर्त्या आहेत. कांग्रेसच्ये प्रत्येक स्वातंत्र्यलढ्यांत त्यांनीं तुरुंगवास सोसला आहे. उत्तम लेखिका व कवियित्री आहेत. मुंबई विधिमंडळाच्या सभासदहि आहेत.

असं तिला आश्वासन देऊन, पुन्हां दुसरे दिवशीं तिला भेटण्याचा बेत मनाशीं करीत मी परतलों. आणि परततांना ज्योत्स्नाबेननां व इतर कॉंग्रेस भगिनींना म्हटलं, "बोलण्याच्या ओघांत तिच्याकडून कांहीं माहिती निघाली तर पहा."

( २ )

डाही स्वभावानें साल्स, अगदीं गरीब गाईसारखी होती. तिच्या सासरीं तरुण नवरा आणि सासू अशीं दोघेंच होतीं. माहेरीं फक्त एक भाऊच होता. भावाची नि नवऱ्याची थोडी थोडी जमीन होती. त्यावर शेतीभाती होती. पण तेवढ्यानें कांहीं भागण्यासारखं नव्हतं. निर्वाहासाठीं सर्वांनाच मजुरी करावी लागे. पण एकंदरींत दोन्हीं कुटुंबें खाऊनपिऊन सुखीं होतीं.

तिचा नवरा मोठा सुस्वभावी नि प्रेमळ होता. डाहीवर त्याचं खूप प्रेम होतं. दोघेहि एकदिलानें राहात होतीं. त्यांना दोन छोटीं मुलेंहि होतीं. एक तीन वर्षांचा, दुसरा एक वर्षाचा.

पण "दुधांत मिठाचा खडा," तशी तिच्या संसाराची स्थिति होती. हिंदु संसारांत "सासू" हा एक मोठा विचित्र प्राणी आहे. कुटुंब कुठच्याहि जातीचं असो. झोपडींत राहाणारं असो नाहींतर राजवाड्यांत राहाणारं असो, सुशिक्षित असलं काय किंवा अशिक्षित असलं काय, शहरांत वास्तव्य असो किंवा खेड्यांत राहाणारं असो—सासू ती सासू नि सून ती सून!

डाहीची सासू म्हणजे एक नमुना होता. उठल्याबसल्या सुनेला अकारण छळण्यांत तिला सासूपणा गाजविल्याचं मोठं समाधान वाटायचं. छळ कांहीं थोडाथोडका नव्हता. रोज पहांटे उठल्यापासून कामाचा रगाडा ओढायचा, घरचं करून, सैंपाक करून ठेवून, सबंध दिवस तिनें मजुरीला गेलंच पाहिजे हा सासूचा कटाक्ष. शिवाय तिनें मिळविलेले मजुरीचे पैसे अगदीं पैन् पै सासू तिच्याकडून काढून घेई. संध्याकाळीं थकूनभागून घरीं आल्यावर पुन्हां चुलीशीं तिलाच बसावं लागे. बरोबरच आहे. घरांत मोलकरणीसारखी फुकट राबणारी सून असल्यावर सासूबाईनीं इकडची

काडी तिकडे कां म्हणून करावी ? सास्वांचा स्वभावच कांहीं विचित्र ! त्यांना वाटतं आपण म्हणजे घरच्या मालकिणी नि सुना म्हणजे मोलकरणी ! कजाग सास्वांच्या मालिकेंत वरच्या क्रमांकाला बसेल अशी जहांबाज होती डाहीची सासू ! एवढा छळ होत होता, तरीसुद्धां आपल्या प्रेमळ नवऱ्याकडे पाहून डाही सारं निमूटपणें सहन करी.

डाहीचं पहिलं बाळंतपण झालं, सासूला नातवाचा लाभ झाला तरीसुद्धां त्या रौद्रस्वभावी चंडिकेची कृपादृष्टि सुनेवर पडली नाहीं. बाळंतीण होऊन तीन आठवडेसुद्धां पुरते झाले नव्हते तोंच तिला सासू सक्तीनें शेतांत मजूरी करायला धाडत असे. आधींच अशक्त, त्यांत कामाचा ताण ! आपल्या कोंवळ्या अर्भकाकडेहि ती लक्ष देऊं शकत नव्हती—अत्यंत दुःखांत व निराशेंत ती दिवस काढीत होती. पण ईश्वरकृपेनें या सगळ्या छळांतून नि कामांतून ती टिकली होती नि जिवंत राहिली होती.

( ३ )

सुमारें दोन वर्षांनंतर दुसरं बाळंतपण आलं. सासूचा छळ कायमच होता. वाढत होता पण कमी झाला नव्हता. डाही कंटाळली. ‘ असें जिणें जगण्यापेक्षां आत्महत्या करून जिवाचा शेवट केलेला काय वाईट ? या छळांतून कायमची तरी मुक्त होईन, ’ असे निराशाजनक विचार तिच्या मनांत वारंवार येऊं लागले.

तिचा नवरा हा छळ बघत असे. तो पाहातांना त्याच्या हृदयांत विलक्षण कालवाकालव होई. पुष्कळवेळां तें बघणंहि त्याला असह्य होई, पण आपल्या कजाग आईपुढें त्याचं कांहीं चालत नसे. आपल्या बायकोला छळांतून मुक्त करण्याचा मार्ग म्हणजे एकतर दोघांनीं आईपासून वेगळें राहाणें. किंवा आईला घरांतून वेगळें राहायला जा म्हणून सांगणें. पण यापैकीं एकाहि गोष्टीची कल्पना त्याच्या मातृभक्त हृदयाला सहन होत नव्हती. यामुळें तो सर्व बघूनहि गुपचुप बसत असे. आणि डाही नवऱ्याकडे बघून सर्व सहन करीत असे.

शेवटीं डाही खूपच कंटाळून गेली. थोडे दिवस तरी या त्रासांतून सुटण्यासाठीं शेजारच्याच गांवीं तिचा भाऊ राहात होता त्याच्याकडे राहायला जाण्याचा तिनें विचार केला. नवऱ्याची या बेताला संमति होती, पण अर्थात् सासूच्या नकळत ही संमति मिळाली होती.

आणि मग एक दिवस सकाळीं आपल्या दोघां मुलांना घेऊन ती भावाच्या घरीं निघाली. पण गांवाच्या सीमेवरच समोरून भाऊ भेटला. त्यानें विचारलं,

"ताई, कुठं निघालीस ?"

प्रश्न ऐकतांच बहिणीला रडूं कोसळलं. रडतां रडतां दुःखकहाणी सांगून तिनें म्हटलं,

"भाऊ, मी तुझ्याकडे थोडे दिवस राहायला येण्यासाठीं निघालें आहे."

तिची करुण कहाणी ऐकून भावाला अर्थात्च वाईट वाटलं. बहिणीनें आपल्या घरीं यावं असंहि वाटलं. पण सासूला नि नवऱ्याला न विचारतां तिनें सासरहून निघून यावं हें त्याला अयोग्य वाटलं. म्हणून त्यानें विचारलं,

"तें खरं. पण तुझ्या सासूनें तुला परवानगी दिली आहे का ?"

"त्या कधीं परवानगी देणार नाहींत मग त्यांना विचारायचं कशाला ? मीं नाहीं विचारलं."

"तुझा नवरा काय म्हणाला ?"

"ते बिचारे आईपुढें कांहीं बोलूं शकत नाहींत. पण तूं आपली त्यांची संमति आहे असं धरून चाल ना."

कजाग सासूला घाबरून नवऱ्याच्या संमतीनें आलें ही गोष्ट भावापासूनहि तिनें लपवून ठेवली. त्यामुळें भावाचा गैरसमज झाला. त्यानें म्हटलं,

"हें बघ. सासू-नवऱ्याला न विचारतां स्वताचं घर सोडून माहेरीं येणं ठीक नाहीं. तूं आतां घरीं परत जा. या एकदोन दिवसांत मीच येतों नि तुझ्या सासू-नवऱ्याला विचारून तुला माहेरीं घेऊन येतों."

असं सांगून भाऊ आपल्या कामाला निघून गेला आणि डाही मागें परतली.

(४)

मागें परततांना तिच्या डोक्यांत विचारांचं काहूर माजलं. घनघोर अंधकारानें दाटलेला भयानक भविष्यकाळ नजरेसमोर उभा राहिला. नवऱ्यावर तिचं खूप प्रेम होतं. पण त्याबरोबरच त्याच्याविषयीं एक प्रकारची तिरस्काराची भावनाहि तिच्या मनांत मधून मधून तीव्र बने. अशा वेळीं क्रोधानें ती मनांतल्या मनांत म्हणे, 'पुरुषासारखा पुरुष, पण या कैदासणीच्या पंजांतून याला कांहीं मला सोडवतां येत नाहीं!'

पत्नी पतीच्या पराक्रमावर जगते, त्याच्या आधारावर विसंबून राहते. पण तिची या बाबतींत घोर निराशा झाली होती. नवऱ्याच्या द्विधा मनःस्थितीची तिला कुठून कल्पना असणार? त्याला बायको हवी होती, आईहि हवी होती. दोघीहि त्याला सारख्याच प्रिय होत्या. तोहि मनांतून दुःखी होता, कष्टी होता, पण नवऱ्याच्या नैसर्गिक मातृप्रेमाकडे—स्वतांच्या दुःखावेगांत नवऱ्याच्या मनःस्थितीकडे तिचं कसं लक्ष जाणार?

चालतां चालतां तिचं विचारचक्रहि चालू होतं. 'आज माझी आई जिवंत असती तर मला तिनें असं आल्यापावलीं गांवच्या वेशीवरूनच परत पाठवलं असतं का? उलट मला कुशींत घेऊन माझ्या दुःखाचा भार हलका केला असता, माझ्यावर अश्रू ढाळले असते. माझ्या पाठीवरून हात फिरवून माझं सांत्वन केलं असतं! खरंच, माझं आतां या जगांत कोण आहे? नवरा नि भाऊ दोघे असून नसून सारखेच. मग मी जगूं तरी कशाला? नि कुणासाठीं जगूं?'

या प्रकारच्या विचारांच्या वावटळींत घराकडे परत जात असतां आत्महत्येचा विचार पावलागणिक बळावत चालला व शेवटीं तिचा आत्महत्येचा निश्चय झाला. याच सुमारास तिची नजर एकदम रस्त्याच्या कडेला असलेल्या विहिरीकडे गेली व तींत पडून या जगास रामराम ठोकून आपल्या कष्टी दुःखद जीवनाचा अंत करण्यास ती कटिबद्ध झाली. आपल्या दोन बालकांना तिनें विहिरीपासून दूर एका सुरक्षित जागीं ठेवलं नि ती कांहींशा निश्चयानें विहिरीजवळ आली, तिच्या पडक्या कांठावर उभी राहिली, मागें वळून तिनें त्या दोन अर्भकांकडे पाहिलं. अंतःकरणांत कालवाकालव सुरू

झाली. मुलांकडे ओढ घेऊं लागणारं मातृहृदय म्हणूं लागलं, ' जीव देऊन तूं सुटशील, पण तुझ्यामागें या कोंवळ्या अर्भकांची काय दशा ? याचा विचार तूं केलास का ? तुझ्यामागें त्यांचा सांभाळ कोण करणार ? मायेची पांखर कोण घालणार ? त्यापेक्षां बरोबरच त्यांना घेऊनच मार ना उडी विहिरींत ! तुझ्याबरोबर तींहि सुटतील बिचारीं !' हृदयाच्या या तत्काळ हांकेनें तिला विहिरींत उडी घेववली नाहीं !

याप्रमाणें मनाचा कौल मिळतांच ती वेगानें मुलाजवळ आली. खालीं बसली. छोट्या अर्भकाला उचलून छातीशीं धरलं. मोठ्याला मांडीवर घेतलं. दोघांचे मटामट पापे घेतले. मग आंगावरची "ओढणी*" काढून त्यांत त्यांना लपेटून पाठीशीं घट्ट बांधलं. अन् विहिरीवर येऊन आंत उडी मारली ! पण विधिघटना कांहीं वेगळीच होती. ज्या मृत्यूला भेटण्यासाटीं ती विहिरींत पडली, तो मृत्यु ती पडतांचक्षणीं दूर सरकला. विहिरींत पडतांचक्षणीं कंबरेला बांधलेली ओढणीची गांठ सुटली आणि दोन्हीं अर्भकें बुडालीं. पोटच्या गोळ्यांना बुडतांना पाहातांच तिचें दुःख अनावर झालें. पोटांत कालवाकालव झाली ! "माझ्या बाळांना कुणी वांचवा" "धांवा" म्हणून जोरजोरांत ती ओरडूं लागली.

ओरड ऐकून बाजूच्या शेतांत काम करीत असलेले शेतकरी धांवून आले. डाहीला बेशुद्धावस्थेंत त्यांनीं बाहेर काढली ! पण मुलांचीं मृत शरीरेंच हातीं लागलीं !

या करुण प्रसंगानंतर रीतसर कायद्याप्रमाणें सारे विधी होऊन डाही तुरुंगांत आली होती.

## ( ५ )

मला तर खात्रीच होती कीं, या सर्व प्रकरणीं कुठेंचहि न्यायाधीश या मुलाच्या करुण मृत्यूला डाहीनें हेतुपुरस्सर खून केला असं कधींच मानणार

---

* गुजराथी स्त्रिया आंतून परकर नेसून वर पांचवारी साडी नेसतात तिला ओढणी म्हणतात.

नाहींत. आणि डाहीनें आत्महत्येचा प्रयत्न केला यासाठीं तिला कांहीं घोर शिक्षा होणार नाहीं. कां, कोण जाणे! पण सर्वसाधारण लोकांची अशीच समजूत झालेली आहे कीं एकाद्याच्या हातून अगदीं अनिच्छेनें अगर चुकून, नकळत हत्या घडली तरी तो खुनी ठरतो, आणि खुनीला एकच शिक्षा व ती म्हणजे फांशी! ही समजूत खरी नाहीं.

मीं डाहीला सल्ला दिला नि म्हटलं, "तुझ्या या केसमध्यें तुला बचाव करण्याची कांहींएक जरूरी नाहीं. तुझ्या नवऱ्यानें पैशाचं पाणी करून वकील करण्याचीहि जरुरी नाहीं. तुझी ही करुण कहाणी शब्दानूशब्द कोर्टांत सांगण्याचं कामच तुला फक्त करायचं आहे. एवढंच बघायचं कीं लोकापवादाची किंवा स्वतःच्या आईची भीति न बाळगतां तुझ्या नवऱ्यानें तुझ्या सासूच्या छळाविषयीं खरी हकीकत कांहींहि लपवालपवी न करतां सांगायला हवी."

माझा हा सल्ला ऐकून तुरुंगांतील इतर स्त्रियांनीं आश्चर्यानें विचारलं,

"दादासाहेब, कोर्टांत हिनें खरं सांगितलं तर दोन मुलें हिच्या हातून मेली हें कळल्यावर हिला फांशी नाहीं देणार तर काय शिक्षा देणार?"

"छेः! फांशी कसली होते? कुठचीहि आई पोटच्या गोळ्यांना मारायला कधीं तयार होईल का? डाहीला कडक शिक्षा करणें म्हणजे "जखमेवर मीठ चोळणें" आहे. आतां तिला किती शिक्षा होईल हें आतांच कसं सांगतां येईल? तें सर्व न्यायाधिशांच्यावर अवलंबून. पण माझ्या अंदाजाप्रमाणें सहा महिन्याची शिक्षा व्हावी. अगदीं कडकच केली तर फार तर एक दोन वर्षांची, त्यापेक्षां जास्त नाहींच."

हें ऐकून सर्वांचा जीव जणूं भांड्यांत पडला. डाहीनें तर माझ्या सल्ल्या-प्रमाण चालण्याचं मोठ्या आनंदानें कबूल केलं.

खरोखरच तिच्या नवऱ्याला धन्यवाद दिले पाहिजेत. त्यानें कोर्टांत सर्व सत्य हकीकत सांगितली. डाहीच्या दुःखाचं, तिच्या छळाचं वर्णन करतांना त्या प्रेमळ पतीचा भावनावेग अनावर होत होता. दाटलेल्या कंठांतून शब्द फुटत नव्हते. डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या.

न्यायाधीश झाला तरी तो एक माणूसच ना? सर्वांचे डोळे ओले करणारी ती करुण कहाणी ऐकून न्यायाधिशाचं हृदय द्रवलं. डाहीला अपराधी तर ठरवली. पण शिक्षा मात्र अगदींच सौम्य—शिक्षा नव्हेच म्हणायची ती—फक्त सहा महिने साधी कैद ! मीं आपलें अंदाजानें सहा महिने म्हटलें होतें.

निकाल ऐकल्यावर डाहीसकट सर्व स्त्रियांची अगदीं ठाम समजूत झाली, कीं मी एक भविष्य वर्तवणारा ज्योतिषी आहें !

शिक्षा होऊन डाही तुरुंगांत आली. पण ती साधी कैदी असल्यामुळें तिला कैद्यांचे कपडे मिळेनात कीं शिक्षेंत सूटहि मिळेना. तें पाहून मी तुरुंगाधिकाऱ्यांकडून तिच्यासाटीं कपडा नि काम मिळवलं. डाहीला शेवटीं एक महिन्याची माफी मिळाली. म्हणजे शिक्षा अवघी पांच महिनेच झाली !

—*—

# कोपिष्ट पण प्रेमळ पति

धोळका शहराचे बाजूस राहाणाऱ्या, सुमारें पंचवीस वर्षे वयाच्या एका तरूण शेतकऱ्याची ही कथा आहे. स्वतांच्या पत्नीचा खून केल्याचा याच्यावर आरोप होता. तुरुंगांतल्या दवाखान्यांत मी रोग्यांना भेटायला जात असे. तिथें एक दिवस हा मला भेटला अन् स्वतांची हकीकत सांगून त्यानें सल्ला देण्याची मला विनंति केली.

त्याच्या हातून पत्नीला मृत्यु आला होता ही गोष्ट खरी, पण तिला ठार करण्याचा त्याचा उद्देश मुळींच नव्हता. दोघांचं एकमेकांवर गाढ प्रेम होतें. पण हे पतिदेव जेवढे प्रेमळ तेवढेच रागीट! अगदीं जमदग्नीचा अवतार! मला वाटतं राग आणि अनुराग या दोन्हीहि एकाच वृत्तीच्या दोन बाजू असाव्यात! गाढ प्रेम! तीव्र क्रोध! ज्यावेळीं जी तार छेडली जाईल त्याप्रमाणें भाव प्रकट होतो.

एक दिवस नेहमींप्रमाणें नवरा शेतांत कामाला गेला होता. नित्यक्रमाप्रमाणें दुपारीं जेवण घेऊन त्याची बायको शेतांत गेली. पण त्या दिवशीं तिला थोडा उशीर झाला होता म्हणून म्हणा किंवा जेवण त्याला हवं होतं तसं नव्हतं म्हणून म्हणा, पण स्वारी भडकली. आधींच जठराग्नि भडकलेला, त्यांत क्रोधाग्नीची भर! मग काय विचारतां? संतापानें बेफाम होऊन त्यानें हातांत बैलाला टोंचण्याची आर होती ती एकदम बायकोकडे भिरकावून तो गरजला,

“एवढा उशीर कां? बोल इतका वेळ, काय करत होतीस?”

दुर्दैवानें फेकलेली ‘आर’ नेमकी तिच्या डोक्यावर आदळली. आणि तत्क्षणीं मूर्च्छा येऊन बाई धाडकन् खालीं कोसळली! तें पाहातांच स्वारी भानावर आली. कळवळली. पश्चात्तापानें स्वतांच्या रागीट स्वभावाला बोल लावीत तो पुढें धांवला. बायकोला उचलून तिचें डोकें मांडीवर घेऊन तिला सावध करूं लागला. डोक्यावर, तोंडावर पाणी शिंपडलें, हलवून

पाहिलं, हर प्रयत्न करून पाहिलें पण ती शुद्धीवर येईना! मग त्याचा धीर सुटला. रडूं कोसळलं. पण तसेंच बसून काय होणार? तिला शुद्धीवर आणण्याचे पुढचे उपाय तर केले पाहिजेत. या विचाराबरोबर आपल्या मांडीवरचं तिचं डोकें हलकेंच खालीं ठेवून तो उठला. गाडीला त्यानें बैल जोडले. तिला उचलून गाडींत घातलें आणि धोळक्याकडे गाडी हांकारली. त्याला आशा होती कीं धोळक्याला दवाखान्यांत नेलं कीं पुढचे उपाय होतील.

ही घटना शेतावर घडली तेव्हां ती प्रत्यक्ष पाहाणारें कोणीच नव्हतें.

बाई रस्त्यांतच मेली होती पण खुळ्या आशेनें तो तिला घेऊन धोळक्याला गेला होता. पोलिसांना समजतांच त्यांनीं येऊन त्याला पकडलं, आणि खुनाचा आरोप ठेवून तुरुंगांत त्याची रवानगी गेली.

बायकोला मारतांना त्याला कुणींहि पाहिलं नव्हतं. आतां मुख्य प्रश्न असा होता कीं स्वतांच्या हातून जो गुन्हा झाला तो कबूल करावा कीं तिला मारतांना कुणींहि पाहिलं नसल्यामुळें त्या गोष्टीचा फायदा घेऊन " मला कांहीं माहीत नाहीं. माझ्या गैरहजिरींत माझ्या बायकोचा कुणीतरी खून केला व मी तिला औषधोपचारासाठीं आणीत असतांना वाटेंतच ती मेली" असं सांगून, प्रत्यक्ष किंवा इतर पुराव्याच्या अभावीं सुटून जाण्याचा संभव होता त्या दिशेनें जावें?

गुन्हा कबूल करण्यांत शिक्षा होणार हें तर ठाम नक्की. त्याला सल्ला देणाऱ्या त्याच्या नातलगांची आणि स्नेही मंडळींची अशीच इच्छा होती कीं त्यानें गुन्हा नाकबूल करावा. आणि " मला कांहीं माहीत नाहीं." असेंच ठासून सांगावें.

मी विचारांत पडलों. त्यानें सत्य सांगितलंच पाहिजे हें तर निःसंशय, पण खरं बोलून होणाऱ्या शिक्षेची जोखीम तो पत्करायला तयार होईल किंवा काय याची मला शंका होती. एकंदर साधकबाधक विचार करून मीं त्याला म्हटलं,

" तुला सत्य बोललं पाहिजे. गुन्हा कबूल करण्यांत तुझं हित आहे."
बायकोवरील त्याचं प्रेम आणि मृत्यूच्या शिक्षेची भीति या दोन भावना

नजेरसमोर ठेवून मीं त्याची समजूत करण्याचा प्रयत्न केला. "आपण असं समजूं कीं या गुन्ह्याबद्दल तुला कांहींच माहीत नाहीं असें तूं म्हटलेंस. पण कोर्टानें तुला असं विचारलं कीं तुझ्या बायकोला कुणीं मारलें आणि तें कां मारलं? तर तूं कांहीं उत्तर देऊं शकशील का?"

"नाहीं साहेब, मी कांहींच सांगूं शकणार नाहीं."

"बरं, तुला कुणाचा संशय येत असेल तर त्याचें नांव सांग म्हणून म्हटलं तर तूं तें सांगूं शकशील काय?"

"नाहीं."

"तुझं कुणाबरोबर वैर होतं का? कीं त्यामुळें त्या वैराचा सूड घेण्यासाठीं त्यानें तुझ्या बायकोला ठार मारलं?"

"छे, माझं कुणाबरोबरहि कधींच वाकडें नव्हतें."

"पण मग तुझ्या बायकोचा खून कसा झाला याचा कांहींतरी खुलासा तर मिळालाच पाहिजे ना?"

"दुसरं असं कीं जरी परोणी (आर) मारतांना तुला कुणीं पाहिलं नसलं तरी तूं आणि तुझी बायको–तुम्ही केवळ दोघेंच त्यावेळीं शेतांत असतांना तिला मृत्यु आला, तेव्हां तो कसा आला? याचा तर खुलासा व्हायला हवा ना? आणि असा खुलासा जर समाधानकारक नाहीं वाटला तर असंच अनुमान निघणार कीं तूंच कांहीं तरी केलेंस व त्यामुळेंच तिचा मृत्यु आला. कारण तिच्या डोक्यांत घाव घालणारा कुणीतरी असलाच पाहिजे ना? व तो तुझ्याशिवाय दुसरा कोण असणार? आणि जर अनुमान निघालं तर हेतुपुरःसर तूंच तिचा खून केलास असंच ठरणार नि मग त्याचा शेवट म्हणजे तुला फांशीचीच शिक्षा!"

माझं बोलणं तो लक्षपूर्वक ऐकत होता. माझ्या बोलण्यांत बराच अर्थ भरला आहे असं त्याला वाटतं आहे हें माझ्या लक्षांत येतांच मीं पुढें म्हटलं,

"भाई, तुझं तुझ्या पत्नीवर खूप प्रेम होतं आणि तीहि तुझ्यावर प्रेम करीत होती. खरं ना? दुर्दैवानें तुझ्या हातून अकल्पितपणें तिचा मृत्यु

घडला! आतां प्रत्यक्ष ती तुझ्या दृष्टीसमोर नाहीं, म्हणून तूं तिच्याशीं बेइमान होऊन धडधडीत खोटं बोलण्याचं पाप करणार का? खरं म्हणजे कृतकर्मांचा पश्चात्ताप करून घडलेल्या पापाचें प्रायश्चित्त करण्याऐवजीं तूं खुशाल खोटं बोलून ईश्वरासमोर आणि पत्नीसमोर पापाचा धनी कां बनतोस?"

तो तरूण शेतकरी विचारमग्न झाला. त्याला माझं म्हणणं पटतं आहे हें त्याच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसूं लागल्यानें मी थोडा वेळ स्तब्ध राहिलों. तो विचारमग्नच होता. पांच मिनिटांनंतर त्याची मुद्रा एकाएकीं करारी दिसूं लागली. आणि त्यानें म्हटलं,

"दादासाहेब, बस्स ठरलें! मीं आतां निर्धार केलाय."

"काय निर्धार?"

"दुसरा काय साहेब? निश्चय हाच कीं जें जें कांहीं घडलंय तें तें सर्व शब्दानुशब्द खरं सांगायचं माझ्या पत्नीची क्षमा मागावयाची व ईश्वरावर अचल श्रद्धा ठेवायची."

मला मोठं समाधान वाटलं. त्याला प्रोत्साहन देत मीं म्हटलं,

"भाई, तुझा निर्धार अचल टिकविण्याची ईश्वर तुला सुबुद्धि आणि बळ देवो."

नंतर मीं त्याला अशीहि सूचना दिली कीं "वकील वगैरे करण्याची तुला काय जरूर? निष्कारण खर्च नको करूंस."

आणि ही पण गोष्ट त्याला पटली.

या खटल्यांत दीर्घकाल चालण्यासारखं कांहींच नव्हतं. थोडक्यांतच काम संपलं. आणि या शेतकरीबंधूला चार वर्षांची शिक्षा मिळाली. शिक्षा होऊन आल्यावर तो मला भेटला. मोठ्या खुशींत होता तो! दोन प्रकारचं समाधान त्याच्या मनाला लाभलं होतं. एक शिक्षा कमी झाल्याचं नि दुसरं समाधान खरं बोलल्याचं!

मीं म्हटलं,

"हें तुझं समाधान ठीक आहे. पण तुला ही जी शिक्षा झाली ती निर्दोष पत्नीला मारल्याबद्दल प्रायश्चित्त भोगण्यासाठींच मिळाली आहे

आणि ती भोगण्यांत जणूं तूं पत्नीबद्दल गाढ प्रेम आणि निष्ठा दाखवीत आहेस असं तूं नाहीं का मानीत ?"

लज्जेची मधुर छटा त्याच्या चेहऱ्यावर पसरली. मीं म्हटलं,

"बरं, या शिक्षेविरुद्ध तुला अपील करायचं आहे का ?"

थोडा वेळ तो मुग्ध राहून एकदम म्हणाला, "नाहीं. मुळींच नाहीं. पत्नी तर कायमची गेली. तिला मीं घालवली. त्याचं प्रायश्चित्त भोगण्या-साठीं तुरुंगांतलीं हीं चार वर्षं कांहींच नव्हेत."

जीवनाच्या खोल तत्त्वज्ञानाचा जणूं त्याला साक्षात्कार झाला असावा असा संतोष त्याच्या चेहऱ्यावर पसरलेला होता.

—※—

खंड २ रा

# मृत्यूवर विजय

# महमद मूसा

"महमद, तूं कांहीं खरी हकीकत सांगत नाहींस! माझ्यावर तुझा विश्वास नाहीं का? तुला माझ्या हातून होईल तेवढी मदत करावी म्हणूनच मी इथं येत असतों. तूं खरं बोल."

फांशीची शिक्षा झालेल्या कैद्यांच्या वार्डांत, भक्कम लोखंडी गजांच्या पिंजऱ्यांत बसलेल्या व डोळे पाण्यानें थबथबलेल्या महमदला मीं सद्गदित स्वरांत म्हटलं. माझे उद्गार ऐकून त्याचे पहारेकरी पण द्रवले. त्यांपैकीं एकानें म्हटलं,

"महमद, खरोखरच तूं या दादांना अजून ओळखत नाहींस. हे तुला शक्य तितकी मदत करतील आणि फांशींतून तुझी मान सोडवतील. तूं मनांत बिलकूल शंका बाळगूं नकोस."

महमद एकदम हुंदके देऊन रडायला लागला!

तुरुंगांत प्रत्येक कैद्याजवळ जाऊन त्याला जी कांहीं मदत करतां येण्यासारखी असेल ती करून त्याची सेवा करण्याचं सद्भाग्य मला लाभलं होतं. कुणाच्या शिक्षेविरुद्ध अपील करणें, तर कुणाच्या सुटकेसाठीं अर्ज लिहिणें, तर आणखी कुणासाठीं औषधपाण्याची व्यवस्था करणें—अशीं विविध कार्यक्षेत्रें माझ्यापुढें होतीं नि मी त्यांत वावरत होतों. पण, त्यांतल्या त्यांत फांशीची शिक्षा झालेल्या कैद्यांना भेटणें, त्यांचीं अपीलें किंवा दयेचे अर्ज लिहून देणें, ज्यांची फांशीची शिक्षा कायम झाली आहे अशांना मृत्यूच्या दिवसापर्यंत रोज जाऊन भेटणें, सांत्वनाचे चार शब्द सांगणें, या गोष्टी मला अति महत्त्वाच्या नि मोलाच्या वाटत. अशा कैद्यांना भेटण्यांत रोज माझा तास दीड तास निघून जाई. त्यांच्या सहवासांत मला नवीन ज्ञान प्राप्त झालं. आणि फांशीवर चढणाऱ्या कैद्याची मनःस्थिति कशी असते नि कशी होते त्याचं मीं निरीक्षण केलं, अभ्यास केला. आतांपर्यंत फांशीच्या कैद्यांना भेटण्याची मला खूप उत्सुकता होती ती साबरमतीच्या तुरुंगांत पुरी झाली.

माझ्या या तीव्र इच्छेमागची थोडी पूर्वपीठिका सांगतों. इ. स. १९४०–४१ मध्यें व्यक्तिगत सत्याग्रहाच्या वेळीं मला येरवडा तुरुंगांत हलविण्यांत आलं होतं. माझ्या बरोबरच सरदार वल्लभभाई पटेल, स्व. भुलाभाई, श्री. बाळासाहेब खेर, श्री. मोरारजीभाई, श्री. मंगळदास पक्वासा वगैरे आठ मंडळी होती. आमच्या वार्डासमोरच रस्त्यापलीकडे फांशी देण्याची जागा होती. मध्यें उंच भिंत असल्यामुळें पलीकडचं कांहींएक दिसत नसे. आमच्या वार्डापासून थोड्याच अंतरावर फांशीच्या कैद्यांना ठेवण्याच्या खोल्या होत्या.

एका रात्रीं मी जागा झालों तेव्हां कुणीतरी उच्च स्वरांत रामनाम लल्कारत होतं. मीं मनाशींच म्हटलं, "कोण बरं आतां या वेळीं अपरात्रीं रामनामाचं भजन करीत असेल?" तुरुंगांत रात्रीच्या वेळीं मोठ्यांदा बोलायची बंदी होती. अन् त्यामुळेंच तें उच्च स्वरांतलं नामस्मरण ऐकतांच मी विचारांत पडलों. विचार करतां करतां एकदम मनांत आलं, "उद्यां कुणीतरी फांशी जाणार असेल आणि तोच हें रामाचं नामस्मरण करीत असेल! कारण आवाज पलीकडून फांशीच्या कैद्यांच्या खोल्यांकडून येत होता. हो, तसंच होतं. माझी झोप पार उडाली. मन अस्वस्थ झालं. डोक्यांत विचारचक्र सुरू झालं. मनुष्य मरणास कसा तयार होत असेल? मृत्यूच्या विक्राळ जबड्यांत सांपडलेल्या माणसाची मनःस्थिति कशी होत असेल? त्याच्या मनांत अखेरच्या क्षणीं काय विचार येत असतील? समोर भयाण मृत्यु ठाकलेला बघून तो घाबरून जात असेल कीं त्याचं मन मृत्यूला भेटण्यासाठीं तयार होत असेल? डोक्यांत विचारांचं काहूर माजलं.

खरंच! आपण फांशीची शिक्षा काय म्हणून द्यावी? वाटेल तो गुन्हा असला–अगदीं घोर गुन्हा असला–म्हणून त्या गुन्ह्यासाठीं माणसाला जिवंत मारणें हें खरोखरच योग्य आहे का? फांशीची शिक्षा आज अनेक वर्षांपासून देण्यांत येत आहे, तरी पण खून, हत्या वगैरे गुन्हे कांहीं कमी झाले आहेत का?

माणूस गुन्हा करतो त्याला अनेक कारणें असतात. त्यांत समाजाचाहि कमीजास्त प्रमाणांत दोष असतो कीं नाहीं? राज्याचाहि दोष नाहीं का?

जर असेल, तर मग त्याला फांशी कां द्यावें ? त्यापेक्षां त्याला जिवंत ठेवून सुधारण्याचा प्रयत्न करणें हेंच जास्त योग्य नाहीं का ?

असे अनेक विचार मनांत येऊं लागले, मन अधिकाधिक अस्वस्थ बनूं लागलें नि सकाळपर्यंत डोळ्याला डोळा लागला नाहीं !

दुसरे दिवशीं भल्या पहाटे तुरुंगांतले डॉक्टर आमच्या वार्डांत आले नि सांगून गेले कीं "आज 'हॅन्गिग्' (फांशी) आहे; त्यामुळें तुमच्या वार्डांत यायला जरा उशीर होईल मला."

म्हणजे रात्रीं मीं जो तर्क केला होता तो बरोबर होता. फांशीच्या जागेतलं आम्हांला कांहींच दिसूं शकत नव्हतं. पण माझं मन आणि कान दोन्हीहि त्या फांशीच्या कैद्याकडे होते. फांसाकडे जाणारा कैदी कसा चालत जात असेल, त्याच्या चेहऱ्यावर कोणते भाव उमटत असतील, मनांत कसली खळबळ उडत असेल वगैरे जाणण्याची तीव्र इच्छा झाली. आमच्या वार्डांत बाहेर जाण्यासाठीं जो दरवाजा होता त्याला पायऱ्या होत्या त्यावर मी चढलों आणि उंच पाय करून भिंतीवरून बाहेर डोकावलं. कैदी व त्याला आणीत असलेलं मंडळ दृष्टीला पडलं. कैद्याचे दोन्ही हात एका हातकडींत जखडलेले होते. त्याच्या आजूबाजूला आणि मागेंपुढें संगीनधारी एक डझनभर तरी पहारेकरी शिपाई चालले होते! त्याच जमावांत मॅजिस्ट्रेट, सुपरिन्टेंडेंट वगैरे लोक होते. हात बांधलेला बिचारा कैदी "नमः शिवाय" "नमः शिवाय" म्हणत जलद पावलें टाकीत चालला होता! जणूं मृत्यूला भेटायला तो अधीर झाला होता! फक्त बावीस अगर पंचवीस वर्षांचा ऐन तारुण्यांतला तो कैदी बघतांच मी थरारलों! हा तरुण चालता बोलता पुतळा आतां एकदोन मिनिटांत हें जग सोडून जाणार! या विचारानें मन गुदमरून गेलं. पण—पण माझ्या हातून काय होणार? विकल स्थितींत, विव्हल हृदयानें, व शून्य मनानें मी पायऱ्यांवरून खालीं उतरलों.

त्याच वेळीं फांशीच्या खोलीचा दरवाजा उघडल्याचा आवाज आला.

दुसरा आवाज "टक्–टक्–टक्..." तो फांशी घडवंचीच्या पायऱ्या चढला!

एकदोन मिनिटें नीरव शांति! काळजाचा थरकांप उडवणारी भयाण शांति!

नंतर "खट्" असा मोठा आवाज झाला. फांशी झाली! तो फांसावर लटकला! त्याच्या गळ्याभोंवतालीं दोरीचा फांस घट्ट आवळला गेला. तो लोंबकळत राहिला.

प्रत्यक्ष नाहीं पण मनश्चक्षूपुढें हें संपूर्ण चित्र उभं राहिलं. त्या दृश्यानें, त्या आवाजानें सारीं गात्रें सुन्न झालीं! तरी पण फांशीची शिक्षा झालेल्यांना बघावं, त्यांच्याशीं बोलावं, अशी विलक्षण उत्कंठा रात्रंदिवस मनाला लागली. म्हणून, साबरमती तुरुंगांत इतर कैद्यांना भेटण्याची सवलत जेव्हां मला मिळाली तेव्हां मुख्यत्त्वें फांशीच्या कैद्यांना भेटण्याची इच्छा मीं दर्शवली आणि त्याप्रमाणें मला तशी परवानगीहि मिळाली.

साबरमती तुरुंगांत मी एकोणीस महिने होतों. त्या दरम्यान पांच-जणांना फांशी देण्यांत आलं. त्या पांची जणांचा मला निकट परिचय झाला होता.

(२)

या पांच फांशीकैद्यांपैकीं माझ्या प्रथम परिचयांत येणारा महमद मूसा हा कैदी.

त्याला भेटून त्याच्या केसची एकंदर हकीकत ऐकून त्याच्यासाठीं दयेचा अर्ज वगैरे करण्याचं काम मीं सुपरिन्टेंडेंटकडून मुद्दाम मिळवलं होतं.

लागोपाठ दोन दिवस महमदला भेटून त्याचेशीं विचारपूस केली, केसची हकीकत जाणण्याचा प्रयत्न केला. त्याच्या केसचे कागदहि वाचले. पण तो मन मोकळें करून कांहींहि हकीकत सांगेना; आणि स्वतां पूर्ण निर्दोषी आहे, असंच तो जेव्हां मला सारखं सांगूं लागला तेव्हां सुरवातीला लिहिल्याप्रमाणें मला त्याला म्हणावं लागलं.

माझे उद्गार ऐकून त्याला एकदम खूप रडूं कोसळलं. फांसावर चढावं लागणार हें दुःख तर होतंच, पण त्याबरोबरच माझ्याशीं तो प्रामाणिकपणें वागत नाहीं याचंहि दुःख त्याला होत असावं असं मला वाटलं.

त्यानें माझ्याजवळ गुन्हा कबूल केला आणि सत्य हकीकत सांगितली. माझ्या अंदाजाप्रमाणेंच हकीकत निघाली.

त्याचा बाप त्याच्या लहानपणींच वारला होता. आणि आई दुसऱ्या-बरोबर पुनर्विवाह करून निघून गेली होती. आपल्या आजोबाजवळच तो लहानाचा मोठा झाला. त्याचा तो आजोबा म्हातारा अभराम अजून हयात आहे आणि मधूनमधून मला मोठ्या प्रेमानें आणि आदरानें भेटायलाहि येतों.

महमदच्या बायकोची चालचलणूक चांगली नव्हती. तिला एक तीन वर्षांची मुलगी होती. एक दिवस दुपारीं बारा साडेबाराच्या सुमारास तो शेतांतून घरीं आला तेव्हां एका तरुणाला घरांतून बाहेर पडतांना त्यानें ओझरतं पाहिलं. शंकेनें त्याचं मन व्याप्त झालं. ताबडतोब तो वरती माडीवर सैंपाकघरांत बायको होती तिथं गेला आणि त्यानें विचारपूस केली.

कुणीहि येऊन गेल्याचं तिनें अगदीं साफ नाकबूल केलं, एवढंच नव्हे तर उलट नवराच संशयी आहे असा त्याचेवर आरोप करून, ती त्याला वाटेल तसं अद्वातद्वा बोलूं लागली.

स्वाभाविकच तो रागानें बेफाम बनला. जवळच भाजी चिरण्याची सुरी पडली होती ती उचलून त्यानें तिच्यावर वार केला. ती रक्तबंबाळ स्थितींत जमिनीवर कोसळली नि लागलीच मेली. हा प्रसंग प्रत्यक्ष बघणारं कुणीच नव्हतं. बाईची किंकाळी समोरच्या घरांतून कुणीतरी ऐकली होती नि जें कांहीं थोडसं पाहिलं होतं तेवढंच.

पण खून केल्याबरोबर तो गांवच्या पोलीस पाटलाकडे गेला नि त्यानें गुन्हा कबूल केला.

आजहि मला अगदीं खात्रीपूर्वक असं वाटतं कीं कोर्टांत केस चालली त्यावेळींच सत्य हकीकत सांगण्याचा त्याला सल्ला मिळाला असता तर त्याला फांशीची शिक्षा झाली नसती. पण— पण— दुर्दैव त्याचं !

त्याला वांचवण्यासाठीं त्याच्या आजोबानें खूप प्रयत्न केले, अलोट पैसा खर्च केला ! पण असत्याच्या पायावरच केसच्या इमारतीची उभारणी झाली असल्यामुळें पैसा नि प्रयत्न मातीमोल ठरले !

कोर्टांत केस सुरू झाल्यावर त्याला असा सल्ला देण्यांत आला कीं, खून करतांना त्याला प्रत्यक्ष कुणीं पाहिलं नसल्यामुळें आणि गुन्ह्याची शाबिती करण्याचं काम सरकारवर असल्यामुळें त्यानें दुसरं कांहींएक न करतां " मला कांहीं माहीत नाहीं " हा मंत्र म्हणत राहावें.

त्याच्या मनांत दुसरा पण एक विचार येत असे कीं, खरी हकीकत सांगितली तर स्वतांची पत्नी वाईट चालीची होती हें सर्वांसमक्ष कोर्टांत सांगावं लागेल; आणि असं सांगणं त्याला अत्यंत नामुष्कीचं वाटत होतं. म्हणून त्यानें अखेरपर्यंत " मला कांहीं माहीत नाहीं " असंच सांगणं चालू ठेवलं.

पुढें आलेला पुरावा कोर्टानें मान्य केला. त्याला देहदंड न करण्यासारख्या कुठच्याहि गोष्टी कोर्टापुढें न आल्यामुळें शेवटीं त्याला फांशीची शिक्षा झाली! पत्नीचा बदफैलीपणा, कोणी तरुण घरांत येऊन गेल्याची गोष्ट, त्याला प्रत्यक्ष पाहिला असतांना बायकोनें नाकबूल करून उलट त्यालाच दिलेला दोष, शिव्या, महमदला आलेला रागाचा झटका वगैरे सर्व जर कोर्टापुढें आलं असतं, तर कुठच्याहि कोर्टानें त्याला मृत्यूची शिक्षा कधींहि दिली नसती असें मला वाटतें. पण दुर्दैव त्याचें !

सेशन कोर्टात त्याला झालेली शिक्षा हायकोर्टानें कायम केली. त्यामुळें आतां दयेचा अर्ज हाच एक शेवटचा उपाय होता. पण दयेची याचना करायची असेल तर सत्य हकीकत सांगायला हवी. गुन्हा कबूल करायला हवा; आणि म्हणूनच मी त्याला समजावीत होतों, कीं दया मिळण्याची शक्यता असलीच तर फक्त खरी हकीकत सांगूनच मिळेल; आणि समजा कदाचित् नाहीं मिळाली, तर आतां मृत्यूची शिक्षा नक्की झाल्यावर खोटं कां म्हणून बोलत राहायचं ? खरं बोलून मरणं हा स्वर्गांत जाण्याचा सरळ रस्ता. एक तर हातून गुन्हा घडला, आणि वर खोटं बोलण्याचं पाप— म्हणजे आपल्या पायानें नरकांत चालत जाण्यासारखंच ना ?

वरील प्रकारच्या बोलण्यानें मी त्याला समजावीत होतों. शेवटीं तिसऱ्या दिवशीं माझं म्हणणं त्याच्या गळीं उतरलं आणि गुन्हा कबूल करून दया मागण्याचा अर्ज मीं तयार केला. कोर्टांत खोटं कां सांगितलं त्याचा

खुलासाहि केला. आणि " जी हकीकत दयेच्या अर्जांत लिहिली ती मागाहून बनावट बनवलेली नसून अगदीं खरीखुरी आहे, आणि त्याच्या पुराव्यादाखल म्हणून खून केल्याबरोबर पोलीसपाटीलाजवळ जें निवेदन केलं आहे तें पण बघण्याची " विनंति केली. शेवटीं अर्जांत असं पण लिहिलं कीं " संतापाचे भरांत माझ्या हातून गुन्हा घडला. मृत्यूची शिक्षा टाळण्यासाठीं मी हा गुन्हा कबूल करीत नाहीं; पण खोटं बोलण्याचं जें पाप माझ्या हातून घडलं, त्याच्या प्रायश्चित्तासाठींच मी गुन्हा कबूल करीत आहें. मृत्यूची शिक्षा कायम राहणार असली तरीहि मला अन्याय होत नसून संपूर्ण न्यायच मिळाला आहे असं मानून मी माझ्या प्रिय पत्नीची क्षमा मागून फांसावर चढेन. "

गुन्हा कबूल करून दयेची मागणी करणं, हा सत्याचा मार्ग होता, एवढंच नव्हे तर व्यवहारी दृष्टीनें पण हेंच बरोबर होतं. सर्व हकीकत कबूल करून जो कोणी क्षमा मागतो त्याला आपण क्षमा केल्याशिवाय राहात नाहीं हा तर आपणा सर्वांचा नित्याचा अनुभव आहे. खोटं बोलून बचाव करायला जाण्यानें उलट राग वाढतो आणि अधिक कडक शिक्षा मिळते हा पण प्रत्येकाचा अनुभव आहे. आणि माझ्या वकिलीच्या धंद्यांत मला हाच अनुभव पदोपदीं येत गेला होता.

पण महमदचा अर्ज तयार करतांना मला एक प्रकारची धास्ती वाटत होती. त्याच्या कायदेसल्लागारांनीं दिलेल्या सल्ल्याच्या अगदीं उलट असा माझा सल्ला होता. कायद्याप्रमाणें जें कांहीं व्हायचं होतं तें आतां होऊन गेलं होतं. आतां सरकारच्या हृदयाला ( सरकार या संस्थेला खरोखरच जर हृदय असेल तर ) पाझर फुटेल अशी काकुळतीची विनंति करणें हा एकच मार्ग होता.

खोटं बोलत राहिलं तर फांशी कायम राहाणार याविषयीं मला शंकाच नव्हती. खरं बोलण्यानें ती शिक्षा रद्द होण्याचा थोडातरी संभव होता. मला धाकधुक एवढीच होती कीं, सत्याचाच अवलंब करण्याची माझी नैतिक व व्यवहारी सल्ला जरी महमदला पूर्णपणें पटली होती तरीहि असा संभव होता कीं, फांसावर चढतां चढतां महमदचे मनांत असा जर

विचार आला कीं, " मी सत्य बोलून कबुली दिल्यामुळेंच मला फांशी जावें लागत आहे व माझेकडून ही कबुली देवविणारे 'दादा होते'," तर असा विचारहि त्याचे डोक्यांत आल्यास माझ्यावर कुऱ्हाडीचा घाव घातल्या-सारखें मला दुःख होणार !

पण या धर्मसंकटांतून ईश्वरानेंच मला वांचवलं. दयेच्या अर्जाच्या मुदतीच्याअखेर, शेवटच्या दिवशीं, त्याच्या मुंबईच्या सॉलिसिटरचं पत्र आलं, त्याबरोबर दयेच्या अर्जाचा एक मसुदा होता. त्यांत त्यांनीं सुपरिंटेंडेंटना लिहिलं होतं कीं, " आपण स्वतां महमदला भेटून या अर्जाचा मसुदा महमदला समजावून सांगावा. कारण यांत गुन्हा कबूल करून दयेची मागणी केलेली आहे. "

महमदला ही गोष्ट सांगतांच त्यानें म्हटलं, " बस्स झालं ! आतां माझा वकिलांवर विश्वास नाहीं. त्यांच्या सल्ल्यामुळें मी खोटं बोललों नि परिणामीं मृत्यूची शिक्षा आली ! आतां मृत्यूच्या दारांत उभा असतांना मी त्याचं कांहींएक ऐकायला तयार नाहीं. ईश्वराचं नांव घेऊन मी सत्याचीच कांस धरणार. तुमच्याच सल्ल्याप्रमाणें आतां माझा अर्ज करा-वयाचा आहे. दुसऱ्या कुणाचाहि सल्ला मला नको. "

हा अर्ज केल्यानंतर सुमारें एक महिन्यानें त्याचा निकाल लागला. त्या दरम्यान रोज संध्याकाळीं एक तासभर मी त्याला भेटायला जात असें. विविध विषयांवर आमच्या गप्पागोष्टी होत. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या इस्टेटीची आणि शवाची कायकाय व्यवस्था करायची त्या सूचना त्यानें मला देऊन ठेवल्या.

" महमद, मानवी देह नश्वर आहे. तूं खरोखरच एका दृष्टीनें मोठा भाग्यवान आहेस, असं म्हटलं पाहिजे. कारण मृत्यूचा दिवस, वेळ, सर्व कांहीं आगाऊ तुला कळलं आहे. त्यामुळें शेवटच्या क्षणापर्यंत ईश्वर-स्मरण करून स्वतां शुद्ध, पवित्र बनून ईश्वराच्या दरबारांत जाण्याची तयारी करण्याइतका वेळ तुला मिळत आहे. आमच्यासारख्यांची स्थिति फारच वाईट. स्टेशनवर तर पोंचलों; पण प्रवास किती लांब आहे कांहीं कल्पना नाहीं. बरोबर बिछाना अगर पाण्याचा तांब्याहि नाहीं ! अचानक गाडी

येऊन थडकली ! आणि हुकूम झाला " चला, बसून जा." तयारी-शिवायच बसणें भाग ! नातलगस्नेहीमंडळींचा निरोप घेण्याइतकाहि अवधि नाहीं, क्षेमसमाचार विचारण्याइतकीहि फुरसत नाहीं. गाडी सुटलीसुद्धां ! पण या साऱ्या गोष्टी करण्यासाठीं तुला भरपूर वेळ मिळत आहे ! "

अशा प्रकारच्या गोष्टींमुळें त्याला पुष्कळच मनःशांति मिळत असे. पण माझी शांति मात्र ढळत चालली होती. हें सर्व " परोपदेशे पांडित्यम् " आहे ! मला जर अशीच मृत्यूची शिक्षा झाली तर मी एवढी मनःशांति ठेवूं शकेन का ? ईश्वराची प्रार्थना करण्याइतका तरी मनाचा समतोलपणा राहील का ? आंतला आवाज चक्क " नाहीं " म्हणत होता. तर मग जें मी करूं शकत नाहीं, करूं शकेन असें वाटत नाहीं, त्या बाबतींत महमदला उपदेश करण्याचा मला काय अधिकार आहे ? मी जो उपदेश करतों त्यानें त्याला बरं वाटत असेल, त्याला थोडी शांति मिळत असेल, पण असं करण्यांत माझा ढोंगीपणा नाहीं का ? माझ्या या कृत्याची सत्याच्या दृष्टीनें काय किंमत ?

अशा प्रकारचे विचार मी माझ्या खोलींत आल्यावर येत आणि एक दिवस तर या विचारानें मी इतका अस्वस्थ बनलों कीं, मनाशीं निर्धार केला कीं, असें ढोंग करण्यापेक्षां महमदला भेटायला न जाणेंच जास्त श्रेयस्कर. आणि दुसरे दिवशीं गेलों नाहीं. पण मी न गेल्यामुळें तिकडे महमद फारच अस्वस्थ झाला. आणि त्याचे निरोपावर निरोप येऊं लागले. " दादा कां येत नाहींत ? त्यांची प्रकृति बरी नाहीं का ? कीं माझ्यावर रागावलेत ? माझ्या हातून कांहीं चूक झाली आहे का ? त्यांना कळवा कीं या दुर्दैवी महमदला थोडा वेळ तरी अवश्य भेटून जा. "

निरोप आणणाराला मी माझ्या मनाची व्यथा काय नि कशी सांगणार ? नि तो यांत समजणार पण काय ?

दोन दिवस मी गेलोंच नाहीं. पण तिकडे महमदच्या हृदयाची वाढती व्याकुळता बघून माझं मन उलट दिशेनें विचार करून बेचैन बनूं लागलं, मी किती निर्दय ! मीं त्याला भेटण्याचं बंद केलं हें खरोखरच योग्य आहे का ? काय करावं मीं ? जावं कीं न जावं ? उलटसुलट विचारांत मनाची

अस्वस्थता नि व्याकुळता वाढली. " किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः " हें भगवान श्रीकृष्णाचं वचन किती सार्थ आहे! याचा अनुभव आला.

दोन दिवसांच्या या घालमेलींत आणि गैरहजेरींत महमदचे निरोपावर निरोप येतच होते. अखेर उलटसुलट विचारांची कोंडी फुटली. उलगडा झाला. हा उलगडा अगदींच बरोबर आहे असं माझं म्हणणं नाहीं. पण त्यामुळें निदान मी माझ्या मनाला तरी शांत करूं शकलों.

मीं मनांत नक्की केलं कीं माझ्या मानसिक दुर्बलतेची कबुली महमद-जवळ देऊन टाकावी, त्याला स्पष्टच सांगायचं कीं " बाबारे, जो उपदेश आणि जें तत्त्वज्ञान मी तुला सांगतों तें अगदीं खरं असलं, तरी तें मी स्वतां माझ्या आचरणांत आणूं शकत नाहीं असं मला वाटतं आणि त्यामुळें अशा शहाणपणाच्या गोष्टी तुला सांगण्याचा मला कांहींएक अधिकार तर नाहींच, पण अशा गोष्टी मीं तुला सांगणंहि योग्य नाहीं. आणि याच कारणा-साठीं मीं तुझ्याकडे येण्याचं बंद केलं होतं. आज निश्चय केला कीं माझी दुर्बलता तुला स्पष्टपणें सांगून टाकावी, म्हणजे माझ्याविषयीं तुझे मनांत कोणताहि भ्रम राहणार नाहीं व तत्त्वज्ञानाच्या गोष्टी मोकळ्या मनानें मी तुझ्याशीं बोलूं शकेन."

हें ऐकतांना महमदच्या डोळ्यांना पाणी आलं. त्यानें सद्गदित स्वरांत म्हटलं,

" दादासाहेब! तुम्ही तसं खुशाल माना; पण मला खात्री आहे कीं तुमच्यावर असा प्रसंग आला तर जसं सांगतां तसंच तुम्ही वागाल. आपल्याविषयीं एवढी श्रद्धा मला पुरेशी आहे. म्हणून कसलाहि विचार न करतां तुम्ही रोज येत जाच. तुम्ही येतां तेव्हांच माझं मन शांत आणि प्रसन्न होतं."

त्यानंतर मात्र मी त्याच्याकडे नियमित जात होतों. आमचे जेलर मि. जोसेफ जेव्हां जेव्हां मला त्याच्याकडे जातांना पाहत तेव्हां तेव्हां माझ्याकडे पाहून हंसत म्हणत:—

" Mr. Mavalankar on his mercy mission."

महमदच्याबरोबर माझा वेळ जात होता तेव्हां त्याच्या आजोबाच्या व त्याच्या भेटी, त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या अल्पवयी मुलीचे बाबतींतील व्यवस्थे-संबंधींचे कागद, त्याच्या शवाचं दफन त्याच्या गांवीं करण्याची व्यवस्था, फांशी दिल्यानंतर फांसावरून त्याला खालीं उतरवून घेण्यासाठीं कुणाकुणाची मदत घ्यायची, कुणाच्या हातून शव फासांतून उतरवायचं, इत्यादि अनेक गोष्टींसंबंधीं आम्ही बोललों. नरदेहाचं साफल्य कशांत आहे, मृत्यु म्हणजे काय? मृत्यूनंतर काय घडतं वगैरे अनेक तत्त्वज्ञानाच्या व सामान्य गोष्टीहि आम्ही बोललों.

फांशीचा दिवस जसजसा जवळ येत गेला तसतसा महमद हें नश्वर जग सोडून जाण्यासाठीं अधिकाधिक तयार बनूं लागला. त्याची अनासक्ति वाढत गेली. जणूं भगवद्गीतेच्या तत्त्वज्ञानाचा त्याला साक्षात्कार घडला आहे, अशा प्रकारची देहाविषयींची त्याची अनास्था त्याच्या वर्तनावरून मला स्पष्ट दिसून येऊं लागली. मला त्याच्याविषयीं वाटत असलेल्या मायेंत आतां आदराचीहि भर पडली.

माझ्या कारागृहवासाचे दरम्यान जे पांचजण फांशी गेले, त्या प्रत्येकाशीं माझा गाढ परिचय झाला होता. त्यावरून मीं असा निष्कर्ष काढला आहे कीं सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या लोकांपेक्षां निरक्षर व अतएव अशिक्षित मानले गेलेले लोक जीवनमृत्यूचं तत्त्वज्ञान अतिशय थोड्या वेळांत समजूं शकतात, आत्मसात करतात, एवढंच नव्हे तें प्रत्यक्ष कृतींत उतरवतात.

कदाचित् स्वतांच्या मृत्यूची जाणीव तीव्र बनल्यामुळें एक प्रकारची स्थितप्रज्ञता आपोआपच उत्पन्न होत असेल.

महमद एक गोष्ट मला रोज सांगत असे "दादासाहेब, मला फांशी दिल्यानंतर माझ्या आत्म्यासाटीं तुम्ही सर्वजण प्रार्थना करा."

"जरूर करूं हं." असें मी आश्वासन देत असे आणि त्याप्रमाणें त्याच्या फांशीच्या दिवशीं तुरुंगांत आम्ही सर्व राजकीय कैद्यांनीं एक वेळेचा उपास करून तिसरे प्रहरीं समूह प्रार्थना पण केली होती.

दयेचा अर्ज केल्यानंतर महंमदचें व माझें मन लंबकासारखं आशा-निराशामध्यें झोंके खात होतं. सरकारी कारभारांत मानवी भावनांचा

विचार होत असेल अशी मला केव्हांहि श्रद्धा नव्हती ! तरीसुद्धां रुपयाला चार आणे मला आशा (खुळीच आशा ती !) होती कीं न जाणो, केसचीं सर्व कागदपत्रें पुन्हां तपासून बघणारा एकादा हरीचा लाल सेक्रेटरीएटमध्यें निघेल आणि फांशीची शिक्षा रद्द होऊन सक्तमजुरीची शिक्षा होईल.

पण— पण तसं झालं नाहीं. दयेचा अर्ज फेटाळला गेला ! ही बातमी अधिकाऱ्यांनीं महमदला कळवली. बातमी कळली तेव्हां त्यानें जेवण बंद केलं. फक्त थोडा चहा किंवा थोडं दूध घ्यायला सुरवात केली. दोन दिवस असा उपास केला तेव्हां त्याच्या पहारेकऱ्यांनीं मला येऊन सांगितलं,

"दादासाहेब, फांशीच्या कैद्यांवर आम्ही पहारा करतों, संगिनधारी बंदुकांच्या पहाऱ्यांत त्यांना फांसाकडे घेऊन जातों, आणि प्रत्यक्ष फांसावर लटकतांना पहातों. हें खरं असलं तरी पण अशा कैद्यांविषयीं आमच्या मनांत खूप सहानुभूति व दयाभाव असतो. फांशीचीं दृश्यें रोज बघूनहि आमचीं मनें मेलेलीं नाहींत. आतां थोड्याच दिवसांत महमद मरणार; तरीहि तो कांहीं खात नाहीं, पीत नाहीं हें पाहून आम्हांला अति दुःख होतं, कृपा करून त्याला उपास सोडायला लावा, तरच आमच्या मनाला शांति मिळेल." सात्त्विक वृत्तीनें केलेल्या उपासांत किती मोठी शक्ति असते त्याचा पुरावा या छोट्याशा उदाहरणानं मिळूं शकतो.

मला पण वाटलं कीं महमद उपास करतो त्यापेक्षां तो कांहीं खाईल तर जास्त चांगलं. कारण त्याच्या उपासाच्या हेतूविषयीं, त्यामागें असलेल्या त्याच्या तत्त्वप्रणालीविषयीं मला कांहींच माहीत नव्हतं.

म्हणून मीं त्याच्याबरोबर बोलतां बोलतां म्हटलं, "महमद, तूं गेल्या दोन तीन दिवसापासून खाणं सोडलं आहेस असं मी ऐकतों, तें खरं का?"

"हो. खरं आहे."

"कां खात नाहींस तूं? प्रत्येक प्राण्याला एक दिवस मरायचंच आहे. आणि मरण्यासाठीं तर तुझ्या मनाची पूर्ण तयारी झाली आहे. असं असतांना आजपासूनच एकदम तुला मृत्यूची एवढी भीति वाटायला लागली, कीं खाणेंपिणें तुला सुचेनासें झालें! छेः छेः! असं घाबरून कसं चालेल? जें

नशिबानें पुढें आणलं आहे, त्याला हंसतमुखानें तोंड द्यायला तयार राहिलंच पाहिजे ना ?

महमद म्हणाला, " दादासाहेब, तुम्हांला असं का वाटतं कीं, मृत्यूच्या भीतीमुळें मीं खाणंपिणं सोडलं ? नाहीं. तसं बिल्कूल नाहीं."

त्याचा चेहरा कांहीं विलक्षण तेजस्वी दिसत होता. मी गोंधळलों.

" मग, खाणं बंद करायचं कारण काय ? "

" असं पहा, दादासाहेब, आतां दोनचार दिवसांत मला खुदाच्या दरबारांत जावं लागणार हें नक्की. तिथं प्रवेश करण्यापूर्वीं माझं शरीर आणि मन दोन्हीहि साफ आणि पवित्र असलीं पाहिजेत. तिथं यत्किंचितहि घाण, मळ नाहीं चालायचा. जर मी जेवण घेत राहिलों, तर फांसाची दोरी माझ्या गळ्याभोंवतीं आवळली जाईल त्यावेळीं जीव गुदमरल्यामुळें गात्रांवरचा ताबा सुटून शौचाला आणि लघवीला होईल. त्या घाणीनें माझा देह अपवित्र बनेल असं तुम्हांला नाहीं का वाटत ? अशा अपवित्र देहानें पाक खुदाच्या दरबारांत मीं पाऊल टाकावं हें तुम्हांला योग्य वाटतं का ? "

त्याची समजूत खरी असो कीं खोटी असो, पण त्याचा मुद्दा बिनतोड होता हें निःसंशय! चित्त, शुद्ध आणि शांत ठेवण्यासाटीं आहार अल्प आणि सात्विक असावा ही गोष्ट नाकबूल करण्यासारखी नव्हती. तर मग त्याला उपवासापासून मी परावृत्त तरी कसा करूं शकूं ? त्यानें घेतलेला मार्ग खरा होता, प्रामाणिक होता, पण लोकांना त्याची मनःस्थिति लौकिक दृष्टीनें कशी समजावून सांगणार ? ते तर असंच समजणार कीं मरणाच्या धास्तीनें तो खात नाहीं आणि वरती तत्त्वज्ञानाचें ढोंग करतोय !

हा विचार मनांत येऊन मीं म्हटलं, " महमद, तुझं म्हणणं खरं आहे. पण इथल्या लोकांना तें पटवून देणं मोठं कठीण आहे. तुझ्याविषयीं या लोकांच्या मनांत जो बंधुभाव उत्पन्न झाला आहे तो यत्किंचितहि कमी झालेला मला आवडणार नाहीं, म्हणून माझ्यासाटीं तूं एवढं कर कीं, मी तुला ब्रेडचा तुकडा पाठवीन तो तूं चहा किंवा कॉफीबरोबर घे म्हणजे मी मागाहून या लोकांना तुझ्या उपवासाचा हेतू सावकासपणें समजावून

सांगेन. तूं थोडें खाल्ल्यावर मगच ते तुझा हेतु समजूं शकतील. नाहींतर त्यांचे मनांत शंका राहीलच कीं मृत्यूचे धास्तीनेंच महमद खात नाहीं !

त्यानें माझं म्हणणं मान्य करून थोडी ब्रेड खाल्ली आणि कॉफी प्याला. तें पाहून सर्वांना खूप आनंद झाला. नंतर मीं त्यांना महंमदचा दृष्टिकोन समजावून सांगितला. ती हकीकत ऐकतांच त्याच्याविषयीं त्यांना असीम आदर वाटूं लागला.

फांशी द्यायच्या आदल्या दिवशीं सायंकाळीं मी त्याला भेटून आलों. तीच आमची शेवटची भेट ! त्या भेटीचं स्मरण चिरंतन मनांत राहाणार !

त्याचे आजोबा पण आले होते. भेट संपवून मी जायला निघालों तेव्हां महमदनें विचारलं,

" उद्यां सकाळीं भेटूं शकाल ? "

माझ्या हृदयांत कालवाकालव सुरू झाली. मोठ्या प्रयासानें इच्छे-विरुद्ध मन कठोर करून मीं त्याला नकार दिला. मीं म्हटलें:—

" उद्यां बाहेरचे अधिकारी येतील. माझ्या उपस्थितीमुळें तुरुंगांतल्या अधिकाऱ्यांची स्थिति जरा विषम बनेल. शिवाय त्या शेवटच्या क्षणीं आपणाला एकमेकांचा निरोप घेणं अति जड जाईल. तेव्हां हीच आपली शेवटची भेट. "

महमद थोडा वेळ स्तब्ध राहिला. हृदयांतली खळबळ त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटली होती. थोड्या वेळानें त्यानें म्हटलं, " खुदा तुमचं कल्याण करो. माझ्या हातून कांहीं चूक झाली असेल तर सर्वांनीं मला क्षमा करावी......माझ्या आत्म्यासाठीं प्रार्थना कराल ना ? "

त्या रात्रीं मला झोंप लागेना. ताठ उघड्या डोळ्यांनीं अनेक काल्पनिक दृश्यें बघितलीं. कानांनीं प्रत्येक तासाचे टोले ऐकले.

त्याला सकाळीं आठ वाजतां फांशी द्यायचं होतं. फांशी दिल्यानंतर साधारण पाऊण तासानें तिथं जाऊन त्याच्या शवाची व्यवस्था मला करायची होती.

महमद तर सबंध रात्र त्याला त्याचे आजोबानें दिलेली जपमाळ फिरवीत जागतच होता. पहांटे चार वाजतां त्यानें पहारेकऱ्याला म्हटलं,

" भाई, सैंपाकघरांतून आंघोळीसाठीं थोडं गरम पाणी आतां मिळूं शकेल का ? खुदाच्या दरबारांत जाण्याची वेळ होत आली आहे तेव्हां आंघोळ करून घ्यावी म्हणतों."

त्यानें आंघोळ करून बंदगी केली.

वेळ होतांच तुरुंगाधिकारी आले. नेहमींच्या पद्धतीनुसार त्यांनीं महमदला विचारलं,

" खुनाच्या गुन्ह्यासाठीं तुला मृत्यूची शिक्षा झाली आहे तेव्हां तुझं शेवटचं कांहीं सांगणं आहे का ?"

" नाहीं. कांहीं सांगायचं नाहीं. मला तर योग्य न्याय मिळाला आहे. मी माझ्या पत्नीची क्षमा मागतों. सर्वांना आपण सांगावं कीं माझ्या हातून त्यांची कांहीं चूक झाली असेल तर मला क्षमा करावी. दादासाहेबांना सांगा मी तुम्हांला विसरणार नाहीं. नि तुम्ही मला विसरूं नका. माझी अखेरची वंदना स्वीकारावी."

असं म्हणून तो झटकन् वळला आणि फांसाच्या दिशेनें झपझप चालूं लागला.

तो फांसावर चढला, फळीवर उभा राहिला. दोन्ही हात कंबरेमागें नेऊन त्यांत हातकडी घालण्यांत आली. दोन्ही पाय दोरीनें एकत्र बांधण्यांत आले. तोंडावर काळी पिशवी चढवली गेली. आणि गळ्याभोंवतीं फांसाचा पाश पडला ! महमद ईश्वराचं चिंतन करीत स्वस्थ नि शांत उभा होता. फांशी देणाऱ्यानें फळीखालचा दांडा फिरवला.

खट्—फळ्या पडल्या. महमद खालीं पडला. गळ्याभोंवतालचा फास घट्ट आवळला गेला, आणि तो लोंबकळत राहिला !

त्याची जीवनज्योत विझली !

त्याच्या अचल शांतीचें वर्णन जेल डॉक्टरनीं येऊन मला सांगितलं. तें ऐकून दारुण दुःख झालं. पण दुःखांत एक प्रकारचं समाधानहि वाटलं, कीं अखेरपर्यंत तो अविचल, शांतचित्त राहिला.

त्याच्या अखेरच्या सूचनेप्रमाणें त्याचे शवाची सर्व व्यवस्था करण्यांत आली. कॉफीनमध्यें ( शवपेटिका ) शव ठेवून जवळच्या मशिदींत बंदगी

करून ती शवपेटी ट्रेनमध्यें चढवून भडोचजवळच्या त्याच्या गांवीं पाठवण्यांत आली.

या कार्यात तुरुंगाबाहेरच्या अनेक मित्रांनीं केवळ अंतःस्फूर्तीनें मदत केली होती. धर्म विविध असले तरी मानवता–माणुसकी–एकच आहे याचा हा बिनतोड पुरावा या प्रसंगानें प्रत्ययाला आला.

संध्याकाळीं तुरुंगांत आम्हीं सामुदायिक प्रार्थना ठेवली. मित्रांच्या आग्रहावरून महमदची मीं थोडक्यांत हकीकत सांगितली. ती ऐकत असतां अनेकांच्या डोळ्यांतून आंसवं ओघळलीं. दोनचार जण तर भावनावेग अनावर होऊन हुंदके देऊन रडायला लागले. सबंध वातावरण बाहेरून शांत पण अंतर्यामीं प्रक्षुब्ध आणि हृदयस्पर्शी बनलं. मानवता कांठोकांठ भरून ओसंडत होती आणि त्यांत जातिभेद, धर्मभेद सारे भेद बुडून लुप्त झाले. मानवी ऐक्याचा निनाद सर्वांच्या हृदयांत उमटला.

आजहि मला वाटतं आहे कीं आमच्या जीवनांतला तो एक अमोल, अनुपमेय आणि धन्य क्षण होता. –महंमदचे आत्म्यास शांति मिळो हीच प्रार्थना.

महमदचे आजोबा अभराममिया आणि त्याची मुलगी "आयेषाबिबि" अधूनमधून भडोच स्टेशनवर येऊन मला भेटतात. आजोबा तर माझ्यावर खूपच प्रेम करतात. माझ्या मुलाच्या लग्नांत (सन १९४८) खास आमच्या घरीं ते आले होते. कुणाचाहि अहेर घ्यायचा नाहीं असा माझा निर्धार असूनहि एका अगदीं जवळच्या नातलगाप्रमाणें अभराम आजोबांच्या अहेराचे २० रु. घेतल्याशिवाय मला सुटकाच नव्हती !

त्यांच्या घरीं शेरपुरला एकादे वेळीं जाण्याचं वचन मीं आजोबांना दिलं आहे. भविष्यांत केव्हां तरी तो बेत अमलांत आणीन अशी आशा बाळगीत आहे.

—*—

# स्वाभिमानी शिवराम

" अरे, तूं एवढा पुरुषासारखा पुरुष, मर्द मराठा गडी, लढाईवर जाऊन आलेला, लष्करी पोलिसांत नोकरी करतो आहेस आणि तूं मला सांगायला येतोस कीं 'आनंदच्या भर बाजारांतून तूं कसा जातोस तें मी बघतें ' अशी नंदाबाई तुला धमकी देते ? असा बायकी भित्रेपणा तुला शोभतो काय ? पोलिसांनीं असं म्हणणं मोठी लाजीरवाणी गोष्ट आहे. तुझ्याजवळ बंदूक आहे ना ? वाटेल त्या रस्त्यानें गेलास म्हणून तुला कोण अडवणार आहे ? कुणी अडवील त्याच्याशीं दोन हात तुला नाहीं करतां येत ? जा, जा, अशी तक्रार पुन्हां माझ्याकडे घेऊन येऊं नकोस."

बंदुकधारी पोलीस शिवराम आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यासमोर—पोलीस इन्स्पेक्टरसाहेबासमोर उभा होता, आणि त्याची तक्रार ऐकून साहेबांनीं वरील बोल सुनावीत त्याची झाड काढली.

शिवराम खालीं मान घालून मुकाट्यानें तिथून निघून गेला. त्यानें मनाशीं नक्की ठरवून टाकलं कीं आतां आनंदच्या बाजारांत बंदूक घेऊनच जायचं.

( २ )

शिवराम सातारा जिल्ह्यांतल्या खटाव तालुक्यांतल्या भोंसरे गांवचा रहिवासी होता. वरचा प्रसंग घडला तेव्हां त्याचं वय अवघं ३६ वर्षांचं होतं. आनंदमध्यें सरकारी नोकरींत तो बंदूकधारी पोलीस होता. तो वयाच्या २१ व्या वर्षीं लष्करांत " मराठा लाइट इन्फन्टरी "च्या ११०व्या पलटणींत दाखल झाला होता, आणि बेळगांव, नीमच, अलाहाबाद, पंचमढी वगैरे ठिकाणीं आपल्या तुकडीबरोबर होता. ता. ३०-४-३३ रोजीं तो लष्करांतून निवृत्त झाला तेव्हांपासून राखीव दलांत ( reserve force )

त्याला ठेवण्यांत आलं होतं. डिसेंबर १९३७ मध्यें खेडा जिल्ह्यांत सशस्त्र पोलीस तुकडींत तो दाखल झाला होता.

आनंदला त्याची नेमणूक झाली आणि तिथं पोलीस लाईन्समध्यें तो राहात असे. तो अविवाहित होता. घरीं भोंसऱ्याला वृद्ध पिता आणि एक बहीण याशिवाय कुणीहि नातलग त्याला नव्हतें. त्याची आई लहानपणींच वारली होती.

आनंदला राहायला आल्यावर नंदा नांवाच्या एका वाघरी* जातीच्या बाईशीं त्याची ओळख झाली. परिचय दाट वाढला. ही गोष्ट पोलीस लाईन्समध्यें इतरांच्या दृष्टोत्पत्तीस आल्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं त्या बाईला तिथं येण्याची बंदी केली. शिवराम लष्करी नोकरींत मुरलेला. वरिष्ठांचे हुकूम अक्षरशः पाळण्याची संवय रक्तांत भिनलेली. मिळालेला हुकूम तात्काल अमलांत आणून त्यानें नंदाला, आपल्या खोलीवर येऊं नकोस अशी ताकीद दिली.

त्याचा नंदाबरोबर जो कांहीं संबंध होता त्यासाटीं तो तिला दरमहा कांहीं पैसे देत असे. आतां तिला पोलिस लाईन्समध्यें येण्याची बंदी झाल्यामुळें तो संबंध सुटला, व तिला पैसे मिळायचे बंद झाले. त्यामुळें ते पैसे मिळण्यासाठीं, पुन्हां संबंध जोडण्याचे हेतूनें तिनें नाना युक्त्या योजल्या, त्याला अनेक प्रलोभनें दाखवलीं पण शिवरामनें वरिष्ठांच्या हुकुमाचें उल्लंघन केलें नाहीं.

( ३ )

शिवराम सरकारी तिजोरीवर पहारा करीत असे. पहाऱ्याची दिवसपाळी संपवून तो रात्रीं पोलीस लाईनमधल्या आपल्या खोलीवर येई. सरकारी नियम असा होता कीं पहारेकऱ्यांचा पहारा पुरा झाला कीं त्यानें आपली बंदूक तिथंच तिजोरीजवळच्या खोलींत कुलुपांत ठेवून, मग घरीं जावें. शिवराम आपलें काम ( ड्यूटी ) संपल्यावर घरीं जात असे तेव्हां एका लाठीशिवाय दुसरं कोणतंहि हत्यार त्याच्याजवळ नसे.

* भिल्ल, कोळी यासारखी जात.

एक दिवस रात्रीं नित्याप्रमाणें पहारा संपवून तो घरीं जात होता. त्यावेळीं रात्रीच्या त्या अंधारांत अचानक दोघांतिघांनीं लाठ्यांनीं त्याच्यावर हल्ला केला. त्या मर्द मराठ्यानें शूरपणानें त्या सर्वांना पिटाळून लावलं. या हल्ल्यांत नंदाचा संपूर्ण हात होता याची त्याला पूर्ण खात्री होती. कारण स्वतांबरोबर संबंध ठेवण्यासाठीं ती त्याला विविध प्रलोभनें दाखवीत होती, गोड गोड संदेश पाठवीत होती. अन् तो ऐकत नाहीं असें पाहून, त्रासून, त्याला खुनाची धमकी पण देत होती! पण शिवरामचा निर्धार कायम होता.

पोलीस लाईन्समध्यें पोंचल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळीं, त्यानें रात्रीं घडलेल्या हल्ल्याची हकीकत आपल्या मित्रांना सांगितली. आणि या बाबतींत पुढें काय करावं असा सल्ला पण विचारला. पण योग्य सल्ला देण्याऐवजीं, मित्रांनीं ती गोष्ट हंसण्यावारी नेली आणि त्याची चेष्टाहि केली. एकानें तर उपहासानें म्हटलं,

" अरे, असल्या गोष्टींत कुठं वरिष्ठाकडे फिर्याद करतात काय? त्याचा तर आपल्या आपणच ' निकाल ' लावून टाकला पाहिजे. "

( ४ )

त्यानंतर बरेच दिवस, कांहींहि न घडतां, शांतपणें गेले; आणि मग एक दिवस दोनतीन गुंड नंदाच्या शिकवणीनुसार त्याला भेटले. शिवरामाला धमकी देत त्यांनीं म्हटलं,

" बच्चमजी, छाती असेल तर आनंदच्या भर बाजारांत येऊन दाखव. तिजोरी ते पोलीस लाईन आणि पोलीस लाईन ते तिजोरी या एकाच रस्त्यानें ये जा करतो आहेस, म्हणून वांचला आहेस. पण हिंमत असली तर बाजारांत येऊन दाखव. जिवंत परत नाहीं जाणार; आणि हें बघ, जिवंत राहायचं असेल तर नंदाला ठेव. "

ही हकीकत जेव्हां त्यानें आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला सांगितली तेव्हां साहेब मजकुरांनीं सुरवातीला सांगितल्याप्रमाणें त्याला टोमणा मारला नि झटकला.

तेव्हां शिवरामनें निश्चयच करून टाकला कीं, मिळालेलं आव्हान स्वीकारून, भर बाजारांत जायचं, भरलेली बंदूक बरोबर ठेवायची आणि जर कुणी डिवचायला आलं तर त्याचा खरपूस समाचार घ्यायचा. या निश्चयांत नंदाला अगर तिच्या त्या गुंडांपैकीं कुणालाहि ठार मारण्याचा त्याचा मुळींच हेतु नव्हता. पण स्वतांवर जर हल्ला झाला तर त्याचा प्रतिकार करण्यासाठींच त्यानें भरलेली बंदूक घेण्याचा विचार केला होता.

( ५ )

दुसऱ्यां दिवशीं दुपारीं ड्यूटीवरून सुटल्यावर नियमाप्रमाणें बंदूक शस्त्रागारांत कुलपांत न ठेवतां, त्यानें तींत काडतुसें भरलीं, संगीन चढवलं आणि ती खांद्यावर टाकून तो आनंदच्या भर बाजारांत निघाला. बाजारांत नंदा फळें, भाजी विकत बसली होती. तिच्याजवळ तिची सहासात वर्षांची मुलगी बसली होती. शिवराम गेला तों थेट तिच्यासमोर जाऊन उभा राहिला. बाजारांत त्यावेळीं बरीच गर्दी होती, पण प्रत्येकजण आपआपल्या कामांत गुंतला होता.

त्यानें नंदाला म्हटलं, " नंदा, नीट बघून घे. हा मी भरबाजारांत इथं तुझ्यासमोर उभा आहें. मला मारण्याची कुणाची छाती आहे? कुठं आहेत ते तुझे साथीदार? हिंमत असेल तर येऊं दे त्यांना पुढें नि मारूं देत मला!"

नंदा समजून चुकली कीं रागरंग कांहीं वेगळाच दिसतो नि यावेळीं प्रतिकार करण्यांत अर्थ नाहीं. तेव्हां तिनें त्याला शिव्या द्यायला सुरवात केली. शिवराम छाती पुढें काढून ताठ उभा राहून त्या शिव्या शांतपणें ऐकत होता. तिच्या शिव्यांची मजल आईबहिणीपर्यंत येऊन पोंचली! आईबहिणीवरून दिलेल्या घाणेरड्या शिव्या तो ऐकून घेईल हें शक्यच नव्हतं. त्या शिव्या कानीं पडतांच त्याचं पित्त खवळलं, त्याची जन्मजात लढाऊ वृत्ति एकदम डिवचली गेली, स्वाभिमानाला धक्का लागला. स्वाभिमानावर आघात करणारीला ठार करण्याचा विचार त्याच्या डोक्यांत एकदम उसळला! त्या शिव्या संपण्याच्या आंतच त्यानें खांद्यावरची बंदूक खसकन्

खालीं ओढली. ताठ उभा होता त्याच पावित्र्यांत त्यानें खालीं बसलेल्या नंदावर गोळी झाडली ! ती तात्काल जमिनीवर कोसळली !

बंदुकीचा अचानक धडाका ऐकून आजूबाजूच्या लोकांचं लक्ष बंदूक पकडून उभा असलेल्या शिवरामाकडे गेलं. नंदा रक्तबंबाळ स्थितींत त्याच्या पायाजवळ पडलेली होती. अशा स्थितींत जवळ जाऊन त्याला पकडण्याची छाती करणार कोण ?

शिवराम तिथून निघून थेट पोलीस लाईनमध्यें आला नि आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे जाऊन घडलेली इत्थंभूत हकीकत त्यानें जाहीर केली. खुनाच्या आरोपावरून त्याला पकडण्यांत आलें !

( ६ )

खुनाच्या आरोपाखालीं त्याला मॅजिस्ट्रेटसमोर उभं करण्यांत आलं तेव्हां त्यानें जो " कबुली जबाब " ( Confession ) दिला होता त्यांत त्यानें सर्व सत्य हकीकत सांगितली होती; पण शेवटीं शेवटीं त्यानें तिला थोडी मुरड घातली. " रागाच्या भरांत आपण गोळी सोडली " असं न सांगतां नंदा झटापट करूं लागली त्यामुळें बंदुकीस धक्का लागून गोळी सुटली असं सांगितलं होतं. अर्थात् हें शेवटचं कथन खरं वाटण्यासारखं नव्हतं.

सेशनमध्यें केस चालू झाली तेव्हां बाजारांतल्या दोन तीन साक्षीदारांनीं अशी साक्ष दिली कीं " संगीनीचं टोंक नंदाच्या पोटांत खुपसतांना शिवरामाला आम्हीं पाहिलं होतं. "

ही गोष्ट पण खरी नव्हती. साक्षीदार खोटं सांगत असतील अगर त्यांना तसा भास झाला असेल.

कोर्टानें शिवरामला गुन्हेगार ठरवून फांशीची शिक्षा दिली !

त्यानें हायकोर्टांत अपील केलं, पण शिक्षा कायम राहिली. फांशीची शिक्षा रद्द व्हावी म्हणून मी सरकारास त्याचा दयेचा अर्ज केला त्यांत लिहिलें होतें कीं, त्याला मिळालेल्या लष्करी तालिमीचं महत्त्व ओळखून, त्यानें दाखविलेला लष्करी बाणा त्याच्या आंगीं मुरविण्यास आपण स्वतांच

जबाबदार आहोंत असा विचार सरकारनें करायला हवा. जोरजुलुमाचा नि धाकधमकीचा प्रतिकार हिंसक पद्धतीनेंहि करावा अशी शिकवण अनेक वर्षांपासून ज्याला सरकारकडूनच मिळत आली, त्याला कुणी अन्यायकारक रीतीनें जर धमकावूं लागलं तर त्याचा परिणाम शेवटीं झाला असाच होणार याचा विचार करून सरकारनें त्याची फांशीची शिक्षा रद्द करून त्याला तुरुंगवासाची शिक्षा द्यायला हवी अशी विचारसरणी दयेचे अर्जांत मीं मांडली होती. पण सरकारचं तंत्र नियमांचे धोरणानें चालतं! बदलती परिस्थिति जाणून मूलभूत गोष्टीचा विचार सरकारी तंत्र करील ही अपेक्षा ठेवणंच चूक आहे!!

( ७ )

शिक्षा होऊन शिवराम तुरुंगांत आला त्या दिवसापासूनच मी त्याला भेटत होतों. तो कांहीं फार शिकलेला नव्हता. पण पुष्कळशा गोष्टी त्याला मुखोद्गत होत्या. मराठी संतांपैकीं तुकाराम, नामदेव वगैरेंचे भक्तिपर आणि तत्त्वज्ञानपर अभंग त्याला पाठ होते. ते तो मोठ्या भक्तिभावानें आपल्या मधुर आवाजांत गात असे. तो मोठा भक्त होता. दुसऱ्यासाठीं वाटेल त्या संकटांत उडी घालून स्वतांच्या प्राणांची आहुति देण्याचा ‘ मराठी बाणा ’ त्याच्या रक्तांत भिनलेला होता. तो कविहि होता. त्याची एकंदर मनोभूमिका अशी असल्यामुळें त्याचे मनःशांतीसाठीं मला फारसे प्रयत्न करावे लागले नाहींत.

मी त्याला भेटायला जाई तेव्हां तो कधीं मला एकाद्या संताची कहाणी सांगे, तर कधीं आपल्या गोड वाणीनें भक्तिपूर्ण अभंग म्हणून दाखवी. कधीं पंढरपूरच्या विठोबाच्या गोष्टी सांगे तर कधीं, ज्या वेगवेगळ्या ठिकाणीं तो लष्कराबरोबर फिरून आला होता तिथल्या आठवणी सांगे. आणि क्वचित् कधींतरी विचारी,

“ मी केलेल्या दयेच्या अर्जाचा निकाल चांगला लागेल का ? ”

त्याची लष्करी नोकरी विचारांत घेऊन सरकार कदाचित् त्याला फांशीच्या शिक्षेतून मुक्त करील अशी मला रुपयाला चार आणे आशा होती आणि त्याप्रमाणें मी त्याला तसं सांगतहि असें.

तो मला "गुरुमहाराज" म्हणत असें. कुठच्या कारणासाठीं त्यानें मला 'गुरु' मानलं होतं हें अद्यापहि मला समजलेलं नाहीं. एवढं निश्चित कीं मी त्याला मित्र मानीत असें आणि माझं मार्गदर्शन मिळविण्यासाठीं तो उत्सुक असे, आणि कदाचित् यामुळें मला त्यानें "गुरुमहाराज" हें नांव दिलें असेल.

दयेचा अर्ज फेटाळून लावला ही बातमी त्याला जेव्हां सांगण्यांत आली, त्या दिवशीं मला खूप दुःख झालं. असल्या एका शूर, भक्तिवान् सज्जन माणसाला मारण्यासाठीं सरकार तयार झालं त्यापेक्षां देशकार्यासाठीं सरकार त्याचा उपयोग करून घेईल तर किती बरं चांगलं होईल, असें मला वाटे.

त्या दिवशीं अत्यंत उदास मनानें त्याला मी भेटलों. मला खिन्न बघून तोच मला समजावूं लागला,

"गुरुमहाराज, आपण कां बरं दुःखी होतां? मृत्यु तर प्रत्येकाला ठरलेलाच आहे ना? आणि मी शिपायी गडी आहें, मरणाला बिल्कूल भीत नाहीं. आपण दुःख अगर शोक करूं नका."

त्याचे बाणेदार बोल ऐकून त्याच्याविषयींचा माझा आदरभाव फारच वाढला. मनाला शांति पण मिळाली.

हायकोर्टाच्या निकालानंतरच त्याच्या वृद्ध पित्याला एकंदर हकीकतीची बातमी देण्यांत आली. माझी आत्यंतिक इच्छा होती कीं, त्या वृद्ध पित्यानें येऊन एकदां आपल्या मुलाला भेटून जावें. पण म्हातारपणामुळें इतक्या लांबचा प्रवास त्याला एकट्यानें करतां येणं शक्य नव्हतं. आणि बरोबर कुणाला आणावं तर प्रवासखर्चाला देण्याइतके पैसे नव्हते. केवळ पैशाखातर पितापुत्रांची अखेरची भेट होऊं शकत नाहीं हा विचार मला असह्य झाला, म्हणून मीं त्या वृद्ध पित्याला कळवलं,

"शिवरामला भेटायला इथं या. प्रवासखर्चाची तरतूद इथून करण्यांत येईल."

कळविल्याप्रमाणें त्याचा पिता नि भाचा, दोघेहि साताऱ्याहून साबरमतीला आले. त्यांच्या उतरण्याची सोय "सत्याग्रह आश्रमांत" करण्यांत आली होती.

पितापुत्र भेटले. पण अत्यंत आश्चर्याची गोष्ट, दोघांपैकीं कुणाच्याहि डोळ्यांतून अश्रू बाहेर पडले नाहींत! भगवद्गीतेंतलं तत्त्वज्ञान त्या पिता-पुत्रांच्या जीवनांत किती खोल खोल शिरलं आहे, रक्ताच्या थेंबाथेंबांतून किती एकजीव झालं आहे हें स्पष्ट दिसत होतं. त्या भेटीच्या क्षणीं दोघांनाहि दुःख खूप होत होतं, पण तें दुःख विचारपूर्वक गिळून दोघांनींहि जो संयम दाखविला होता तो खरोखरच अतुलनीय होता. हाच संयम अशिक्षित समजल्या जाणाऱ्या सर्वसाधारण बंधुभगिनींत बऱ्याच प्रमाणांत दिसून येतो. खरोखर अशा लोकांना आपण अशिक्षित म्हणायचं कसं?

त्याचे वडील दोन दिवस राहून नंतर आपल्या गांवीं साताऱ्याला परत गेले. चार पांच दिवसांनंतर त्याला फांशी द्यायचं होतं म्हणून मीं त्यांना म्हटलं,

"आणखी थोडे दिवस राहा. राहाण्याची सर्व व्यवस्था केलेली आहे."

त्या वृद्ध पित्यानें म्हटलं, "माझ्या शिवरामाला आतां ईश्वराच्या पदरांत घातलं आहे. मी ४।६ दिवस इथं जास्त राहाण्यानें शिवरामला जास्त काय धीर देणार आहें?"

शिवराम मृत्यूसाठीं तयार होताच; पण त्याच्या मनांत मधूनमधून अशी आशा डोकावे कीं शेवटच्या क्षणीं पण कांहींतरी ईश्वरी चमत्कार होऊन फांसांतून आपली मुक्तता होईल! त्याला मृत्यूचं भय वाटत होतं किंवा जगण्याची लालूच होती असं मात्र मुळींचं नव्हतं. पण, कां कोण जाणे; त्याला मनांतून मात्र असं वाटत असें कीं "मी सुटून जाणार!"

फांशीच्या आदल्या दिवशीं त्यानें मला म्हटलं, "गुरुमहाराज, या दोन दिवसांत मी अगदीं नक्की सुटून जाणार."

खरं म्हणजे फांशीची नक्की तारीख त्याला माहीत नव्हती, तरीसुद्धां "दोन दिवसाचा" उल्लेख त्यानें केला तेव्हां कांहींशा आश्चर्यानें मीं विचारलं,

"कशावरून तूं हें म्हणतोस?"

"काल रात्रीं मला स्वप्न पडलं."

" म्हणजे याचा अर्थ असा तर नसेल ना, कीं फांशी होऊन कुडींतून आत्म्याची सुटका होणार? या अर्थी तर तूं "सुटका" शब्द वापरीत नाहींस ना?"

तो हंसला, "छे छे! तसं नाहीं. खरंच मी असा एक प्रसंग बघितला आहे कीं फांसावर चढलेला, गळ्याभोंवतीं फांस पडून आतां आवळला जाणार, इतक्यांत त्याची अचानक सुटका झाली."

मला मोठं आश्चर्य वाटलं. मीं म्हटलं,

"खरं म्हणतोस? असा प्रसंग तूं बघितला आहेस? कुठं बघितलास?"

शिवरामानें कुठल्याशा एका चित्रपटाचं नांव सांगितलं.

चित्रपटांचा लोकांच्या मनावर किती नि कसा परिणाम होतो याची यावरून कल्पना येते.

फांशीच्या आदल्या सायंकाळीं बरीच रात्र होईपर्यंत आम्ही कित्येकजण त्याच्याजवळ बसलों होतों. त्या दिवशीं दुपारीं मला थोडा ताप आला असल्यामुळें मला त्याच्याकडे स्ट्रेचरवरून नेण्यांत आलें होतें. तो फांसावर चढण्यापूर्वी मला त्याची भेट घ्यायचीच आहे असा मीं आग्रह धरला आणि तुरुंगांतील अधिकाऱ्यांनीं तो पुरविला.

## (८)

अंधारी रात्र जाऊन फांशीचा दिवस उगवला. ती सबंध रात्र शिवरामनें विठोबाचं भजन रचण्यांत घालविली; कित्येक भजनें म्हटलीं, आणि मग भल्या पहांटे आंघोळ उरकून वैकुंठाला जाण्यासाटीं हा भक्त वैष्णव तयार झाला.

नेहमींच्या पद्धतीनुसार सकाळीं मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं विचारतांच त्यानें म्हटलं,

"माझ्या गोळीनेंच बाई मेली हें खरं, पण खून करण्याचा माझा उद्देश नव्हता हें तितकंच सत्य आहे. तरी पण माझ्या वांट्याला आलेली शिक्षा हा मी परमेश्वराचा न्याय मानतों आणि म्हणूनच मला कुठच्याहि

प्रकारचा असंतोष वाटत नाहीं. माझ्या हातून कुणाची कांहीं चूक झाली असेल तर सर्वांनीं मला क्षमा करावी. ”

एवढं सांगितल्यावर त्यानें विचारलं, “ गुरुमहाराजांची प्रकृति आतां कशी आहे ? त्यांना माझा अखेरचा प्रणाम सांगा. म्हणावं मला विसरूं नका. ”

फांसाच्या फळीवर चढल्यावर त्यानें जमलेल्या अधिकाऱ्यांना म्हटलं, “ साहेब, रात्रीं माझ्या पांडुरंगाचं मीं एक सुंदर भजन रचलंय तें आपण ऐकावं. ”

असं म्हणून त्यानें आपल्या गोड आवाजांत, उंच स्वरांत भजनाला सुरवात केली. भजनाचे करुण गंभीर सूर आसमंतात घुमले. तो बाह्य जगाला विसरला. ब्रह्मानंदीं लीन झाला. ललकारीचे सूर गळयांतून निघत असतांनाच त्याच्या तोंडावर काळी टोपी घालण्यांत आली. आरोहाचे उंच स्वर त्याच्या गळयांतून निघत असतांनाच त्याच्या गळयाभोंवतीं फांस टाकण्यांत आला. दुसऱ्या क्षणीं पायाखालच्या फळया सरकल्या.

“ खट्-”ट्... आवाज झाला.

प्राणज्योति विझली ! भजनाची स्वरमालिका गळयांत विरली ! !

—*—

# ही तर नुसती कुडीच आहे

सोमा फांशीची शिक्षा होऊन तुरुंगांत आला त्याच दिवशीं सकाळीं, सुमारें दहा वाजतां मी त्याला फांशी कैद्यांचे कोठड्यांतील त्याच्या कोठडींत भेटलों. अश्रुपूर्ण नेत्रांनीं त्यानें मला विचारलं,

"यांतून वांचण्याचा कांहींच का मार्ग नाहीं?" मीं फक्त एवढंच म्हटलं, "आतांपासून तुला घाबरून जाण्याचं कांहीं कारण नाहीं. अजून हायकोर्टांत अपील व्हावयाचें आहे. समज, हायकोर्टानें अपील फेटाळलं तर सरकारला दयेचा अर्ज करतां येईल. माझ्याकडून होतील तेवढे प्रयत्न मी करीन. पण तुझ्या केसचे सर्व कागद बघितल्याशिवाय मी आतांच काय सांगूं? सध्यां तुला एवढंच सांगतों कीं ईश्वराचं चिंतन कर आणि त्याच्या कृपेची याचना कर. तोच तुला संकटांतून सोडवील."

त्यानंतर मीं त्याला केसची हकीकत विचारण्याचा प्रयत्न केला. पण मला वाटलं कीं तो खरी हकीकत लपवून ठेवतो आहे. कारण तो एकसारखा "मी निर्दोष आहें" असंच म्हणत होता! नि रडत होता. त्यामुळें मीं एवढ्यावरच माझी मुलाखत आटपती घेतली.

तिथून निघून मी स्त्रियांच्या वार्डांत त्याच्याबरोबरच फांशीची शिक्षा होऊन आलेल्या मणीला भेटायला गेलों. सोमापेक्षां ती जास्त धैर्यवान दिसली. ती रडत नव्हती. स्वतां निर्दोष असल्याचं अगदीं ठासून सांगत होती, तिच्या स्वरांत नि नजरेंत सोमाबद्दलचा खुनशीपणा पूर्ण भरला होता. तिनें म्हटलं,

"तो मेला सोम्या स्वतां खड्डयांत पडला नि माझ्या कपाळीं कायमचा कलंक लावून ठेवला मेल्यानें!"

तिच्याकडूनहि पूर्ण व सत्य हकीगत मिळणें त्यावेळीं अशक्य होतें. म्हणून अधिक चौकशी न करतां मी माझ्या खोलीकडे परतलों. त्यांच्या केसचे कागद बघितल्यावर जास्त चौकशी करावी असं मनाशीं नक्की केलं.

दुसऱ्या दिवशीं माझ्या हातीं कोर्टाच्या निकालाची प्रत आली. सहा दिवसाच्या आंत दोघांचीं अपीलें हायकोर्टांत दाखल करावयाचीं होतीं.

(२)

मणीचं वय सुमारे पंचवीस वर्षांचें होतं. जातीनें पाटीदार. सोमा लोहार जातीचा असून त्याचें वय सुमारें तीस वर्षांचं होतं. दोघेहि गोध्रा तालुक्यांतल्या गोकळपरा गांवांत एकाच गल्लींत समोरासमोर राहात होतीं.

चतुर रणछोड नांवाच्या एका सुखवस्तु पाटीदार तरुणाबरोबर वयाच्या दहाव्या वर्षी मणीचं लग्न झालं होतं. कुटुंब खाऊन पिऊन सुखी. पण चतुर दिसायला अगदींच कुरुप होता. त्या मानानें मणी बरीच देखणी होती. याप्रमाणें तें एक विजोड जोडपें होतं, आणि विशेष दुःखाची गोष्ट म्हणजे चतुरला " पुरुषत्व " नव्हतें.

मणीचं वय वाढूं लागलं तसतशी तिला आपल्या नवऱ्याच्या शारीरिक व्यंगाची जाणीव होऊं लागली, आणि नैसर्गिक वासनातृप्तीसाठीं ती मार्ग शोधूं लागली. त्यासाठीं तिला फार दूर जायला लागलं नाहीं. समोरच्याच घरांत सोमा राहात होता. दिसायला मोटा देखणा नि वयानें तरुण! मणीनें त्याच्याबरोबर संधान बांधलें. चतुरला ह्या संबंधाची माहिती कळली होती पण स्वताचं व्यंग बाहेर फुटूं नये आणि कुठच्याहि का मार्गानें होईनात, आपल्या घरांत मुलें असावींत या इच्छेनेंहि तो तिकडे कानाडोळा करीत होता. या संबंधाला त्याची एक प्रकारची मूक संमतिच समजायला हरकत नव्हती.

या प्रेमसंबंधापासून तिला दोन मुलें झालीं. अर्थात् हीं चतुरचीं मुलें म्हणूनच समाज ओळखीत असे.

चतुरचं घर मोठं होतं. दोनतीन खोल्या एकमेकाला लागून व स्वतंत्र अशा होत्या. एकांत चतुर व त्याचं कुटुंब रहात होतं. पण खेड्यांतलं जीवन, त्यामुळें स्वतंत्र रहाणें असूनहि मणी आणि सोमा दोघें एकमेकांना उघड भेटूं शकत नसत. त्यांची भेट रात्रीच्या अंधारांतच होई.

एक दिवस चतुर कांहीं कामासाठीं बाहेरगांवीं गेला होता. कमींतकमी दोनतीन दिवस तरी त्याचे मोडणार होते. त्या दिवशीं संध्याकाळीं दिवे-लागणीच्या सुमारास सोमा व मणी या दोघांना निवांतपणें भेटायला मिळालं. आंतल्या खोलींत खाटेवर पडल्यापडल्या दोघेंहि आरामांत गुजगोष्टी करीत होतीं. सुमारें सहा वर्षांचा त्यांचा मुलगा बाहेरच्या खोलींत खेळत होता. खोलीचा दरवाजा उघडा होता.

दोघेंहि गप्पागोष्टींत रंगून गेलीं होतीं. तितक्यांत अचानक एकाएकीं चतुर घरीं आला. त्याची मूक संमति होती तरीसुद्धां समोर खाटेवरचं दृश्य नजरेनें बघतांच स्वाभाविकच तो चिडला. पत्नीच्या अनीतिमय वर्तनापेक्षांहि स्वतांच्या दुर्बलतेची, अपौरुषत्वाची जाणीव त्या क्षणीं त्याला तीव्रतेनें झाली, समोरच्या दृश्यानें ती उग्र बनली. संतापानें तो बेफाम झाला. त्याला क्रोधायमान झालेला पाहातांच सोमाला वाटलं कीं आपल्या या वर्तनाचा हा साऱ्या गांवभर डांगोरा पिटील, आपली नाचक्की होईल. त्यापेक्षां त्याला इथंच निजधामास पाठवावा म्हणजे मणीचा व आपला प्रेमसंबंध इथेंच गाडला जाईल.

जवळच्या कोनाड्यांत भाजी चिरायची सुरी होती, ती घेऊन त्यानें चतुरवर हल्ला केला. त्याला खाटेवर पाडून सोमा त्याच्या छातीवर चढून बसला, आणि छातीवर सुरीचे एकामागून एक अनेक वार करून तो आपल्या घरीं पळून गेला. मणी जवळच उभी होती, ती या प्रकारानें एक तर स्तंभित झाली असावी, अगर या कृत्याला तिची संमति असावी. वाटेल तें असेल, पण एवढं खरं कीं तिनें कुठच्याहि प्रकारचा आरडा-ओरडा केला नाहीं.

चतुरनें " मारलं ! मेलों ! धांवा ! मला वांचवा ! " असा ओरडा केला, त्याबरोबर शेजारी राहाणारी त्याची स्नेही नातलग मंडळी धांवून आली. ती मंडळी येऊन पोंचली तेव्हां त्याचेवर वार झालेले होते, आणि चतुर मृत्यूच्या दारांत होता. मणीच्या मुलानें, सोमाला चतुरच्या छातीवर बसतांना आणि सुरीचे वार करतांना पाहिलं होतं. त्याच्या सांगण्याप्रमाणें मणी चतुरचे पाय दाबून धरून खाटेवर बसली होती.

दुसरे दिवशीं रामनवमी होती–ही घटना आदले दिवशीं–ता. १३ एप्रिल १९४३ रोजीं सायंकाळीं घडली.

( ३ )

केस पंचमहालला सेशन कोर्टांत रीतसर सुरू झाली आणि खुनाचा कट शाबित धरून सेशन जज्जांनीं दोघांनाहि फांशीची शिक्षा दिली. सोमानें खून केला होता यांत शंकाच नव्हती. पण मणी खरोखरच यांत सामील होती कीं काय हा प्रश्न गंभीरपणें विचार करण्यासारखा होता.

सोमानें बचावाखातर सांगितलें कीं, " मला कांहीं माहीत नाहीं. माझ्या शत्रूंनीं माझ्याविरुद्ध हा कट रचलेला आहे. मणीचा मुलगा मीं खून केल्याचें जें सांगतो आहे तें केवळ इतरांच्या शिकवणीवरून सांगतो आहे."

मणीनें स्वतांच्या बचावाचें जें निवेदन केलं होतं त्यांत सोमाला तिनें पुरता अडकवून टाकला होता. तिचं म्हणणं असं कीं " अचानक चतुर आला त्याला पाहून भीति व द्वेषाचे मिश्र भावनेनें बेफाम बनून सोमानें त्याचा खून केला आणि तो स्वतांच्या घरीं पळून गेला. या दृश्यानें मी घाबरून गेलें. खोलींतच होतें, पण या कृत्यांत माझा बिलकूल हात नव्हता."

सोमाच्या बचावाखातर अपील अर्जांत लिहिणार तरी काय? तो खुनाच्या वेळीं थोडा दारू प्यायलेला होता. पण ही गोष्ट कोर्टापुढें कशी आणायची? शिवाय त्याच्याविरुद्ध मणीचं निवेदन, मुलाची साक्ष आणि एकंदर संदर्भच असे होते कीं बचावांत कांहीं सांगण्यासारखं नव्हतंच.

पण मणीची गोष्ट वेगळी होती. मला स्वतांला शंका होती. मुलाची जबानी खरी वाटत होती. तें बालक आपल्या आईविरुद्ध खोटं कशाला बोलेल? आणि मणीला या केसमध्यें निष्कारण अडकवण्यापासून चतुरच्या नातलगांना तरी काय फायदा होणार होता?

पण खून झाला त्यावेळीं खोलींत जवळजवळ अंधारच होता, सर्व कांहीं स्पष्ट दिसेल असा उजेड नव्हता. आणि मणी खाटेवर बसली ती नवऱ्याचा खून होण्यापूर्वीं बसली कीं सोमानें वार केल्यावर घाबरून नि दुःखानें ती त्याच्या पायावर पडली होती हें नक्की सांगतां येण्यासारखं नव्हतं. आणि

म्हणूनच तिच्या गुन्ह्याविषयीं मला शंका होती आणि या संशयाचा फायदा तिला कायद्याप्रमाणें मिळाला पाहिजे असा माझा मुद्दा होता.

अपील लिहिण्याच्या वेळीं मीं मणीची चांगलीच उलटतपासणी केली. एकंदरीनें पाहतां चतुरमध्यें पुरुषत्व नव्हतें अशी मला शंका होती ती खरी असल्याची मीं जेलमधील इतर कैदी स्त्रियांचे मार्फत तपास करविला त्यावरून खात्री झाली. तेव्हां मीं मणीला पुन्हां पुन्हां म्हटलं,

" तूं स्वतां निर्दोष आहेस असं म्हणतेस पण मला आलेला संशय दूर होत नाहीं. मला अजूनहि असं वाटतं कीं या खुनांत प्रथमपासून किंवा मागाहून तुझा अप्रत्यक्ष कांहींतरी हात असावा. तेव्हां तूं मला सर्व खरं काय तें सांग. संशयाचा फायदा देऊन हायकोर्ट तुला सोडील असें वाटतें पण तेवढ्यानें माझा संशय दूर होणार नाहीं. "

मग मात्र मणीनें माझ्या शंकेस असं कांहीं उत्तर दिलं कीं माझा संशय संपूर्ण फिटला. तिनें म्हटलं,

" दादासाहेब, आपण जरा विचार तर करून बघा. पतीला ठार मारण्यांत मला काय लाभ होणार होता ? विधवा होऊन सोमाबरोबरचा माझा संबंध थोडाच चालू राहाणार होता ? उलट चतुर जिवंत असता तर नवऱ्याच्या नांवाखालीं आम्ही वाटेल तें करूं शकलों असतों, सर्व कांहीं खपून गेलं असतं. सोमा बेअकली ! त्यानें महामूर्खपणा केला. स्वतां तर खड्ड्यांत पडलाच पण मलाहि त्यानें तोंडघशीं पाडलं. "

या तिच्या युक्तिवादानें मला निरुत्तर केलें. तिची गोष्ट अगदीं खरी होती. चतुर जिवंत राहिला असता तर मणी–सोमाचा प्रेमसंबंध तसाच कायम चालू राहिला असता. हिंदु समाजांतील विधवाजीवन स्वतां ती जास्त पसंत करील हें शक्य तरी आहे का ? मीं तिला म्हटलें, " माझी खात्री झाली. तूं सांगितलेंस तें माझ्या लक्षांत आलें नव्हतें–माझी शंका फिटली."

## ( ४ )

माझ्या नित्यक्रमाप्रमाणें मी सोमाला रोज एक तासभर भेटायला जात असें. हायकोर्टाचा काय निकाल लागतो इकडेच सुरवातीला सोमाचं लक्ष

लागलेलं असे. त्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि गोष्टींत त्याला स्वारस्यच नसे. त्यामुळें माझी मोठी पंचाईत होई. कारण खरी गोष्ट त्याला सांगण्यासारखी नव्हती आणि मला खोटं बोलावयाचं नव्हतं! तेव्हां मी त्याला काय सांगणार? मी एवढंच सांगे कीं "अपिलाचा शेवट जो यायचा असेल तो येवो. ईश्वराची इच्छा असेल तसें होईल. आपण ईश्वराची प्रार्थना करून त्याचे आशीर्वाद मागूं या."

याप्रकारें त्याचें थोडें समाधान होत असे व मग इकडच्या तिकडच्या दुसऱ्या गोष्टी निघत असत.

माझ्या अंदाजाप्रमाणेंच हायकोर्टानें अपिलाचा निकाल केला. अपील रद्द करून फांशीची शिक्षा कायम केली! मणीला निर्दोष ठरवून सोडून दिली. सोमाचें भवितव्य निश्चित झालें! त्याचा दयेचा अर्जहि मंजूर होईल अशी मला अपेक्षा नव्हती. तरीसुद्धां मी तो करणार होतोंच. फांशीच्या प्रत्येक केसमध्यें दयेचा अर्ज केला पाहिजे असा एक नियम आहे. आरोपीनें स्वतां केला नाहीं तर तुरुंगाधिकाऱ्यांनीं त्याच्या वतीनें करायचा अशी प्रथा आहे. याचं कारण एवढंच कीं कुणालाहि फांसावर चढवण्यापूर्वीं त्याच्या केसचा सर्वांगीण विचार करण्याची संधि सरकारला मिळावी.

या साऱ्या प्रकरणांत मला एका गोष्टीचं मोठं आश्चर्य वाटत असे, कीं सोमानें रोज एकच जप चालवला होता. तो म्हणे कीं, "फांशी देण्यापूर्वीं माझी नि मणीची पांच मिनिटापुरती तरी भेट घडवा."

पण तसं घडणं अशक्य होतं. कारण, एक तर मणी स्वतां फांशी कैदी तिला स्त्रियांच्या वार्डांत चोवीस तास एका खोलींत कडीकुलुपांत ठेवीत. तेव्हां तिला बाहेर काढायची कशी नि पुरुषांच्या वार्डांत आणायची कशी? दुसरं, मला पक्कें माहीत होतं कीं खुनाचा प्रसंग घडल्यानंतर मणीच्या मनांत त्याच्याविषयीं बिलकूल सद्भाव राहिला नव्हता. उलट ती त्याचा अत्यंत तिरस्कार करूं लागली होती; नि त्याचं नांव निघतांच, "त्याच मेल्या चांडाळानें माझी ही अशी दशा करून टाकली" म्हणून शिव्याची लाखोली वाहत होती. तिच्या या बदललेल्या भावनेची अर्थात् सोमाला कांहींच

कल्पना नव्हती. ह्या दोन्ही कारणांस्तव मी, रोज सोमाला समजावण्याचा प्रयत्न करी कीं,

" आतां मणीला भेटून आपल्याला करायचं आहे काय? ती परस्त्री आहे. तिला तूं विसरून जावंस हें चांगलं; शिवाय तुरुंगाच्या नियमाप्रमाणें तिला इथं आणतांहि येणार नाहीं. "

पण सोमाच्या मनाला एवढ्यानें समाधान होत नसे. त्याचं प्रेमवेडं मन समजूत पटवून घ्यायला तयार नव्हतं. व मी कांहीं करूं शकेन असें नव्हतें. तिला भेटण्यासाठीं तो तळमळत होता. तिला भेटवण्याची आतां एकच संधि होती, ती म्हणजे तिच्या सुटकेचा हुकुम हायकोर्टाकडून आला, म्हणजे तिला तुरुंगांतून सोडतेवेळीं सोमाच्या खोलीवर घेऊन जायचं. त्याप्रमाणें मी तुरुंगाधिकाऱ्यांकडून तशी परवानगी पण मिळवून ठेवली होती.

आतां मणीला कशा तऱ्हेनें समजवायचं हा माझ्यापुढें एक मोठा प्रश्न होता. कारण एकदां तिच्याजवळ मी, सहज म्हणून, सोमाची भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली होती तेव्हां ती खूप चिडली होती, नागिणीसारखी चवताळली होती आणि आपल्या पाटीदारी* भाषेंत तिनें त्याला शेलकी " पुष्पांजली " वाहिली होती. आणि शेवटीं ती मला म्हणाली !—

---

* गुजराथेंतील पाटीदार ज्ञाति अनेक गुणांमुळें महान् व प्रख्यात आहे. उत्तम शेतकरी, उत्तम व्यापारी, उत्तम राजकारणधुरंधर वगैरे या ज्ञातींत झालेले आहेत, त्याग, धडाडी, शौर्य, क्षात्रवृत्ति, औदार्य वगैरे अलौकिक गुणांचा समुच्चय या ज्ञातींतील मंडळींत आहे—पण यांचें बोलणें ओबडधोबड, आडपडदा किंवा मृदुता नाहीं ! सरळ शल्याप्रमाणें हृदयांत बोंचणारें. यामुळें ग्राम्य शिव्या वगैरे कोणी देऊं लागला तर त्याला " पाटीदारी भाषेंत नको बोलूं, बाबा. " असें म्हणतात. राजकारणधुरंधर, देशभक्त, कणखर वृत्तीचे व त्याग करणारे स्व. विठ्ठलभाई व वल्लभभाई पटेल याच ज्ञातीचे, त्यागमूर्ति दरबार गोपाळदास देसाई याच ज्ञातीचे, मुंबईचे प्रख्यात उद्योगपति स्व. मगनलाल गगलभाई इत्यादि मंडळी याच ज्ञातींतील.

" त्याला जाऊन सांगा– म्हणावं तुझं काळं तोंड बघण्याची माझी इच्छा नाहीं. "

तिच्या क्रोधाचं कारण मला समजत होतं, तरीसुद्धां मला असं वाटत होतं कीं लग्न न करतांहि ज्याच्याबरोबर वैवाहिक जीवनाचा, दांपत्यसुखाचा जिनें अनुभव घेतला तिनें त्याची अखेरची इच्छा पुरी करण्याचं नाकारणें हा तिचा अत्यंत क्रूरपणा आहे. तिला त्याचेविषयीं तिरस्कार वाटत असला तरीसुद्धां, तो मृत्यूच्या दारांत उभा असतांना त्याची अखेरची प्रबल इच्छा पुरी करण्याइतकी उदारता तिनें दाखवायला हवी. म्हणून मीं तिला समजावीत म्हटलं,—

" मणी, त्यानें तर अधम कृत्य केलं आहे, तुझं सारं आयुष्य मातीमोल केलं आहे, हें सर्व खरं. पण तुझ्याविषयीं त्याच्या मनांत असणारं प्रेम बघितलं, म्हणजे त्याची अखेरची इच्छा पूर्ण न करतां तूं त्याला झिडकारावंस हें मला नाहीं आवडत. फार नाहीं, फक्त दोन मिनिटंच तूं माझ्याबरोबर चल. तुझी इच्छा नसली तर एक शब्दहि त्याच्याशीं बोलूं नकोस. पण तुझं तोंड त्याला बघूं दे आणि मग लागलीच निघून ये. "

मोठ्या मिनतवारीनें मणी कबूल झाली. मलाहि संतोष वाटला.

तिच्या सुटकेचा हुकुम मिळाल्यावर तिला घेऊन मी सोमाच्या खोलीवर गेलों. आधीं मी सोमाला खबर दिलीच होती. तो तिला भेटायला अत्यंत आतुर झाला होता. आम्ही त्याच्या खोलीचे लोखंडी जाळीच्या दरवाज्या-बाहेर येतांच तो गद्गदित झाला. हात जोडून त्यानें दाटलेल्या कंठानें एवढंचं म्हटलं,

" मणी, मी पापी आहें, तुझा मोठा अपराध केला आहे. मला क्षमा कर. "

मणीचा क्रोध एकदम जागृत झाला, उग्र झाला. क्षमा करायची राहिली बाजूला उलट तिनें त्याला वाटेल तसं अद्वातद्वा बोलायला सुरवात केली ! मीं सोमाकडे पाहिलं. तो एकंदर देखावा मला अत्यंत करुण वाटला ! सोमानें वाटेल तें केलं असलं तरी ज्या स्थितींत तो आतां पडला होता त्या स्थितींत त्याच्या जखमेवर मीठ चोळणं योग्य नव्हतं. मला तें सहन होईना,

म्हणून मणीला अधिक बोलूं न देतां मीं सोमाचा निरोप घेऊन तिला घेऊन बाहेर पडलों. सोमा अगदीं शांत असा जाळीचे आंत उभा होता.

माणसाच्या हृदयांत प्रेमाचा प्रवाह किती प्रबल नि वेगवान असतो हें कोण सांगूं शकेल ?

सोमाचा मृत्यु तर १०० टक्के नक्की झालाच होता. दयेचा अर्ज केला त्यांत गुन्ह्याचं सौम्य स्वरूप दाखवण्यासारखं कांहीं नव्हतं. तेव्हां सौम्यपणा दाखवण्यासाठीं मीं खालील मुद्दे अर्जांत लिहिले :

(१) त्याचं तरुण वय.

(२) त्याच्या मृत्यूमुळें त्याच्या वृद्ध आईला होणारं दुःख.

(३) त्याच्यामागें त्याच्या लहान भावंडांची होणारी विनाधार स्थिति.

(४) गुन्हा हेतुपुरःसर नव्हता. दारूच्या नशेंत घडला. अर्थात् हें शेवटचं कारण अगदींच लंगडं होतं.

या अर्जाचा निकाल काय लागणार हें दिसतच होतं. तेव्हां आतां मरणाला तयार होणें हा एकच मार्ग होता. मी त्याला सांगे " आपण अनुकूल निकालाची आशा करूं या पण आपलं खरं कर्तव्य म्हणजे मृत्यूसाठीं तयार होणं हेंच आहे. मृत्यु कुणाला सुटला आहे ? कुणाला लवकर, कुणाला उशीरां, एवढंच ! मानवी आयुष्यांत मरण हें जर निश्चित, तर मग मरणाचें भय न बाळगणें हेंच मृत्यूसमोर आपलें हत्यार आहे.

मी हें सर्व तत्त्वज्ञान त्याला सांगे, पण त्याचा परिणाम त्याच्यावर कितपत होत असे कोण जाणे !

आतां या मरणांतून सुटका नाहीं ह्या विचारानें कदाचित् त्याचं मन मरणास तयार होत असावें.

एक दिवस त्याच्यांत एक आश्चर्यकारक बदल झालेला मीं पाहिला. जो नेहमीं डोळ्यांत पाणी आणून आणि भीतीनें कंपित होऊन फांशीसंबंधीं बोलत असे तो एकदम हिंमतवान् बनलेला दिसला. त्याचं असं झालं होतं; सोमा माझ्याकडे कांहींतरी वाचायला मागे. मी त्याला सोप्या गोष्टींचीं पुस्तकें देत असें. पण ज्या दिवशीं हायकोर्टानें त्याचं अपील फेटाळलं त्या दिवशीं मला वाटलं त्याला भगवद्‌गीता वाचायला द्यावी आणि तींतील

उपदेशाचं चिंतन–पारायण करायला त्याला सांगावं. त्याप्रमाणें "सस्तु साहित्यवर्धक" कार्यालयातर्फे प्रकाशित झालेल्या गीतेच्या अनुवादाचं पुस्तक मीं त्याला दिलं. त्यानंतर चारपांच दिवसांनीं निराळंच दृश्य माझ्या नजरेला पडलं. आश्चर्य वाटलं, व मनाला शांतिहि लाभली. मला पाहातांच सोमानें हंसून म्हटलं,

"दादासाहेब, आतां मला समजलं."

"काय समजलं ?"

स्वताचं शरीर दोन्ही हातांनीं आपादमस्तक दाखवीत त्यानें म्हटलं, "ही तर नुसती कुडी आहे."

"कोणीं सांगितलं तुला असं ?"

"पहा ना, खुद्द भगवंतानेंच असं म्हटलं आहे. माझं शरीर नष्ट होईल पण आत्मा तर अविनाशीच राहाणार. कुडी जाईना का, खुशाल जाऊं दे. आतां मी समजलों."

त्यानंतर अखेरपर्यंत सोमाच्या तोंडावर दुःखाची किंवा उदासीनतेची छाया मला कधींहि दिसली नाहीं. भगवद्गीतेंतलं "वासांसि जीर्णानि यथा विहाय" वगैरे तत्त्वज्ञान सोमानें इतक्या जलद आत्मसात् केलं होतं कीं खरोखर मला ती एक आश्चर्यजनक घटना वाटली. कदाचित् असंहि असेल कीं मृत्यूंतून सुटण्याचा कांहींच संभव नसल्यामुळें हें तत्त्वज्ञान त्याच्या मनांत लवकर व परिणामकारक प्रकारें ठसलं असेल. कारण वाटेल तें असो, पण सोमाला गीतेंतील तत्त्वज्ञानाचं ज्ञान झालं हें खरं.

त्याला २४ जान्युआरी १९४४ रोजीं सकाळीं ९ वाजतां अहमदाबाद (साबरमती) सेंट्रल जेलमध्यें फांशी देण्यांत आलं.

त्याची कुडी इथंच राहिली. आत्मा ईश्वरांत विलीन झाला !

—*—

# प्रेमी शहाजादा

शहाजादा कानपुरचा रहिवासी. सुमारें सव्वापांच फूट उंची, कसं घाटदार घोटीव शरीर, श्यामल वर्ण, पण रेखीव मुखाकृति, डोळे अतिशय पाणीदार असलेला हा देखणा तरुण सुमारें ३० वर्षें वयाचा होता. मिलमध्यें नोकरी करण्यासाठीं अहमदाबादला येऊन राहिला होता. कानपुरला आई वडील आणि बहीण मेहुणा एवढीच कुटुंबीय मंडळी होती.

अहमदाबादला तो एकटाच राहात असे; त्यामुळें निष्काळजी जीव असे. राहात असे मोठ्या ऐटींत. बडा बहादुर! कुणाचाहि भांडणतंटा चाललेला असला कीं इकडे याचं रक्त सळसळायचं आणि मग ही स्वारी अनाहूत त्या भांडणांत पडलीच म्हणून समजावं. स्वभावानें अति उदार. रसिक, रंगेल वृत्तीचा! ज्या गोमतीपुरा या भागांत राहात असे तिथले लोक "गोमतीपुरचा दादा" याच नांवानें त्याला ओळखीत.

तो राहात होता त्याच्या शेजारीं बबली नांवाची एक २०–२२ वर्षांची वाघरी जातीची तरुणी आपल्या आईवडिलांजवळ राहात असे. थोड्या वर्षांपूर्वीं तिचं लग्न झालं होतं. नवरा ५५–६० वर्षांचा बुड्ढा आणि त्यांत एक डोळा फुटका! शहाजाद्याच्या तुलनेंत तर तो पासंगालाहि न पुरणारा! बबलीला तो कसा आवडावा? नवऱ्याकडे न जातां ती आपल्या आईवडिलां-जवळ राहात असे. तिच्यावर शहाजाद्याचं प्रेम जडलं. तें प्रेम इतरांच्या नजरेंत भरेल इतक्या उघड तऱ्हेनें तीं दोघें निःसंकोचपणें वागत असत. थोड्या दिवसांनीं शहाजादा तिच्या आईवडिलांकडेच राहायला आला. जवळजवळ घरजांवईच बनला. फरक इतकाच कीं या घरजांवयाच्या मिळ-कतीवर बबली आणि तिच्या आईवडिलांचं पोषण होत असे.

तिचा विवाह विजोड झाला! पण हिंदुमुस्लीम एकी शेवटीं छान साधली असं विनोदानें म्हणायला हरकत नाहीं.

बब्लीवर शहाजाद्याचं अपार प्रेम होतं. ती लग्नाची बायको नसूनसुद्धां तो पत्नीसारखीच तिला वागवत असे, त्या निष्ठेनें राहात असे. त्यामुळें बब्लीकडे दुसऱ्या कुणा तरुणाची दृष्टि गेली अगर तिची कुणाकडे नजर लागली तर त्याच्या मनांत शंकेचें वादळ उठे नि त्याला ईर्ष्या वाटे. तिला सुखी ठेवण्यासाठीं तो अथांग प्रयत्न करी. खाणंपिणं, कपडालत्ता ती जें जें म्हणेल तें तें तो तत्परतेनें विनाविलंब पुरवी. त्यासाठीं त्यानें पैशाकडे कधींहि पाहिलं नाहीं. कानपुरला आईवडिलांना पैसे पाठवीत नसे पण तिच्यासाठीं सर्व प्रकारचा खर्च करी.

तिच्या घरीं एक वाघरी तरूण येत असे. त्याचा तिच्याशीं खूप स्नेह होता. दोघेहि बोलत, बरोबर हिंडत, एकमेकांची चेष्टा करीत, परंतु बहीण-भावासारखीं वागत. दोघांचं प्रेम निर्दोष होतं, त्यांत विषयवासना मुळींच नव्हती. तरी पण शहाजाद्याच्या संशयित मनास जबरदस्त शंका आली कीं बब्लीचा त्या वाघऱ्याशीं अनैतिक संबंध आहे! शहाजादा क्रोधाग्नीनें धुमसत असे.

अति प्रेम असंच संशयी असतं ना? त्या दोघांना एकत्र बघून त्याचा क्रोध भडके. दुसऱ्याच्या विवाहित पत्नीबरोबर प्रेमसंबंध ठेवण्याचा आपणाला पूर्ण हक्क आहे असं मानणारा शहाजादा तशी सूट दुसऱ्याला द्यायला मात्र तयार नव्हता. किती विचित्र मनोवृत्ति!

बहुधा तो होळीचा दिवस असावा. तो वाघरी तरूण त्या दिवशीं बब्लीच्या घरीं जेवायला आला होता. खाण्यापिण्यांत आणि एकमेकांची थट्टामस्करी करण्यांत दोघेंहि गर्क झालीं होतीं. तेवढ्यांत शहाजादा तिथं येऊन टेपला. त्या वाघरी तरुणाला बघतांच त्याचं पित्त भडकलं, आणि त्यानें सुरी घेऊन बब्लीवर हल्ला केला, तिचेवर भयंकर वार केला.

रक्तबंबाळ स्थितींत ती जी एकदम बेशुद्ध पडली ती पुन्हां शुद्धीवर न येतांच मेली. आपल्या हातून हें काय घडलं याचं भान होतांच शहाजाद्याला असीम दुःख झालं. अविचाराचा, कृतकर्माचा पश्चात्ताप झाला. पण गोष्ट होऊन गेली होती. तो दिङ्मूढ होऊन बराच वेळ तिच्याकडे पाहात होता. त्या दुःखांतच त्याच्या मनांत एकदम धास्ती

उत्पन्न झाली कीं, पोलीस येऊन पकडतील. हा विचार येतांच तो तिथून वायुवेगानें निसटला. पोलिसांना खुनाची बातमी मिळाली. पण ते येऊन पोंचण्यापूर्वी शहाजाद्यानें अहमदाबाद स्टेशन गांठून, तिकिट काढून तो कानपूरच्या गाडींत बसला. इकडे पोलिसांनीं बराच तपास केला पण अहमदाबादमध्यें त्याचा पत्ता लागला नाहीं. तिकडे कानपुरांत शहाजादा स्वतंत्रपणें, उघड रीतीनें फिरत होता. तो कानपुरांतच राहिला असता तर कदाचित् पकडला पण गेला नसता.

पण विधिघटना कांहीं वेगळीच होती. अपराध्याला शिक्षा करण्याचे विधात्याचे मार्ग वेगळे असतात. ते आपण जाणूं शकत नाहीं. कानपुरांत एक महिना घालवल्यावर आतां खुनाची गोष्ट अहमदाबादेंत मागें पडली असेल असें त्याला वाटलें; पण त्याहिपेक्षां विशेष म्हणजे पोलिसांच्या भीतीनें इतके दिवस दबलेली बबलीविषयींची त्याची भावना उफाळून वर येऊं लागली. बबलीबरोबर ज्या झोपडींत तो राहात असे, जिथं तिचा खून त्यानें केला त्या जागेचं दर्शन घेण्याची त्याची इच्छा दिवसेंदिवस अनावर होत चालली. तिची स्मृति त्याच्या हृदयांत ताजीच होती. ज्या जागीं, ज्या खोलींत दोघांनीं प्रेमालाप केले, मजेंत दिवस घालवले, ती खोली, ती जागा, ते प्रसंग त्याच्या नजरेसमोर सतत उभे राहात आणि मग तो बेचैन बने. त्या स्थळाचं दर्शन घेऊन बबलीला भेटण्याचं समाधान मानावें या कल्पनेनेंच अहमदाबादला जाण्याची ओढ अनावर होई. प्रेमाचं आकर्षण मोठं विचित्र असतं !

शेवटीं एक दिवस अगदीं न राहवून तो अहमदाबादला आलाच. आल्याच्या तिसऱ्या दिवशीं, तो आल्याची पोलिसांना बातमी लागली. आणि खुनाच्या आरोपाखालीं त्याला पकडण्यांत आलं. त्याच्या कृत्याचा कोणत्याहि प्रकारचा नैतिक किंवा कायद्याचे दृष्टीनें बचाव नव्हता—नीतीचा विचारहि त्याला कधींच शिवलेला नव्हता. बचावांत त्यानें एवढंच सांगितलं होतं कीं, "बबलीचा खून कोणीं केला मला माहीत नाहीं. तिच्यावर माझं अत्यंत प्रेम होतं, मीं तिचा खून करणं अगदींच असंभवनीय आहे."

पण एकंदर पुरावा त्याच्या विरुद्ध होता. त्या वाघरी तरुणाविषयीं संशय येऊन ईर्ष्येचे भरांत बबलीवर राग काढून त्यानें तिचा खून केला ही

गोष्ट सत्य होती. शहाजाद्याचें आणखी असेंहि म्हणणें होतें कीं ' मी दारू प्याल्यामुळें उन्मत्त झालों होतों. '

कोर्टानें आणि ज्युरीनें त्याची जबानी खरी न मानतां त्याला गुन्हेगार ठरवून फांशीची शिक्षा दिली. शहाजाद्यानें शांत चित्तानें शिक्षा ऐकली. पण तुरुंगांत आणल्यावर बंद खोलींत जेव्हां त्याला कोंडण्यांत आलं, तेव्हां फांशीचं भीषण स्वरूप त्याच्या नजरेसमोर उभं राहिलं. त्याचा धीर खचला नि डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले.

तो तुरुंगांत आल्यावर दुसऱ्या दिवशीं मी त्याला भेटलों. त्याचं हाय-कोर्टातलं अपील तुरुंगाबाहेरूनच करण्यांत आलं होतं त्यामुळें मला त्या संबंधानं कांहींच करावयाचें नव्हतें. अंदाजाप्रमाणें तें फेटाळलं गेलं, आणि फांशीची शिक्षा कायम राहिली. आतां दयेचा अर्ज लिहिण्याचं काम माझ्याकडे आलं. त्या दरम्यान मी रोज त्याला भेटत असे. गप्पा मारतां मारतां त्याची सर्व सत्य हकीकत त्याच्याकडून मला कळली होती.

स्वभावानें तो अति चंचल आणि पोरकट वृत्तीचा वाटला. अति भावना-प्रधान आणि म्हणूनच विलक्षण क्रोधी, प्रमाणाबाहेर अविचारी. मनांत आलं रे आलं कीं एक घाव नि दोन तुकडे हा स्वभाव!

जसजसे दिवस गेले तसतशी त्याची फांशीची भीति कमी होत गेली. आणि फांसावर जाण्याची हिंमत मिळविण्याचे प्रयास सुरू झाले.

दयेचा अर्ज लिहिण्याची वेळ आली तेव्हां कोणत्या मुद्यावर भर द्यावा हा एक महत्त्वाचा प्रश्न होता. त्यानें कोर्टांत खोटी जबानी दिली होती यांत शंकाच नव्हती. आणि तोच बचाव अजूनहि कायम ठेवला तर दया कोण करणार? केलेल्या गुन्ह्याबद्दल कबुली देऊन पश्चात्ताप व्यक्त केला तर दया दाखवणाराचं मन थोडं तरी द्रवण्याची आशा. म्हणून मीं त्याला म्हटलं,

" आतांपर्यंत कोर्टकचेऱ्यांतील शिरस्त्याप्रमाणें खोटी हकीगत सांगत आलास, त्याचा परिणाम काय झाला तो बघितलास ना? आतां प्रश्न आहे दयेचा. फांशी तर जाणारच आहेस. तर मग खरं बोलून, गुन्हा

कबूल करून टाकावा आणि सरकारच्या दयेवर विसंबून राहावं, हेंच मला व्यावहारिक व लाभदायी वाटतें."

त्याला फारसें समजाविण्याची वेळच आली नाहीं. माझी गोष्ट त्यानें तात्काल मान्य केली. दयेच्या अर्जात मीं संपूर्ण सत्य हकीकत लिहिली.

आपण बबलीला मोठाच अन्याय केला आहे ही गोष्ट कबूल करून तिची माफी मागून, आपल्या वृद्ध आईबापांच्या दुःखाकडे लक्ष देण्याची विनंति करून दयेची मागणी केली, व शेवटीं सरकारचे दयाळूपणावर गोष्ट सोडून म्हटलें कीं, "जर सरकार फांशीची शिक्षा कायम ठेवील तर बबलीची माफी मागतां मागतां व पश्चात्ताप करतां करतां मी फांशी जाण्यास तयार राहीन. जगलों तर आजन्म बबलीचें स्मरण ठेवीन आणि दररोज तिची क्षमा मागीन."

अर्ज तर रवाना झाला. पण निकाल निराशाजनक येणार याची जाणीव होतीच. तेव्हां मृत्यूचं नेहमीचं तत्त्वज्ञान त्याला सांगण्याखेरीज मी तरी दुसरं काय करणार? तो माझ्याबरोबर खूप गप्पा मारीत असे. पण गप्पांचा त्याचा विषय एकच. तो म्हणजे बबली! ती किती प्रेमळ होती, त्याचं तिच्यावर किती निस्सीम प्रेम होतं, तिच्या सहवासांत त्यानें किती सुखी जीवन व्यतीत केलं होतं, वगैरेच्या तो अनेक आठवणी सांगत असे. थोडक्यांत म्हणजे त्याच्या ध्यानींमनीं तिचीच मूर्ति! तिचंच चिंतन!

त्याला आपल्या वृद्ध पित्याला भेटण्याची इच्छा होती. पण दरिद्री माणसाच्या इच्छा फारशा सफल होत नाहींत. पैशाचा प्रश्न उभा राहिला. मीं त्याला आश्वासन दिलं कीं, "प्रवासखर्चाची मी व्यवस्था करीन."

तें ऐकून त्याचं चित्त शांत झालं. थोड्या वेळानें त्यानें म्हटलं, "दादासाहेब, माझी आठवण म्हणून माझ्या आईला तिच्या दारिद्र्यावस्थेंत थोडी मदत म्हणून कांहीं पैसे पाठविण्याची व्यवस्था आपण नाहीं का करूं शकणार?"

मृत्यूच्या दारांत उभा असणाऱ्याची ही इच्छा कोण पुरी करणार नाहीं? मीं पैसे पाठविण्याचें कबूल केलं.

वृद्ध पिता पुत्राला भेटायला आला. तो शहाजाद्यास फांशी होऊन शेवटीं शहाजाद्याचें मृत शरीर त्याचे हवालीं होईपावेतों अहमदाबादेंतच राहिला होता.

पहिले दिवशीं बाप भेटावयास आला तेव्हां मुलगा बंद खोलींत भक्कम लोखंडी गजांच्या पिंजऱ्यांत गज धरून उभा होता. बाप बाहेरच्या बाजूला उभा राहिला. आपल्या वृद्ध पित्याला बघतांच त्याला भडभडून आलं. अश्रूंच्या धारा लागल्या, वृद्ध पित्याची तीव्र इच्छा कीं मुलाला कडकडून भेटून त्याचा अखेरचा निरोप घ्यावा. पण लोखंडी गजांच्या रूपानें तुरुंगाचा कठोर कायदा त्या दोघांमध्यें उभा होता. शहाजाद्याला बाहेर तरी काढायचं कसं ? त्याला बाहेर काढायचं म्हणजे त्याच्या हातांत हातकड्या घालायला हव्यात !

रडतां रडतां शहाजाद्यानें म्हटलं, "दादासाहेब, वाटेल तें करा, पण माझ्या पित्याचे पाय मला एकदां धरूं दे. माझं हें अखेरचं मागणं आहे."

गोष्ट क्षुल्लक, पण मानवी जीवनांत ही भावना अमोल होती. कुठच्याहि प्रकारें त्याच्या मनाला संतोष झालाच पाहिजे असं मला वाटलं. एवढ्या क्षुल्लक गोष्टींत पितापुत्रांची निराशा करणें ही मला भयंकर क्रूरता वाटली. पण त्या वेळीं माझ्या तरी हातांत काय होतं ? या गोष्टीला तुरुंगाधिकारी संमति देतील असं मला वाटलं नव्हतं. म्हणून मी कायदा जरा बाजूला ठेवून, दुसराच एक मार्ग स्वीकारला. त्याच्या कोठडीवरच्या पोलीस पहारेकऱ्याला मीं विनंति केली. माझ्या काकुळतीच्या विनंतीचा अव्हेर त्याच्यानें करवला नाहीं. मीं त्याला आश्वासन देत म्हटलं,

"या पितापुत्रांची भेट होऊं दे. हातकडी घातल्याशिवाय याला त्याच्या वडिलांचे पाय धरूं दे. ही गोष्ट बाहेर कुणालाहि कळणार नाहीं असं मी तुला वचन देतों. तुरुंगाच्या नियमाविरुद्ध वागल्याबद्दल जर तुला कांहीं सहन करावं लागलं तर सुपरिन्टेंडेंटपर्यंत माझं सर्व वजन खर्ची घालून मी तुझा बचाव करीन अशी मी तुला हमी देतों."

पहारेकरी झाला तरी तो माणूसच ना ? त्याचं हृदय पण विरघळलं. तो पुढें सरकला. न जाणो याच वेळीं एखाद्या तुरुंगाधिकाऱ्याला वॉर्डांत येण्याची बुद्धि व्हायची, म्हणून त्या पहारेकऱ्यानें प्रथम वार्डाचा मुख्य दरवाजा आंतून बंद करून घेतला, आणि मग शहाजाद्याच्या कोठडीचं कुलूप काढून दार उघडलं. चांगलीं दहा मिनिटें पितापुत्र कडकडून भेटले.

मुलानें आपल्या जन्मदात्याचे पाय चेपले आणि अश्रूंनीं अक्षरशः धुवून काढले. हा प्रसंग अत्यंत करुण आणि रोमांचक होता !

त्यांच्या या भेटीनंतर मला एक प्रकारचं समाधान वाटलं.

त्याचा फांशीचा दिवस नक्की ठरल्याची त्याला खबर मिळाल्यावर मी त्याला भेटायला गेलों असतां त्यानें म्हटलं,

" दादासाहेब, तुम्हांला कळलं ? "

" काय ? "

" ज्या दिवशीं मला फांशी देणार आहेत ना, त्याच दिवशीं माझी बबली मृत्यु पावली होती. खरंच मी किती भाग्यवान्! ज्या दिवशीं ती स्वर्गात गेली त्याच दिवशीं मी पण तिला तिथं भेटायला चाललों आहें. "

त्याचा चेहरा आनंदानें फुलला होता. प्रेमाचा किती विलक्षण प्रभाव हा ! मारण्याला प्रवृत्त करतें आणि मरणांतहि आनंद मानतें !

—*—

# हृदयपालट

धंधुका बाजूचा एक गोसावी. खुनाच्या आरोपाखालीं फांशीची शिक्षा होऊन तुरुंगांत आला होता. तो आल्यानंतर मी जेव्हां जेव्हां त्या फांशी वार्डांत त्याला भेटायला जाई तेव्हां तेव्हां ही स्वारी आपली कोठडींत खुशाल डाराडूर झोपलेली आढळे. त्यामुळें त्याच्याबरोबर फारसे बोलण्याचा प्रसंग मला आला नाहीं आणि त्याच्या केसची हकीकत पण त्याच्याकडून सविस्तर समजून घेतां आली नव्हती.

त्या गोसाव्यानें शेजारच्या एका तरूण बाईचा खून केला होता. त्या बाईबरोबर त्याचा प्रेमसंबंध होता. एक दिवस त्याच्या इच्छेला वश होण्याचं तिनें नाकारलं. त्याबरोबर गोसावीबुवा भडकले आणि जवळच पडलेलं अणकुचीदार शिंग उचलून तें त्या बाईच्या पोटांत खुपसलं. बाई तात्काळ मेली !

खरं पाहिलं तर या केसमध्यें अपील किंवा दयेचा अर्ज करण्यासारखं कांहीं नव्हतं. त्याच्या वतीनें अपील आणि दयेचा अर्ज तुरुंगाधिकाऱ्यांनीं पाठवला होता, पण त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं हें स्पष्ट दिसत होतं.

इच्छा दाखवतांक्षणींच विषयवासना तृप्त झाली नाहीं म्हणून विषयांध होऊन ज्यानें एका तरुण स्त्रीचा अमानुष खून केला त्याच्याबद्दल सहानुभूति वाटणार कुणाला ? मलासुद्धां अतिशय तिरस्कार वाटत होता. पण त्याला बंद खोलींत कोंडलेला पाहून जणूं कांहीं तो कसाईखान्याकडे नेला जाणारा प्राणी असावा अशा प्रकारची कांहीं विचित्र भावना माझ्या मनांत उत्पन्न झाली होती. आणि केवळ या भावनेमुळेंच मी त्याला भेटायला जात असे.

त्याला फांशी देण्याच्या आदल्या दिवशीं सायंकाळीं तो अगदीं गयावया करून आग्रहपूर्वक मला म्हणाला,

"दादासाहेब, उद्यां सकाळीं हें जग सोडून मी जाणार. आपण सकाळीं लवकर माझ्याकडे येऊन माझ्यासाठीं ईश्वरप्रार्थना आणि गीतेच्या एका अध्यायाचं वाचन नाहीं का करणार?"

त्याच्या या मागणीचं मला मोठं आश्चर्य वाटलं. पण त्या विनंतींत हृदयाची तळमळ, दुःख नि प्रामाणिकपणा दिसत असल्यामुळें मीं चटकन् हो म्हटलं. श्री. मामासाहेब फडके (गोध्रा हरिजन आश्रमवासी) माझ्याबरोबर होते, त्यांना घेऊन येण्याचं मीं कबूल केलं. गीतेचा अध्याय मी वाचणार होतों, पण श्री. मामासाहेब प्रार्थना आणि भजन फारच सुरेख नि परिणामकारक रीतीनें करीत असत, हें मला माहीत होतें.

तुरुंगाधिकाऱ्यांची परवानगी घेऊन आम्ही सकाळीं ६ वाजतां गोसावीबुवाच्या कोठडींत गेलों. मॅजिस्ट्रेट वगैरे बाहेरचे अधिकारी फांशीच्या वेळीं हजर राहातील, त्यांच्यादेखत आमच्यासारख्या राजकीय कैद्यांना त्याला भेटायला देणार नाहींत, म्हणून ती मंडळी येण्यापूर्वी आम्हांला प्रार्थना, भजन आटोपून घ्यायचं होतं.

आम्हा दोघांना पाहून त्याला फार बरं वाटलं. आम्ही त्याच्या खोलीचं दार उघडून घेऊन त्याच्याजवळ बसलों आणि आश्रम भजनावलींतून आश्रमांत रोज सकाळीं म्हणत असत ती प्रार्थना आणि गीतेचा आठवा अध्याय म्हटला.

सर्व पुरं झाल्यावर आम्ही जायला निघालों तेव्हां मीं त्याला म्हटलं, "आम्हांला आतां गेलं पाहिजे. तूं आतां ईश्वराचं ध्यान धर. तो तुला मानसिक बळ देवो हीच प्रार्थना."

गोसाव्यानें विचारलं, "फांशी जाईपावेतों मी कशा तऱ्हेनें ईश्वरस्मरण करूं?"

मीं म्हटलं, "गीतेचा आठवा अध्याय आतांच वाचला. त्यांत खुद्द भगवाननें म्हटलं आहे,

> "ओम् इत्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन् मामनुस्मरन् ।
> यः प्रयाति त्यजन् देहं स याति परमां गतिम् ।"

अर्थ असाः — अखेरपर्यंत 'ओम्' म्हणत जो देह सोडतो त्याला उत्तम गति प्राप्त होते, म्हणून तूं आतां शेवटपर्यंत "ओम्" "ओम्" चा जप करीत राहा."

गोसाव्यानें हंसून हो म्हटलं. त्याला वाटलं मी वाटेल तितका पापी असलों तरी आतां स्वर्गाचा दरवाजा उघडण्याची किल्ली मला मिळाली खरी.

त्यानें लागलीच "ओम्"चा जप सुरू केला.

नंतर मला कळलं तो अत्यंत शांत चित्तानें आणि धैर्यानें फांसावर चढला. तोंडानें 'ओम्' 'ओम्' चा जप गळ्याभोंवतीं फांस पडून तो आवळला जाईपर्यंत चालला होता.

मनुष्याच्या मनोरचनेंत एवढं कोणतं गूढ नि महान् तत्त्व विधात्यानें ठेवलं आहे कीं मृत्यु नजरेला पडतांच भित्रा मनुष्यहि धैर्यानें अचल उभा राहातो आणि आत्म्याच्या अमरत्वाचं तत्त्व चटकन् आत्मसात करतो? कोणी मानसशास्त्रज्ञच याचा उलगडा सांगूं शकेल.

# उलाढाली मांत्रिक

इ. स. १९४३ सालची गोष्ट. साबरमती तुरुंगांत मी माझ्या खोलींत कसलंस काम करीत बसलों होतों. तितक्यांत जेल ऑफिसमध्यें जाऊन आलेल्या एका कॉंग्रेसबंधूनें खूप कळवळून म्हटलं,

"दादासाहेब, गोध्र्याहून आतांच फांशीचे दोन कैदी आले आहेत, त्यांतला एक तर अगदींच लहान—केवळ सोळा सतरा वर्षांचं कोवळं पोर आहे. इतक्या लहान मुलाला कायदा फांशी देऊं शकतो का?"

बातमी ऐकतांच मला एकदम धक्का बसला. ज्यानें आपल्या जीवनाला अजून सुरवातसुद्धां केली नाहीं, त्याच्या हातून असा तो काय मोठा एवढा गुन्हा घडला आहे? आणि घडला असला तरी त्याला फांशीसारखी अघोर शिक्षा कां?

मीं त्या कॉंग्रेसबंधूला म्हटलं, "काय? म्हणतां काय? सोळा सतरा वर्षांचा किशोर? छे: हें खरं नाहीं वाटत एकदम! कदाचित् दिसायला कोंवळा दिसत असेल, पण वय मोठं असेल. नाहींतर कोणता न्यायाधीश अशी घोर शिक्षा करील?"

मीं असं त्यांना म्हटलं तर खरं पण माझं मन आंतून बेचैन बनलं होतं! फांशीची शिक्षा झालेल्या कैद्यांना भेटण्याची, त्यांची हकीगत जाणण्याची, त्यांचीं अपीलें, दयेचे अर्ज वगैरे लिहिण्याची मला जेलच्या अधिकाऱ्यांनीं परवानगी दिलेली असल्यामुळें रोज सुमारें एक तासभर तरी मी प्रत्येक फांशीकैद्याशीं जाऊन बसत असें, व त्याला धीर देण्याचें, सहानुभूति दाखविण्याचें काम नियमितपणें करीत होतों. म्हणून वरील हकीगत ऐकतांच मी ताबडतोब उठून त्या दोघां फांशी कैद्यांना भेटायला "फांशी खोली"वरच गेलों.

फांशी देण्याच्या जागेसमोरच फांशी जाणाऱ्या कांहीं कैद्यांसाठीं खोल्या बांधलेल्या आहेत, आणि तुरुंगाच्या भाषेंत त्यांना "फांशी खोली" म्हणतात.

या नांवामुळें एकदां खूपच मजेदार घोटाळा झाला होता. तुरुंगांत येणाऱ्या कॉंग्रेस कैद्यांची संख्या जेव्हां फुगूं लागली तेव्हां कित्येकांचा समावेश या " फांशी खोल्यांतून " करण्यांत आला. या खोल्यांत राहाणारे कॉंग्रेस कैदी घरीं पत्रें लिहीत तेव्हां वरती पत्ता " फांशी खोली " असा लिहीत. तो वाचून त्यांची घरची मंडळी फारच चिंताग्रस्त झाली. " म्हणजे ! यांना फांशी देणार ? ही शिक्षा यांना झाली तरी केव्हां ? कळलं कसं नाहीं ? याच्यावर कांहीं अपीलबिपील करायचं कीं नाहीं ? हा सर्व प्रकार आहे तरी काय ? " अशीं पत्रें येऊं लागलीं तेव्हां " फांशी खोली " या साध्या, सुटसुटीत सोयीस्कर शब्दानें बाहेर किती क्षोभ उसळला होता त्याची कल्पना आली.

या दोघा फांशी कैद्यांना दोन वेगवेगळ्या खोल्यांत ठेवण्यांत आलं होतं. असल्या कैद्यांना रोज आंघोळीसाठीं व थोडेसे पाय मोकळे करण्यासाठीं म्हणून अर्धा तास कुलुपांतून बाहेर काढीत. बाकी अष्टौप्रहर कुलुपांत आणि वर चार पोलिसांचा चोवीस तास कडक पहारा! काय नेम? एकादा कदी आत्महत्या करायचा अगर पळून जायचा. कैद्यांना बाहेर काढीत तेव्हां त्यांच्या दोन्ही हातांत भक्कमभक्कम हातकड्या असत. बाह्यात्कारी जरी त्यांना जनावरासारखं वागवीत असत तरीसुद्धां तुरुंगाधिकारी आणि पहारेकरी यांच्यांत माणुसकीची भावना लखलखपणें दिसत होती.

फांशीखोलींत जाऊन मी दोघांनाहि बघितलं. दोघेहि खूप रडत होते. त्यांचीं मनें विकल झालीं होतीं. आजूबाजूच्या त्या भयानक वातावरणांत प्रत्यक्ष मृत्यूच जिथं तिथं त्यांना दिसत असावा अशा झपाटलेल्या अवस्थेंत दोघेहि दिसत होते.

प्रथम मीं त्या मुलाबरोबर बोलण्यास सुरवात केली. खरोखरच तो अवघा १६ वर्षांचा किशोर होता. त्या दुसऱ्या कैद्याबरोबर पण थोडं बोललों, पण त्या मुलाला बघितल्यानंतर माझं मन इतकं विचलित आणि बेचैन बनलं कीं मला जास्त तपशीलवार बोलणें सुचेना. " कांहीं काळजी करूं नका, नशिबांत असेल तसं होईल. तुमच्या केसच्या निवाड्याचे कागद बघितल्या-वर मी तुमच्या वतीनें हायकोर्टांत अपील दाखल करीन. मला आशा वाटते कीं ईशकृपेनें सर्व कांहीं चांगलेंच होईल. " असं आश्वासन देऊन मी

परतलों. परततांना पोलीस पहारेकऱ्यांना विनंति केली कीं " त्या दोघांना आणि विशेषतः त्या मुलाला जें कांहीं . लागेल तें देत चला. तुरुंगाच्या नियमाप्रमाणें जर एकादी वस्तू देण्यासाठीं जेलरच्या अगर सुपरिन्टेंडेंटच्या परवानगीची जरूरी पडली तर मला कळवा, मी योग्य-तें सर्व करीन. "

(२)

फांशीची शिक्षा ज्या न्यायाधिशांनीं दिली त्या पंचमहालच्या सेशन जजांच्या निकालाची नक्कल दोन दिवसांनंतर मला मिळाली. हा निकाल मी चांगला लक्षपूर्वक बारकाईनें दोनदां वाचून काढला. त्यांत लिहिल्याप्रमाणें केसची हकीकत खालीलप्रमाणें होती: —

" वीरा ( हें त्या किशोरचं नांव ), त्याचा बाप शंकर आणि त्याच्या घरीं काम करणारा नोकर माधा ( हें त्या दुसऱ्या फांशी कैद्याचं नांव ) या तिघांनीं एक कट रचून शंकरच्या, कचरा नांवाच्या चुलत भावाच्या तीन मुलांना विष घातलं. त्यांपैकीं पांच वर्षांचं आणि तीन वर्षांचं अशीं दोन मुलें मेलीं. मोठं सात वर्षांचं मूल होतं तें वांचलं. या दोन बालकांच्या खुनाचा आरोप त्यांच्यावर होता. शंकर आणि त्याचा चुलत भाऊ कचरा यांचा बारा वर्षांमागें समाईक वडिलार्जित इस्टेटीच्या वांटणीचे प्रकरणीं तंटा झाला होता आणि तें वैर लक्षांत ठेवून, शंकर आणि वीरा या बापलेकांनीं, माधाच्या मदतीनें विष घातलं अशी पोलीस केसची हकीगत होती. हें विष साखरेंतून दिलं होतं आणि साखरेच्या तीन पुड्या तीन मुलांना दिल्याचं वीरानें कबूल केलं होतं. पण त्याचं म्हणणं असं होतं कीं, " माधानें तीन पुड्या माझ्याकडे देऊन, मला सांगितलं कीं हा देवीचा प्रसाद मुलांसाठीं आणला आहे तो त्यांना नेऊन दे. मीं तो नेऊन दिला. पुड्यांतून काय होतं तें मला माहीत नव्हतं. "

माधाचं म्हणणं असं कीं " मला यांतलं कांहीं माहीत नाहीं. भावा-भावांचा तंटा, त्यांनीं आपआपसांत कांहीं केलं असेल, त्याची जबाबदारी त्यांच्यावर. मी केवळ एक नोकर. मला त्यांच्या तंट्यांत पडण्याचं कारण काय ? मला कांहींच माहीत नाहीं. "

पोलिसांनीं केलेल्या तपासांत त्यांना असें आढळून आलें होतें कीं, खून होण्याआधीं थोडे दिवस माधा गोध्र्याला गेला होता आणि तिथल्या एका व्होऱ्याच्या दुकानांतून त्यानं विष आणलं होतं.* त्यामुळें हें तर निश्चित कीं "मला कांहीं माहीत नाहीं" हें त्याचं कथन सपशेल खोटं होतं. पण मागाहून माधानें सांगितलें कीं "तें विष मी माझ्या मालकांच्या (शंकरच्या) सांगण्यावरून आणलं होतं. पण त्याचा त्यांनीं काय उपयोग केला हें मला माहीत नाहीं. प्रसादाच्या म्हणून पुड्या मीं दिल्या असें जें वीरा सांगतो तें धादांत खोटं आहे. पुड्या त्यानेंच दिल्या. त्या पुड्या वीराजवळ कुठून आल्या मला माहीत नाहीं."

बारा वर्षांपूर्वीं झालेल्या इस्टेटीसंबंधींच्या तंट्यामुळें वैर उपस्थित झालें असें मानून कोर्टानें ठरवलं कीं "या वैरामुळें हा खून झाला."

पण विषप्रयोगाचे बाबतींत शंकरला माहिती होती अगर शंकरकडून वीराला पुड्या मिळाल्या याविषयीं पुरावा नसल्याकारणानें कोर्टानें शंकरला निर्दोषी ठरवून सोडून दिलें; आणि वीरा व माधा यांच्यावर खुनाचा आरोप शाबीत धरून दोघांना फांशीची शिक्षा ठोठावली.

## (३)

आतां या फांशीच्या शिक्षेविरुद्ध हायकोर्टांत कोणत्या मुद्यावर अपील करतां येईल हें ठरविण्यासाठीं सेशन कोर्टाच्या निकालावर मीं खूप विचार केला. वीराचं कोवळं वय लक्षांत घेतां, त्याला फांशी होणार नाहींच, अशी मला तरी खात्री होती; परंतु निकालाची नक्कल वाचतां माझ्या लक्षांत आलं कीं, खुनाचा जो हेतू पोलिसांतर्फे दाखविण्यांत आला होता तो पुरेसा नव्हता.

* आणलेल्या विषाचें नांव गुजरातींत "उंदरखार" असें आहे. शेतांत उंदीर फार होऊन पिकांची नासाडी करतात, त्यांस मारण्यासाठीं सामान्य सोमल विकण्याचे सरकार परवाने देते. व त्यामुळें कोणी, केव्हां, किती सोमल घेतलें त्याची व्यापाऱ्याला नोंद ठेवावी लागते. त्या नोंदीवरून माध्यानें "उंदरखार" घेतल्याचें पोलिसांना समजलें होतें.

बारा वर्षांमागें झालेला तंटा—आणि ज्याची आतां आठवणहि बुझत आली होती अशा—तंट्यामुळें एकदम कोणी खून करायला प्रवृत्त होईल आणि तोहि ज्याच्याशीं तंटा झाला त्याचा खून न करतां कोंवळया अर्भकांचा खून करील! ही गोष्ट मला मुळांतच पटत नव्हती. आणि म्हणूनच मला वाटत होतं कीं अपीलांत लिहायला चांगलेच मुद्दे आहेत. पण वीरानें पुड्या देण्याचं कबूल केल्यामुळें तो निर्दोष सुटेल हें मात्र शक्य वाटत नव्हतं. ही झाली कायदेशीर अपीलाची गोष्ट.

वीराचं म्हणणं मी खरं मानीत होतों. आणि त्यामुळें हा खून खरोखरच कोणत्या कारणासाठीं झाला तें मूळ कारण जाणून घेण्याची मला खूप इच्छा होती. सत्य हकीकत संपूर्ण जाणण्याची मला जरी इच्छा असली तरी तशी हकीकत एकदम कशी मिळणार? आणि अपील तर सात दिवसांच्या आंत रवाना व्हायला हवं होतं. म्हणून मिळालेल्या हकीगती-वरून अपीलाचा मसुदा तयार केला. त्यांत मुख्य मुद्दा हा होता कीं जुन्या तंट्यामुळें वैर हें जें खुनाचं कारण दाखविण्यांत आलं आहे तें संतोषकारक नाहीं व म्हणूनच बालकें मेलीं तरीसुद्धां खुनाचा आरोप शाबीत होऊं शकत नाहीं. वीरानें पुड्या दिल्या ही गोष्ट मान्य केली तरीसुद्धां फार फार तर त्याला निष्काळजीपणाचे वर्तनासाठीं गुन्हेगार ठरवतां येईल. शेवटीं मीं जजसाहेबांना विनंति केली होती कीं "ज्यावेळीं केस चालेल त्यावेळीं आम्हाला प्रत्यक्ष तिथं बोलाविण्यांत यावें. वीराचं किशोर वय व आमचीं तोंडें बघूनच आपणाला दिसून येईल कीं खून करूं अशीं आम्ही माणसें नाहींत."

या मागणीमागचा माझा उद्देश हाच होता कीं किशोर वीराला बघतांच, गुन्हा असो नसो, पण फांशीची शिक्षा हायकोर्ट नक्कीच कमी करील. माधाचं जें व्हायचं असेल तें होईल.

अपील रवाना केल्यावर मग मी खुनाचं खरं कारण शोधून काढण्याच्या मार्गाला लागलों. केसचे कागदावरून त्याविषयीं कांहींहि समजूं शकलों नव्हतों व समजूं शकेन असेंहि नव्हतें. खरी हकीकत माधा किंवा वीरा यांच्याकडूनच काढावयाची होती. माझ्या नित्यक्रमाप्रमाणें मी या दोघांकडे

रोज तास दीडतास जात असें. पण वीरा मला कांहीं फार सांगूं शकला नाहीं. तो एकच गोष्ट काकुळतीला येऊन पुन्हां पुन्हां सांगे.

" या माध्यानें माझ्याजवळ देवीचा प्रसाद म्हणून तीन पुड्या आणून दिल्या आणि मुलांना त्या द्यायला सांगितलें. मला काय माहीत ? मीं त्या दिल्या. याशिवाय मला खरोखरच कांहीं माहीत नाहीं. "

माझ्या मनाचा गोंधळ वाढला. आतां फक्त माधाच कांहीं प्रकाश पाडूं शकला तर खरी हकीकत कळणार. मनांतून मला असंच वाटत होतं कीं हा खून माध्यानेंच करवला आहे यांत शंकाच नाहीं. पण प्रश्न असा उभा राही कीं त्या मुलांचा खून करण्याचं माध्याला कारण काय ? तो कशासाठीं खून करील ? मुलांशीं त्याचं कसलं आलं आहे वैर ? डोक्यांत विचारचक्र जोरांत सुरू झालं. विचार आला कीं कदाचित् मुलांच्या बापाशीं माधाचं कांहीं वैर असावं आणि त्याचा सूड घेण्यासाठीं मुलांना त्यानें ठार केलं असावं. अनुमानाचा धागा क्षीण तर खराच, पण त्याच धाग्याच्या आधारानें मी पुढें सरकलों.

माध्याला गोडगोड बोलून खूप समजावलं. " आतां फांसावर लटकायचं आहेच ना ? मी तुझा कांहीं शत्रू अगर सरकारी मनुष्य नाहीं. उलट तुझा मित्रच आहें आणि तुला बचावण्याचा मी प्रयत्न करतों आहें. मला तूं सत्य हकीकत नाहीं का सांगणार ? "

शेवटीं दोन तीन दिवसांनीं त्याला कुठं सुबुद्धि झाली. पण केव्हां ? मीं कंटाळून आणि थोड्याशा रागानें म्हटलं,

" तूं खरं सांगत नाहींस. आतां तुझ्याकडे येण्याचं मी बंद करणार आहें. एक पापी माणूस म्हणून फांसावर लटकून नरकांतच जाण्याच्या लायकीचा तूं आहेस. मरणार हें नक्की असूनसुद्धां अजून तुला खरं बोलण्यची बुद्धि होत नाहीं, अशा पापी माणसाकडे येऊन मी तरी माझा वेळ कां फुकट घालवावा ? घटकाभर समज कीं हायकोर्टानें तुला निर्दोष सोडलं, तरीसुद्धां माझी अशीच खात्री आहे कीं कचऱ्याशीं तुझं कांहींतरी वैर असल्यामुळें हे खून तूंच केले आहेस. तूं कबूल कर अगर करूं नकोस. ईश्वराजवळ तुझ्या कृत्याची हकीकत रुजूं झालीच आहे. "

हा माझा बाण मात्र बरोबर वर्मी लागला. माध्याला एकदम रडूं कोसळलं. त्यानें माझी माफी मागितली. मी त्याचा त्याग न करतां रोज त्याला भेटायला जावं म्हणून पुन्हां पुन्हां तो आर्जवूं लागला आणि मग त्यानें खरी हकीकत सांगण्यास सुरवात केली.

(४)

माधा गांवांत मांत्रिकाचा धंदा करीत असे. मंत्रतंत्र, थोडंसं चेटुक वगैरे करून त्यावर थोडेबहुत पैसे मिळवीत असे. यांत त्याला मिळकत चांगली होत असे. कचरा (त्याचे मालकाचा भाऊ) अगदीं नांवाप्रमाणें खरोखरच गांवचा कचराच होता. पुष्कळांना तो सतावीत असे. अति दुष्ट होता. त्यामुळें त्याच्या त्रासांतून सुटण्यासाठीं गांवांतल्या पुष्कळ भोळ्या लोकांनीं माध्याला पैसे देऊन त्याच्याकडून वेळोवेळीं कचऱ्याला जादुटोणा करविला होता. पण त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं, तें पाहून पैसे देणारे लोक नाराज झाले. आणि म्हणूं लागले,

"हें काय माधाभाई! आपण मोटा जादुटोणा करतों म्हणतां, पण आम्हांला हें सर्व तुमचं ढोंगच दिसत आहे. कारण एवढा जादुटोणा करूनहि कचऱ्यावर कांहींच परिणाम होत नाहीं. तुम्ही लोकांना फसवून त्यांच्याकडून पैसे लुबाडतां असं दिसतं."

हें बोलणं माध्याच्या मनाला लागलं, आणि शिवाय त्याला धास्ती वाटली कीं या अशा विरोधी लोकमतामुळें आपला मांत्रिकाचा धंदा बसेल. म्हणून त्यानें त्या लोकांना म्हटलं,

"धीर धरा नि पहा. आतां या कचऱ्यावर मी वेगळ्याच प्रकारचं चेटुक करतों. आणि जर तो सरळ नाहीं वागला तर थोड्याच दिवसांत त्याच्यावर देवीचा कोप होईल हें तुम्ही प्रत्यक्ष डोळ्यांनीं बघाल."

मग हा "देवीचा कोप" कसा घडवावा याचा माधा विचार करूं लागला; आणि त्यानें बेत नक्की केला कीं कचऱ्याचीं मुलें मरतील असं कांहींतरी करायला हवं; म्हणजे देवीचा कोप त्याच्यावर झाला आहे हें स्पष्टच होईल. म्हणून गोध्र्याच्या बाजारांत जाऊन त्यानें विष खरेदी

केलं; आणि निर्दोष वीराच्या हातीं देवीचा प्रसाद म्हणून साखरेच्या पुड्यांतून तें विष दिलं.

आतां बरोबर दुवा सांपडला आणि खुनाचा खरा हेतु समजला. कोर्टांत जें सत्यशोधन झालं तें अगदीं उलट्याच प्रकारें झालें हें आतां स्पष्ट होतं. त्याबरोबरच माणसें जें वर्तन करतात त्यामागें किती विचित्र, खोल, अकल्पनीय हेतु भरलेले असतात याची या प्रकरणावरून चांगलीच कल्पना येते.

ही हकीकत ऐकल्यावर सत्य श्रवणाचं समाधान माझ्या मनाला मिळालं आणि माझी उत्कंठाहि तृप्त झाली. शिवाय माध्याविषयींची माझी भावना बदलली. तो खरं बोलला म्हणून मी त्याला क्षमा करायला तयार झालों. माझं हृदय क्षमेनं भरून गेलं!

(५)

रात्रीं सुमारे साडेसातची वेळ. सबंध तुरुंग बंद झाला, कैद्यांच्या सर्व कोठड्यांना आणि वार्डांना कुलुपें लावलीं गेलीं, अशा वेळीं मी राहात होतों त्या वार्डाचं दार खडखडलं. जेलरकडून निरोप घेऊन एक वॉर्डर आला होता. त्यानें म्हटलं :

"साहेब, अगदीं जरूरीचं काम आहे, जेलरसाहेबांनीं आपणाला ऑफिसांत बोलावलं आहे."

मी विचारांत पडलों कीं आतां यावेळीं कसलं एवढं मोटं जरुरीचं काम निघालं? काय असेल बरं? माझी या तुरुंगांतून दुसऱ्या तुरुंगांत बदली होणार असती तर जेलरनीं इथंच येऊन मला तसं सांगितलं असतं, कीं "साहेब, बाडबिछाना आवरा हं. आपणाला जायचं आहे." मग ऑफिसांत कशाला बोलावलं?

पण फार वेळ संभ्रमांत राहावं लागलं नाहीं. ऑफिसांत पाऊल टाकतांच तिथें माधा आणि वीरा दोघेहि हातापायांत बेड्या अडकविलेल्या स्थितींत बसलेले दृष्टीस पडले. मीं मला बोलावण्याचं कारण समजलों. जेलरसाहेबांनीं म्हटलं,

" दादासाहेब, इतक्यांतच हायकोर्टाकडून तार आली आहे. या लोकांचं अपील उद्यां मुंबई हायकोर्टांत सुनावणीला निघणार आहे, तेव्हां या दोघांना तिथं हजर करण्याचं आम्हांला फर्मान आलं आहे. या लोकांना पोलीस पहाऱ्यांत आतांच पाठवणार आहोंत. पण जाण्यापूर्वी आपणाला भेटण्याची या लोकांची इच्छा होती म्हणून आपणाला तसदी द्यावी लागली."

मला साहजिकच आनंद झाला. एकदम मनांत विचार चमकला तो हा कीं अपीलांत केलेल्या विनंतीनुसार कैद्यांना हायकोर्टांत प्रत्यक्ष हजर राहाण्याचा हुकूम मिळाला आहे तेव्हां आतां वीरा तर फांशींतून नक्की मुक्त होणार. जाण्यापूर्वी या लोकांना भेटण्याची आणि त्यांना चार शब्द सांगण्याची संधि मिळाली म्हणूनहि समाधान वाटलं. ते दोघे मोठ्या प्रेमानें माझ्या पायां पडले. तेव्हां मीं म्हटलं,

" बघा हं. लक्षांत ठेवा. तुम्हांला जजसाहेबांनीं कांहीं विचारलं तर कांहीं लांबण न लावतां एवढंच सांगा कीं, " साहेब, आमच्या अर्जात जें आम्हीं लिहिलं आहे त्यापेक्षां जास्त आम्हांला कांहीं सांगायचं नाहीं. आपण जो न्याय द्याल तो खरा. आमच्यावर कृपादृष्टि ठेवा एवढीच आमची विनंति."

याप्रमाणें सुचवण्याचं कारण इतकंच कीं तिथं ह्या दोघांनीं एकमेकांवर कांहीं आरोप करून केस बिघडवून टाकूं नये.

या गोष्टीला चारपांच दिवस होऊन गेले. एक दिवस संध्याकाळीं सुमारें सहा वाजतां जेलरसाहेबांनीं माझ्या खोलींत येऊन म्हटलं;

" दादासाहेब, आपणाला तसदी देण्याचा माझा बिलकूल विचार नव्हता. पण तो दुष्ट माधा, तो आज सकाळपासून तुरुंगाच्या दारांत येऊन बसला आहे आणि आपलं दर्शन हवं म्हणून हट्ट धरून बसला आहे. मीं त्याला झिडकारून पाहिलं. " तुझ्यासारख्या पाप्याला दर्शन कशाला?" असें म्हटलें. अशा नालायक माणसासाठीं आपणाला तसदी देण्याचं जिवावर येतं आहे, पण काय करूं? तो तिथंच अगदीं चिकटून बसला आहे नि म्हणतो, " दादासाहेबांचं दर्शन होईपर्यंत इथंच बसणार आहें." सकाळपासून ११ तास झाले! तिथं बसून आहे. तेव्हां मीं

विचार केला कीं आपणाला थोडी तसदी देऊन ही कटकट दरवाजांतून काढून टाकावी. तेव्हां आपण जरा याल तर बरें होईल."

मीं हंसून म्हटलं, "यांत मला तसदी पडेल असं आपण कां मानतां ? त्या बिचाऱ्याला ११ तास बसवून ठेवलंत, चांगलीच कसोटी केलीत त्याची." असं म्हणून मी जेलरबरोबर ऑफिसांत गेलों.

जेलरनीं माधाला ऑफिसच्या खिडकींत बोलावून सांगितलं, "हं, घे हे दादासाहेब आले. काय सांगायचं आहे तुला ?"

त्यानें म्हटलं, "असं इथं दूर खिडकीबाहेर उभं राहून मला कांऽहीं सांगायचं नाहीं. जें कांहीं सांगायचं आहे तें आंत येऊन सांगणार आहें, असं बाहेरून नाहीं सांगणार."

जेलरनें त्याला झिडकारलं. तेव्हां मीं म्हटलं, "आतां येऊं दे त्याला दोन मिनिटें आंत. बिचारा ११ तास बसला तेव्हां पाहूं या तर खरं त्याला काय सांगायचं आहे तें."

माधा आंत आला. मी खुर्चीवर बसलों होतों. दरवाजांतून आंत पाऊल टाकतांच, धांवत येऊन त्यानें माझ्या पायांवर डोकं ठेवलं आणि पाय धरून बसला. मी पुष्कळ नाहीं म्हटलं पण ऐकतो कोण ? दोनचार मिनिटें पायावर डोकं होतंच. डोळ्यांतून अश्रूधारा चालल्या होत्या. शब्दांनीं नाहीं पण अश्रूंनीं तो माझ्याशीं बोलत होता. पहिला भावनावेग ओसरल्यावर मीं त्याला हकीकत विचारली तेव्हां त्यानें म्हटलं,

"मला निर्दोष ठरवून सोडून दिलं आहे आणि वीराला तीन वर्षांची कैद झाली. पण त्याचं लहान वय लक्षांत घेऊन त्याला धारवाडला मुलांच्या तुरुंगांत पाठवून दिलं आहे. मुंबईहून मी सरळ इथं सकाळीं आलों आणि आपला आशीर्वाद घेण्यासाठीं इथं बसून राहिलों होतों."

अनेक हृदयस्पर्शी प्रसंगांतला हा एक प्रसंग होता. माध्याची भावना कळकळीची आणि प्रबळ होती हें निःसंशय! पण त्याला मी काय आशीर्वाद देणार ? थोडा उपदेश केला कीं,

" ईश्वरानें तुला वांचवला आहे. एका रीतीनें तुझा पुनर्जन्म झाला आहे असंच समज. आणि आतां यापुढें लबाडी न करतां सर्वांबरोबर प्रामाणिकपणें अन् प्रेमळपणें वागलास तर, तुला वांचविण्यास मी निमित्तमात्र झालों या विचारानें मला धन्यता वाटेल. नवें आयुष्य चांगल्या तऱ्हेनें घालविण्याची ईश्वर तुला सुबुद्धि देवो."

माधा हर्षभरित मनानें गेला. मी माझ्या खोलींत परतलों. ती रात्र मीं अत्यंत सुखकर विचारांत घालवली.

# मोती झेणा

" टर्र्र्र्न् — टर्र्र्र्न् ... टर्र्र्न् ...

मीं म्हटलं, " कोण आहे तिकडे ? कुणाचा फोन आला आहे बघा बघूं जरा."

**चपराशीः**–साब, बडोदासे ट्रंक् कॉल आया है.

मीं लगेच उठलों आणि जाऊन टेलिफोन घेतला.

" हॅलो ... कोण बोलतं आहे ? "

" मी, छोटाभाई सुतरिआंचा मुलगा. त्यांच्या सूचनेप्रमाणें हा फोन करीत आहें."

" काय काम आहे ? "

" मोतीच्या सुटकेचा हुकूम आजच इथं तुरुंगांत आला आहे. आपण त्याला घ्यायला तुरुंगाच्या दरवाजावर याल असं कळवलं होतंत, तर आपण केव्हां याल ? ज्या दिवशीं याल त्या दिवशीं त्याला इथून सोडतील."

" आतां चारच दिवसांपूर्वी मी बडोद्याहून इथं आलों आहें, आणि इथं खूप काम आहे, तिथं यायला वेळ काढूं म्हटलं तरी मिळणार नाहीं. माझ्या वतीनें तुम्हीच तुरुंगाच्या दाराशीं हजर राहून त्याला सांगा कीं " दादासाहेब आतांच बडोद्याला येऊन तुला भेटून गेले ना ? यावेळीं तुला घ्यायला आले असते पण त्यांना खूप काम असल्यामुळें येतां आलं नाहीं." आणि त्याला विचारा, " पैशाची जरूरी आहे का ? " बिचारा पंचवीस वर्षांनंतर घरीं जाणार आहे तेव्हां साहजिक त्याला पैशांची गरज पडणार. तेव्हां माझ्या वतीनें त्याला शंभर रुपयांपर्यंत तो म्हणेल ती रक्कम द्या. मी बडोद्याच्या श्री. महाजनांच्या तिथून रक्कम आपणांस देण्याची व्यवस्था करतों."

श्री. सुतरिया " हं. आणि सोडल्यानंतर त्याचं तिकीट कुठचं काढून द्यायचं ? त्याला अहमदाबादला पाठवूं का ? "

" छे: छे: ! पंचवीस वर्षांनीं सुटतोय तेव्हां सुटल्याबरोबर पहिल्यांदा त्याला घरीं जाऊन आपल्या बायकोमुलांना त्याला भेटूं दे. इथं अहमदाबादला येण्याची कांहीं घाई नाहीं. घरीं चारसहा दिवस राहून सर्वांना भेटून मग इथं येऊं दे. सध्यां मी इथंच आहें. "

मोतीची सुटका झाल्याचं ऐकून मला खूप आनंद झाला. कारण जीवनाच्या अंतापर्यंत ज्याला सुटकेची आशा नव्हती तो सुटला आणि आनंदाची गोष्ट म्हणजे पंचवीस वर्षांच्या या दीर्घ काळानंतरहि त्याचा एकुलता एक मुलगा आणि बायको त्याचं स्वागत करायला हयात राहिलीं. त्यांना तो भेटूं शकेल या गोष्टीचें मला मोठेंच समाधान होतें.

माझी समजूत होती कीं मोती स्वतांच्या घरीं मेहमदाबाद जवळच्या वणसोल गांवीं जाईल आणि तिथून पांचसहा दिवसांनीं अमदाबादेस येईल.

पण दुसरे दिवशीं सकाळीं ११॥ चा ठोका पडला. तितक्यांत शिपाई आंत येऊन सांगूं लागला,

" साहेब, बाहेर कुणी माणूस आला आहे तो म्हणतो कीं आतांच मी तुरुंगांतून सुटून आलों. "

" आंत येऊं दे त्याला. "

मोती असेल ही मला कल्पनाच नव्हती. अहमदाबाद जेल्मधून मी सुटल्यानंतर तिथले अनेक कैदी सुटकेनंतर मला भेटायला येत, त्यांपैकीं कुणी असेल असंच मला वाटलं होतं.

मोतीला आंत येतांना बघतांच मला खूप आश्चर्य वाटलं. मीं म्हटलं, " मोती ! अरे, यावेळीं तूं इथं कसा ? इतक्यांत तूं घरीं गेलास तरी केव्हां नि घरच्या मंडळींना भेटून इतक्या लौकर इथं आलास तरी कसा ? "

" दादासाहेब, मी अजून घरीं गेलोंच नाहीं. "

" वा रे वा ! भल्या माणसा, इथं यायची कांहीं घाई होती का ? अरे, अनेक वर्षांत,—चांगलीं दोन तपें होऊन गेलीं–बायकोमुलांची भेट नाहीं. ती मंडळी साहजिक तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसली असतील. तिकडे वणसोलला जायचं सोडून इथं कां आलास ? "

" मी कां आलों ? आपलं दर्शन घेतल्याशिवाय, सुटकेनंतर आपणांला भेटल्याशिवाय दुसऱ्या कुठच्याहि ठिकाणीं मी जाऊंच कसा ? "

" ठीक. पण तूं वणसोलला जाऊन बायकोमुलांना भेटून आला असतास तर मला अधिक आनंद झाला असता. बरं, आतां आलाच आहेस तर राहा आणि जेवून मग संध्याकाळच्या गाडीनें वणसोलला जा. "

इ. स. ४२ ते ४४ च्या दरम्यान मी तुरुंगांत होतों, त्यावेळीं माझ्या मातोश्री, पत्नी आणि मुलें मला भेटायला येत; त्यामुळें ही सर्व मंडळी मोतीला चांगली ओळखीत असत. मोती जणूं आमच्याच कुटुंबांतला एक आहे असा आनंद त्याच्या आगमनानें आमच्या घरांत सर्वांना झाला होता.

संध्याकाळीं गाडीची वेळ झाली; तेव्हां मीं मोतीला म्हटलं, " आटप, आतां तुला निघालं पाहिजे. गाडीची वेळ होत आली. "

" एवढी काय मोठी घाई आहे ? "

" वा ! म्हणजे ! गाडी चुकेल ना तुझी ? "

" चुकली तर चुकली; त्यांत काय ? "

" गाडी चुकली तर आज तूं वणसोलला कसा पोहोंचशील ? "

" नाहीं पोंचलों तर काय हरकत आहे ? "

" वा रे वाः ! अरे पंचवीस वर्षे तूं बाहेर राहिलास–बायको व मुलगा यांजपासोन दूर राहिलास ! घरची मंडळी पण तुला भेटायला आतुर असतील ना ? "

मोती सुटला त्या दिवशीं स्थानिक वर्तमानपत्रांत त्याच्या सुटकेची बातमी आली होती कीं, " मावळंकरांनीं एका प्रख्यात दरोडेखोराची दीर्घ मुदतीच्या शिक्षेतून सुटका केली आहे. "

त्यामुळें मला असं वाटत होतं कीं मोतीच्या सुटकेची वार्ता खेडा जिल्ह्यांत पसरली आहेच तेव्हां त्याच्या नातलगांच्या कानीं जाणारच, आणि ती मंडळी याला भेटायला उत्सुक असणार, त्यामुळें मी त्याला जाण्याची घाई करीत होतों.

माझा प्रश्न ऐकून हंसून त्यानें अगदीं थंडपणें म्हटलं, " दादासाहेब, इतकीं पंचवीस वर्षे गेलीं त्यांत आणखी चार आठ दिवस जास्त गेले

म्हणून असा काय मोठा हाहाकार उडणार आहे? वणसोलला आतांच जाण्याचा माझा बिल्कुल विचार नाहीं. मला तर सध्यां तुमच्याजवळच राहायचं आहे."

त्याचे हे उद्गार ऐकून मी खरोखरच दिङ्मूढ बनलों. त्याला जाण्याचा अधिक आग्रह करूं शकलों नाहीं. याप्रमाणें आठ दहा दिवस उलटून गेले.

एक दिवस दुपारीं जेवणानंतर मी विश्रांति घेत पडलों होतों, तितक्यांत बाहेर ओट्यावर मोती कुणाबरोबर तरी बोलत असल्याचा आवाज माझ्या कानीं पडला. मीं बाहेर डोकावून बघितलं, तर एक *बारैया तरुण त्याच्याशीं बोलत उभा होता. मी विचारलं, "मोती, हा कोण रे?"

मोतीनें म्हटलं, "हा माझा मुलगा मला घरीं घेऊन जायला आला आहे."

त्याच्या मुलाला बघून मला मोठा आनंद वाटला. मीं मोतीला म्हटलं, "मोती, आतां मात्र मी तुझं कांहीं ऐकणार नाहीं." आणि मुलाला म्हटलं, "तुझ्या वडिलांना घेऊन घरीं जा. आणि तुझ्या आईची भेट करव." वाटखर्चासाठीं कांहीं रक्कम, सद्रे व मुंडाश्यासाठीं आमच्याकडे शिल्की असलेल्या कापडापैकीं कापड याप्रमाणें त्याला दिलें व मोती व त्याचा मुलगा यांची बोळवण केली.

मोतीचा मुलगा अचानक इथं माझ्याकडे कसा आला याचं मला जरा नवल वाटलं. मीं त्याला विचारलं तेव्हां त्यानें म्हटलं,

"साहेब, सुटका झाल्याचं आम्हांला प्रथम कांहींच कळलं नव्हतं, पण आमचा एक गांववाला बाहेरगांवीं गेला होता त्यानें वर्तमानपत्रांत सुटकेची बातमी वाचली आणि त्याचेकडून गांवांत बातमी आली. आम्ही सर्वच मोतीभाईच्या येण्याची वाट बघत बसलों होतों. पण ते आले नाहींत तेव्हां आम्हांस काळजी वाटूं लागली आणि सुटकेची बातमी खोटी कीं खरी अशी शंका वाटली म्हणून मी उठलों तों तडक बडोद्याला गेलों. तिथं

* एका जातीचें हें नांव आहे. महाराष्ट्रांतील कुणबी जातीप्रमाणें ही आहे. निर्वाहाचें मुख्य साधन मजूरी व कांहीं अंशीं शेती.

तुरुंगांत जाऊन चौकशी केली. तिथल्या लोकांनीं म्हटलं, " मोती सुटला त्याला आठ दिवस होऊन गेले. पण तो कुठं गेला तें मात्र आम्हांला माहीत नाहीं. इथं त्याला भेटायला नेहमीं अहमदाबादचे मावळंकरदादा येत असत, आणि त्याच्या सुटकेची त्यांना आगाऊच खबर देण्यांत आली होती. आम्हांला वाटतं कीं तो अहमदाबादलाच मावळंकरदादांना भेटायला गेला असेल. तिथं जाऊन तुम्ही चौकशी करा." म्हणून मी येथें आलों."

तब्बल पंचवीस वर्षांनंतर पितापुत्राची भेट ! दोन वर्षांचा बालक आज सत्तावीस वर्षांचा तरुण होऊन पित्याला भेटला. खरोखरच तें दृश्य अत्यंत रोमांचकारी होतं. एक जिवंत अभिजात काव्य होतं !

( २ )

खेडा जिल्हा आणि गायकवाडी हद्द ( बडोदें राज्य ) या दोन्ही भागांत अनेक लूट, दरोडे घालण्याबद्दल मोतीला इ. स. १९२२ सालीं पकडण्यांत आलं होतं. आणि डिसेंबर १९२२ मध्यें वेगवेगळया गुन्ह्यांसाठीं एकत्रित मिळून त्याला एकंदर ४० वर्षांची शिक्षा ब्रिटिश हद्दींतल्या अधिकाऱ्यांनीं केली होती.

गायकवाडी राज्यानें आणखी ११ वर्षांची शिक्षा केली होती. मिळून एकावन वर्षांची शिक्षा इ. स. १९२२ सालच्या अखेरीस त्याला भोगावयाची होती ! तेव्हां सर्व शिक्षा भोगून, या जन्मांत तरी तुरुंगांतून तो जिवंत बाहेर येणं शक्य नव्हतं. कारण इ. स. १९२२ मध्यें त्याचं वय होतं ३२ वर्षांचं. आणि शिक्षा ५१ वर्षांची म्हणजे शिक्षा पूर्ण होईपर्यंत त्याचं वय सुमारें ७५–८० चे घरांत जाणार !

तुरुंगांतल्या वास्तव्यांत मोती एखाद्या सत्याग्रहीप्रमाणें राहिला होता. चोरी, खोटं बोलणं अगर कुठच्याहि प्रकारची लबाडी त्यानें केली नव्हती. तो मोठ्या निर्धारानें म्हणत असे, " सरकारनें अन्यायानें शिक्षा करून मला तुरुंगांत डांबलं आहे. ज्यांच्यामुळें मी दरोडेखोर झालों ते लोक मोठ्या प्रतिष्ठितपणें उजळ माथ्यानें समाजांत मिरवताहेत. आणि मला

एकाद्या डाकू कैद्याप्रमाणें तुरुंगांत कोंबलं आहे! या अन्यायाविरुद्ध तो झगडत असे. आणि म्हणून त्यानें निश्चय करून टाकला होता कीं, तुरुंगांत राहिलों तरी कोणत्याहि कामाला हात लावायचा नाहीं. चक्की पिसणें, नवार विणणें, अगर दुसरं कुठचंहि काम करण्याचें त्यानें अनेक वर्षेपर्यंत साफ नाकारलं होतं, आणि या हुकुमभंगासाठीं दंडाबेडी, हातकडी, जाड्या गोणपटाचे कपडे वापरणें, एकांतवास, मीठाशिवायचं जेवण इत्यादि अनेक कठोर शिक्षांचा अविरत वर्षाव त्यानें अविचलपणें सहन केला होता. त्याला शिक्षा होई. ती तो भोगी आणि भोगून पुरी होतांच त्याला विचारण्यांत येई, "कां? आतां तरी काम करशील ना?"

निश्चयपूर्ण आवाजांत तो ठांसून उद्गार काढी "साफ करणार नाहीं."

दहाबारा वर्षांच्या या क्रमानंतर कामाच्या बाबतींत अधिकाऱ्यांनीं त्याच्यापुढें अगदीं हात टेकले परंतु त्याच्या सद्वर्तनावर नजर देऊन एकाद्या सामान्य कैद्याप्रमाणें न वागवतां त्याला मुकादम बनविले.

मोती जेव्हां इ. स. १९२२ मध्यें दरोडे घालीत फिरत होता तेव्हां एक वेळ श्री. रविशंकर महाराजांना तो भेटला होता. इ. स. १९४२ सालीं "चले जाव" च्या सामुदायिक लढ्याचे वेळीं जेव्हां आम्हांला तुरुंगांत पाठविण्यांत आलं तेव्हां मोती तिथं तुरुंगांतच होता आणि त्यानें त्या गोष्टीची श्री. रविशंकर महाराजांना आठवण दिली. महाराजांना त्याच्याबद्दल सहानुभूति होती त्यामुळें त्यांनीं मला सांगितलं कीं, "मोतीला दीर्घ मुदतीच्या शिक्षेतून मुक्त करण्याचा प्रयत्न शक्य असेल तर करा." मीं त्याच्या केसचीं सर्व कागदपत्रें तपासलीं, पण त्यावेळीं त्याला सोडवण्यासाठीं कशा रीतीनें केस मांडावी हें माझ्या डोक्यांत आलं नाहीं!

दोन चार महिन्यांनंतर मोतीला माझ्या तैनातींत ठेवण्यांत आलं, त्यामुळें त्याच्याशीं माझा गाढ परिचय झाला. सुमारें एक वर्ष तो माझ्याजवळ होता. या काळांत त्याच्या अनेक गुणांचं मला अगदीं जवळून दर्शन घडलं. माणूस अप्रसिद्ध, म्हणून वाटलं तर त्याला क्षुल्लक सामान्य माणूस म्हणावं, पण त्याचे अनेक गुण बघितले तर तो एक श्रेष्ठ पुरुष होता यांत शंका नाहीं. आपल्या भारतांत असे लाखो लोक—भारतीय संस्कृतीचीं हीं प्रतीकें—

ठिकठिकाणीं आहेत. आणि ह्या अशा क्षुल्लक समजल्या जाणाऱ्या, उपेक्षिलेल्या लोकांमुळें आपली भारतीय संस्कृति कायम टिकून राहिली आहे, व आपण एक प्रजा म्हणून टिकून राहिलों आहों, असं म्हटलं तर अतिशयोक्तीचं होईल असं मला वाटत नाहीं.

स्वतांच्या सुटकेची मोतीला कधींच आशा नव्हती, पण श्री. रविशंकर महाराजांच्या इच्छेमुळें आणि त्याच्या सहवासांत आल्यानंतर त्याच्या अंगच्या श्रेष्ठत्वामुळें, त्याच्या सुटकेविषयीं मला रात्रंदिवस तळमळ लागली आणि मी त्याच्या सुटकेचा मार्ग शोधूं लागलों. सर्व बाजूंनीं विचार करतां एक कल्पना सुचली कीं त्याच्या प्रकृतीकडे पाहतां दहाबारा वर्षांपेक्षां जास्त काळ त्याचं शरीर टिकावं धरूं शकणार नाहीं, आणि इथली शिक्षा भोगून नंतर बडोद्याच्या तुरुंगांत अकरा वर्षे काढायचीं आहेत हें लक्षांत घेऊन, निदान जीवनाच्या संध्यासमयीं तरी त्याला घरीं जायला मिळावं अशा प्रकारची सरकारला विनंति केली तर परिणाम कांहीं आशादायक होईल असं मला वाटलं.

मोतीनें अनेक दरोडे घातले होते, एक खून पण केला होता, तरीसुद्धां तो स्वभावानें गुन्हेगार वृत्तीचा नव्हता. शांत जीवन जगणाऱ्या एका सुशील नागरिकासारखीच त्याच्या स्वभावाची घडण होती. आणि त्यामुळेंच त्याला मुक्त करण्यांत सरकारला कोणताच धोका नव्हता. मी त्याच्या सुटकेच्या अर्जासाठीं हे मुद्दे मनांत नक्की केले आणि मग आवश्यक ते पुरावे गोळा करूं लागलों, जेलच्या डॉक्टराचा पुरावा प्रथम हवा होता. मी डॉक्टरांना हकीकत सांगून माझा दृष्टिकोन समजावून सांगितला आणि या केसच्या बाबतींत सहृदय अंतःकरणानें विचार करण्यास सांगितलें. डॉक्टरसाहेबांनीं मोतीची शारीरिक तपासणी केली आणि असा अभिप्राय दिला कीं मोतीचं वय आणि त्याची सध्यांची प्रकृति लक्षांत घेतां त्याची आयुर्मर्यादा बारा चौदा वर्षांपेक्षां लांबूं शकेल असं वाटत नाहीं आणि त्यामुळें त्याला सोडून द्यायला कांहीं हरकत दिसत नाहीं.

चला, सुटकेच्या मार्गांतला एक मोठा पर्वत ओलांडला. नंतर मी ता. १८-११-४३ रोजीं त्याच्या सुटकेसाठीं मुंबई सरकारला अर्ज केला. याच

सुमारास जेल खात्याचे इन्स्पेक्टर जनरल अहमदाबादचा तुरुंग पहाण्यास आले होते, ती संधिहि मी साधून घेतली.

( ३ )

सुटकेच्या अर्जांत मीं काय काय लिहिलं होतं? पहिला मुद्दा तर हा होता कीं मोती स्वेच्छेनें दरोडेखोर बनला नव्हता. एकाद्या प्रामाणिक, सुशील नागरिकाप्रमाणेंच तो आपली वृद्ध माता, तरुण पत्नी आणि लहान बालक यांच्यासह राहात होता, शेती आणि मजुरी करून त्यांचा निर्वाह करीत होता. मध्यंतरीं एक दुर्दैवी घटना घडली, तीमुळें त्याचा कांहींहि दोष नसतां त्याच्या बाबतींत एक सामाजिक अन्याय झाला व त्याचं सुखी जीवन धुळीला मिळालं. त्याला न्याय देण्याची गोष्ट कुणीहि काढीना. उलट गांवांतल्या लब्धप्रतिष्ठित लोकांनीं त्याच्याशीं लुच्चेगिरी व विश्वासघात केला तेव्हां स्वतांच न्याय मिळवण्यासाठीं त्यानें अन्याय करणाऱ्यापैकीं एकाचा खून केला. कायद्याच्या भाषेंत सांगायचं झालं तर त्या माणसाला मोतीनें मृत्यूची शिक्षा दिली! मोती जर सरकारी अधिकारावर असता तर त्यानें केलेल्या या शिक्षेला लोकांनीं खून म्हटला नसता. पण हा बिचारा एक सामान्य क्षुल्लक माणूस म्हणूनच अन्याय करणारे लोक समाजांत प्रतिष्ठितपणें मिरवीत होते आणि मोती खुनी समजला गेला!

खून केल्यानंतर पोलिसांच्या पंजांतून सुटण्यासाठीं तो घरांतून निसटला आणि जवळजवळ आठ महिने गांवाच्या आसपास लपून छपून फिरत होता. त्याला आणि त्याच्या कुटुंबाला ना खायलाप्यायला, नाहीं कपडालत्ता, नाहीं मानसिक शांति अशी स्थिति झाली! यांतून सुटण्यासाठीं तो दरोडे-खोरांच्या टोळींत सामील झाला. तिथं त्याला एक प्रकारचं रक्षण मिळालं. खाण्यापिण्याचा प्रश्न सुटला. शिवाय अन्यायी समाजाशीं सक्रिय विरोध करण्याची संधि मिळाली. श्रीमंतांना आणि जुलमखोरांना लुटायचं आणि गरीबांना मदत करायची या प्रकारचं नवीन जीवन सुरू झालं.

अर्जांत मी विशेषतः खालील मुद्यांवर भर दिला होता—अर्जदाराच्या केसचा सहानुभुतिपूर्वक विचार करायला हवा. शांतिमय जीवन

जगणाराला सरकारी अधिकाऱ्यांनीं अगर समाजांतल्या प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या लोकांनीं जो अन्याय करून त्याचं जीवन मातींत कालवलं त्या अन्यायाचा प्रतिकार केल्याबद्दल त्याला सूड वृत्तीनें शिक्षेला पात्र मानतां कामा नये. मूळ घटनेवर दृष्टि ठेवूनच एकंदर गोष्टींचा विचार केला पाहिजे. हा माझ्या अर्जाचा मुख्य मुद्दा.

मीं माझ्याकडून सर्व प्रयत्न केले आहेत असं समाधान मानून ईश्वरावर भरंवसा ठेवून बसलों. माझा बाण अगदींच फुकट जाणार नाहीं अशी मला आशा तर होतीच.

एक दिवस सकाळीं; ता. ३ फेब्रुवारी १९४४ रोजीं, तुरुंगाच्या कचेरींतून निरोप आला कीं "मोतीला बडोद्याच्या तुरुंगांत पाठवणार आहेत आणि इथं त्याची शिल्लक राहिलेली सर्व शिक्षा त्याला माफ करण्यांत आली आहे." किती आनंदाची वार्ता! माझा हर्ष माझ्या हृदयांत मावेना.

मोतीला, बडोदा सरकारची अकरा वर्षांची शिक्षा भोगण्यासाठीं पोलीस पहाऱ्यांत ता. ५-२-१९४४ रोजीं बडोद्याला पाठविण्यांत आलें.

(४)

त्यानंतर ता. १०-३-१९४४ रोजीं, साबरमती तुरुंगांतून माझी पण अगदीं अचानक आणि अनपेक्षित सुटका झाली. त्यावेळीं तिथल्या कैद्यांनीं माझ्यावर प्रेमाचा जो अति वर्षाव केला, तो प्रसंग मोठा अविस्मरणीय आहे.

अकरा वर्षांची मुदत एकंदर शिक्षेच्या मानानें अल्प काळाची होती. आणि पांच सात वर्षांतच बडोद्याच्या तुरुंगांतून मोती सुटूं शकेल असा पूर्ण संभव होता. तरीसुद्धां त्याच्या वाढत्या वयोमानाकडे बघतां हा पांच वर्षांचा अल्पकाळसुद्धां मला मोठ्या दीर्घ मुदतीचा वाटला आणि बडोद्याच्या तुरुंगांतून त्याला कसा सोडवावा हा माझ्या विचारांना एक मोठा विषयच होऊन बसला.

मला अधूनमधून कामानिमित्त बडोद्याला जावें लागत असे.* मी मनाशीं निर्धार केला कीं त्याची सुटका व्हायची असेल तेव्हां होईल पण जेव्हां जेव्हां बडोद्याला जाणं होईल त्या त्या वेळीं तुरुंगांत जाऊन मोतीला भेटायचंच आणि त्याची विचारपूस करून त्याला आश्वासन देण्याचं काम करायचंच, आणि एवढं काम तर माझ्या हातून होण्यासारखं होतं. मला सांगायला आनंद वाटतो कीं माझा हा निश्चय मी संपूर्णपणें कृतींत उतरवूं शकलों. मोतीसारख्या एका सामान्य कैद्याला माझ्यासारखी व्यक्ति भेटायला येते, या गोष्टीची तुरुंगाधिकाऱ्यांवर वेगळीच छाप पडली. चांगलाच इष्ट परिणाम घडून आला. त्यामुळें मोतीविषयीं ते सहानुभूति आणि मान दर्शवूं लागले.

बडोद्याला असणारे माझे मित्र श्री. छोटालाल सुतरिआ ¶ यांच्याकरवीं मीं मोतीच्या सुटकेचे प्रयत्न सुरू केले. सुदैवानें, कांहीं कालावधीनंतर गायकवाड सरकारनें प्रजामंडळबरोबर समेट करून राज्यकारभारनियंत्रणांत "लोकज्ञ प्रधान" म्हणून श्री. छोटुभाई सुतरिआ यांना घेतलं; आणि त्यामुळें माझ्या प्रयत्नांना एकप्रकारची गति मिळाली. त्यावेळीं बडोदा राज्यांत अशी प्रथा होती कीं कुणाहि कैद्याची ताबडतोब सुटका करायची झाली तर श्रीमंत महाराजांची तशी खास आज्ञा मिळाली पाहिजे.

आतां ही खास आज्ञा मिळवायची कशी? कारण दिवाणसाहेब अगर महाराजसाहेब—दोहोंपैकीं कुणाशींहि माझा परिचय नव्हता. पण परमेश्वरच माझ्या मदतीला धांवून आला. जानेवारी १९४६ मध्यें मी "मध्यस्थ

---

* माझी आई बडोद्याची—त्यामुळें माझा जन्महि बडोद्यासच झाला होता. माझ्या आजोळची बरीच आप्तेष्ट मंडळी तेथें होती व आहेत. लहानपणचाहि कित्येक काळ आई माहेरास येई तेव्हां व पुढें मी मोठा झाल्यावरहि बडोद्यास गेलेला. तेव्हां आप्तेष्टांस भेटण्यासाटींहि मी मधून मधून एकदोन दिवस बडोद्यास जात असतों.

¶ हे तेथील प्रसिद्ध वकील. बडोदें राज्य प्रजामंडळाचे अध्यक्ष. माझी व त्यांची बऱ्याच वर्षांची ओळख. त्यावेळीं ते बडोदें मंत्रिमंडळांत लोकप्रतिनिधि म्हणून होते.

विधिमंडळा''च्या ( Central Assembly ) अध्यक्षस्थानीं निवडून आलों. आणि आतां या हुद्याच्या प्रतिष्ठेमुळें माझ्या शब्दांना मान मिळेल अशी शक्यता उत्पन्न झाली. म्हणूनच श्री. सुतरियांच्या सूचनेनुसार दिवाणसाहेब सर बी. एल्. मितर यांना, त्यांची प्रत्यक्ष ओळख नव्हती तरीसुद्धां, एक खाजगी पत्र लिहून मोतीची सुटका करावी अशी विनंति केली. त्यांनीं ती मान्य करून लगेच श्रीमंत प्रतापसिंहरावांना विलायतेला तार करून तारेनेंच मंजुरी मिळवली. मोतीच्या सुटकेचा हुकुम सुटला.

( ५ )

मोती माझ्याकडे येऊन मग स्वतःच्या घरीं गेला; आणि तेव्हांपासून शेती आणि मजुरी करून तो आपलं जीवन शांतपणें व्यतीत करीत आहे. त्याला थोडी पैशाची मदत करून कांहीं जमीन मिळवून दिली आहे. अधूनमधून मोती माझ्याकडे येतो आणि कांहीं काम असलं तर राहातो पण खरा. " तू राहा " असं त्याला सांगावंच लागत नाहीं. माझ्या ज्येष्ठ पुत्राच्या विवाहाचं आमंत्रण मीं त्याला पाठवलं तेव्हां तो लग्नाच्या आधीं आठ दिवस आमच्या घरीं आला. त्याला मीं म्हटलं,

" अरे मोती, लग्नाची तारीख विसरलास असं दिसतं. लग्नाला अजून आठ दिवस अवकाश आहे. "

मोतीनें म्हटलें, " तारीख मी विसरलों नाहीं. पण लग्नाच्या घटकेला येऊन उभा राह्यला मी काय पाहुणा आहें? कामाला माझे हात कां लागूं नयेत? मुद्दाम कामासाठीं लवकर आलों. "

मोतीच्या शेतांत वाल पिकले अगर भाजीपाला तयार झाला कीं त्या वस्तू तो घेऊन आलाच. एक दिवस मीं त्याला हंसत हंसत म्हटलं,

" भल्या गृहस्था, तूं हें सगळं आणतोस तें ठीक. पण वस्तु नेण्या आणण्याबाबतींत सध्यां इतके सरकारी कायदे झाले आहेत कीं तुझ्या हातून कायदा मोडला जात असेल, आणि मग वाल नि भाजीपाला घेणें हा एक गुन्हा होऊं शकेल. तेव्हां आतां तूं या वस्तू आणण्याच्या भानगडींत पडूं

नये. नकळत हातून घडणाऱ्या कायदेभंगापासून मी नि तूं दूर राहावं हें चांगलं. "

मोतीनें हंसून म्हटलं, " साहेब, असल्या कायद्यांची मी नाहीं पर्वा करीत. वाटेल तें झालं तरी मी वस्तु आणणारच आणि तुम्हांला त्या घ्याव्याच लागणार. "

खरंच ! किती प्रेमळ हृदय ! ! *

—*—

* मोती झेणाच्या पूर्वजीवनाची कथा स्व. श्री. झवेरचंद मेघाणी यांनीं लिहिलेल्या " माणसाईना दीवा. " ( मानवतेचे दीप ) या पुस्तकांत आहे.

# उदार-चित्त बापू

" काय बापू ? कसं काय ? तुला कांहीं विशेष बोलायचं आहे असें वाटतें ? काय आहे, सांग पाहूं. "

" दादासाहेब, काय सांगूं ? गेले ७–८ महिने माझ्या पायांत सारखी दंडाबेडी आहे. तिनें मी जेरीस आलें आहें ! कसेंहि करून ही दंडाबेडी निघून जाईल असें करा. "

त्याचा तो दुःखी आणि हताश झालेला चेहरा पाहून व काकुळतीची विनंति ऐकून मला साहजिकच कळवळा आला; व याविषयीं चौकशीं करण्याचें मनांत योजून मीं म्हटलें, " बापू, अरे इतके दिवस तुझी दंडाबेडी चालू ठेवण्याइतके जेलरसाहेब निष्ठुर खास नाहींत. मला माहीत आहे कीं त्यांचें हृदय कोमल आहे; पण तूं त्यांना विनंति केली होतीस का ? "

बापू–" हो, एकदां नाहीं, अनेकदां सांगितलें. "

मी–" मग ? "

बापू–" ते ऐकतच नाहींत. मीं विनंति केली कीं ते हंसतात व कानाडोळा करून पुढें जातात. "

मी–" हें विचित्र दिसतें. ते असें कां करतात ? त्यांना कांहींतरी कारण असलें पाहिजे. तुझीच कांहींतरी चूक असली पाहिजे. तूं कांहींतरी वेडेंवाकडें करीत असशील. नाहींतर ते दंडाबेडी सतत चालू ठेवणार नाहींत."

बापू– " खरोखर माझा कांहींहि दोष नाहीं. "

मी– " बरें तर. मी त्यांना विचारून पाहीन; व जें कांहीं शक्य असेल तें करण्याचा प्रयत्न करीन. "

असें त्यास सांगून मी पुढें गेलों.

दररोज सकाळीं स्नान, थोडासा स्वाध्याय व १ तास समूह कांतणाचें काम आटोपून मी जेलमध्यें सामान्य कैद्यांची विचारपूस करण्यासाठीं जेलचे

दवाखान्यांत, त्यांच्या निरनिराळ्या कोठड्यांकडे नियमित फेरी करीत असे. कैद्यांच्या अडचणी, गरजा वगैरेंची विचारपूस करून त्यांची दाद लावणें हा माझा जेलमधील एक मुख्य व्यवसायच झाला होता. अशा एका दैनिक दौऱ्यांत जेलच्या सामान्य वस्तीपासून दूर अशा स्वतंत्र कोठड्यांचे बाजूला कैद्यांस भेटत, विचारपूस करीत जात असतां बंद कोठडीच्या जाळीशीं, पायांत दंडाबेडी असलेला बापू उभा होता. दोन्ही हातांत जाळीचे गज त्यानें धरले होते; व कांहींतरी बोलावयास उत्सुक अशा मुद्रेनें व आविर्भावानें तो माझेकडे पहात होता. त्यावेळीं त्याचें व माझें वरप्रमाणें बोलणें झालें.

बायकोस मारहाण केल्याचे गुन्ह्यावरून सुमारें २ वर्षांची शिक्षा बापूस झाली होती व तो मधून मधून बेफाम दांडगाई व कैद्यांस मारहाण करीत असे म्हणून त्याला सामान्य कैद्यांपासून वेगळा व दूर असलेल्या कोठड्यांपैकीं एका कोठडींत एकटाच ठेवला होता. सामान्यतः त्या कोठडीचें जाळीचें दार नेहमीं बंद ठेवून बाहेरून त्याला कुलूप असे. जे कैदी शिस्तीनें राहात नाहींत, ज्यांच्यांत एकाएकीं मारहाण करण्याची वृत्ति दिसते-थोडासा वेडेपणाचाच अंश ज्यांच्यांत असतो-त्यांना इतर कैद्यांचे सरक्षिततेचे दृष्टीनें वेगळें ठेवण्यांत येत असे, त्याप्रमाणें बापूसहि ठेवलें होतें.

बापू प्रेमळ अंतःकरणाचा, अत्यंत भावनाप्रधान व अत एव क्रोधी, रागीट होता. तशांत स्त्रीलंपटपणाची भर पडलेली ! आपल्या इच्छेस येईल त्याप्रमाणें व त्यावेळीं स्त्री अनुकूल नसली कीं जवळ नसली तर त्याचें डोकें भडकून जाऊन तो वेडाच्या लहरींत येई. शिवीगाळ, मारहाण करी. पण डोकें शांत झाल्यावर त्याला पश्चात्तापहि होई. आपल्या स्त्रीवरची त्याची आसक्ति, केवळ विषयासक्ति नव्हती. त्याला तिचेविषयीं नितांत प्रेमहि होतें. पण प्रेमाचें किंवा संतापाचें वेड यांत परिणामाचे दृष्टीनें काय फरक ? वेड तें वेडच ! अशाच एका वेडांत बायकोस भलतीच मारहाण करून बसला. त्याला तुरुंगाचें शारीरिक दुःख नसे. पण बायकोची आठवण, तिचेवरील आसक्ति व विरह यामुळें तो कावराबावरा होत असे व त्याला आवरशक्ति राहात नसे.

त्या दिवशीं बापूस भेटल्यावर जेलरची व माझी नेहमींप्रमाणें भेट झाली. त्यावेळीं मी त्यांचेकडे बापूच्या दंडाबेडीविषयीं चौकशी केली. जोसेफ या नांवाचे हे जेलर खरोखरच फार कनवाळू होते. मीं त्यांना विचारलें, "जोसेफ, त्या बिचाऱ्या बापूला ६–६ महिने दंडाबेडी दिली आहे ही किती निष्ठुर गोष्ट ! असें कां करतां ? तसें तुम्ही मुद्दाम करणारे गृहस्थ नाहीं अशी माझी खात्री आहे. तेव्हां याप्रमाणें त्याला वेगळा व दंडाबेडींत ठेवण्याचें काय खास कारण आहे ? तेव्हां श्री. जोसेफ यांनीं सांगितलें कीं तो मनुष्य सरळ, भोळा पण भलताच रागीट आहे. याच त्याच्या स्वभावामुळें त्याचा मनावर ताबा न राहून त्यानें बायकोस झोडपलें व शिक्षा घेऊन येथें आला. पण मजा अशी कीं त्याचें बायकोवर प्रेम आहे व मधून मधून तिचेविषयींचे विचार त्याच डोक भडकवतें ! व मन कह्यांत न राहून तो मारहाण करावयास लागतो. मी त्याला सहानुभूतीनें ठिकाणावर आणण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण माझा प्रयत्न सफळ झाला नाहीं ! तेव्हां त्याला इतरांपासून दूर ठेवून दंडाबेडीचा प्रयोग केला. त्यानें तो थोडासा वरमला. पण दंडाबेडी काढतांच त्याला २।४ दिवसांतच पुन्हा वारें आलें ! पुन्हा मीं दंडाबेडी घातली, तेव्हां कांहीं दिवस तो स्वस्थ होता. दंडाबेडी काढलीं कीं तो लगेच मारहाण करावयाला लागतो. याप्रमाणें ३–४ वेळां झालेवर पुन्हां दंडाबेडी काढण्याचा मोह मी सोडून दिला.

मी– "नाहीं. नाहीं. आपण याप्रमाणें अगदींच निराश होऊन चालावयाचें नाहीं. त्याची कींव केली पाहिजे. पुन्हां एकदां दंडाबेडी काढण्याचा प्रयत्न करण्यास तुम्हांस कांहीं खास विशेष अडचण वाटते का ?

जेलर– "मला कांहींच अडचण नाहीं. तुमची तशीच इच्छा असल्यास मी ती उद्यांच काढून टाकतों; पण त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. पुन्हां ती घालावीच लागणार. तेव्हां त्याचा विचार करून काय तें सांगा. तुम्ही सांगाल त्याप्रमाणें करण्यास मी तयार आहें."

हें ऐकल्यावर मी स्वाभाविकपणेंच बुचकळ्यांत पडलों. आतां बेडी काढण्याची ही जबाबदारी मीं घेतल्यावर जर बापूनें कांहीं आततायी कृत्य केलें तर त्या कृत्याची व पुन्हां त्याला बेडी घालण्याची याप्रमाणें दुहेरी

जबाबदारी माझेवरच येणार, या विचारानें "किं कर्म किमकर्मेति" असा मी "मोहित" झालों. बराच विचार केला. व शेवटीं रात्रीं माझे कोठडींत अंथरुणावर पडल्या पडल्या एक युक्ति सुचली. त्याप्रमाणें करण्याचें ठरविल्यावर मनास शांति वाटली. थोडासा आनंदहि वाटला कीं बापू उद्यां दंडाबेडींतून मुक्त होणार. आनंदाची भरती येऊं लागणारी त्याची कष्टी मुद्रा डोळयांपुढें उभी राहिली.

दुसरे दिवशीं सकाळीं मी बापूला भेटावयास गेलों व त्याला विचारलें, "बापू, खरोखरीच का तूं दंडाबेडीस कंटाळला आहेस? ती काढावीच असें तुला वाटतें ना?"

**बापू**–"म्हणजे? मला तसें वाटत नाहीं अशी तुम्हांला शंका तरी कशी येते? खरोखरीच मी जर्जर झालों आहें! कसेंहि करा. कांहींहि करा. पण मला या बेडींतून सोडवा."

**मी**–"अवश्य सोडवतों. पण एका अटीवर. जर ती तुला मान्य असली तर तसें सांग. म्हणजे मी आतांच जेलर साहेबांना बोलावून आणतों व याच क्षणीं या बेडीचे मगरमिठींतून तूं सुटशील." बापूस आनंदाचें भरतें आलें. तो म्हणाला, "सांगा सांगा, काय तुमची अट आहे ती मला सांगा. मला कबूल. जें म्हणाल तें कबूल. पण मला ही बेडी नको; असह्य झाली आहे ती!"

**मी**–"ऐक तर. मी काल तुझी इच्छा जेलरसाहेबांचे कानांवर टाकून त्यांना विनंति केली कीं ह्या बापूची बेडी कांहीं दिवस तरी काढा. त्यांनीं सांगितलें कीं पूर्वी ४–५ वेळां तुझी बेडी काढून तुला संधि दिली; पण तुझें डोकें ठिकाणावर राहात नाहीं व तूं परत परत आततायीपणा करतोस, मारहाण करतोस, तेव्हां तुझी बेडी काढण्यास ते आतां नाखुष आहेत. तुझेबद्दल त्यांना हमी पाहिजे आहे. पण ती कोण देणार? जेलरसाहेब म्हणाले कीं तूं मनापासून कितीहि वचन दिलेंस तरीहि तुझें डोकें मधून मधून एकदम भडकतें व तुला शुद्ध रहात नाहीं. वेडाच्या भरांत तूं वाटेल तें करतोस. तेव्हां तुझा जामीन कोण? बोला, तुम्ही जामीन होता का?

तेव्हां मी जेलरसाहेबांस सांगितलें कीं मी त्याचा जामीन होण्यास तयार आहे. पण बापू पुन्हां गडबड करणार नाहीं अशी जामीनकी मला कशी देतां येणार ? मी निराळ्या प्रकारची जामीनकी देतों." जेलरनीं विचारलें, "कोणत्या प्रकारची जामीनकी देणार ?" तेव्हां मीं सांगितलें कीं बापूनें गडबड केली तर बापूच्या ऐवजीं ती दंडाबेडी जेलरसाहेबांनीं मला घालावी व बापू शांत झाला म्हणजे मग माझ्या पायांतून काढावी."

हें ऐकतांच बापू एकदम गंभीर व भयभीत झाला. क्षणभरच तो स्तब्ध झाला. मी त्याचे चेहऱ्यावरील भाव पहात होतों. त्याच्या पापाचें प्रायश्चित्त मला भोगावें लागणार ! या कल्पनेनेंच तो विरघळला व दोन्ही हात जोडून मला म्हणाला, "नको. नको. दादासाहेब, तुम्ही असली जामिनकी देऊं नका. माझें डोकें व मन कधीं कधीं ठिकाणीं नसतात ! व मी काय करतों तें माझें मला कळत नाहीं ! रागाच्या भरांत कांहींतरी होऊन जातें. माझ्या चुकीचे परिणाम तुम्हांला भोगावे लागतील ही कल्पनाच मला भयंकर वाटते. त्या कल्पनेच्या मानानें ही दंडाबेडी आतां फार हलकी वाटते. तुम्ही अशी जामीनकी देण्याचे भानगडींत पडूं नका. जेलर बेडी काढण्यास आले तरीसुद्धां त्यांना मी ती काढूं देणार नाहीं."

भोळेपणा व प्रेमळपणा यांचें कमालीचें हें दर्शन पाहून कोणास गहिंवर येणार नाहीं ? मीं त्याला सांगितलें कीं मीं निश्चय केला आहे कीं मी जामीन राहाणार. तो निश्चय तुझें सांगण्यानें फिरविणार नाहीं. पण तुझे पायांतील बेडी माझे पायांत न पडण्याचा उपाय तुझेच हातांत आहे. ज्या प्रेमळपणानें माझेविषयीं तुला इतकें वाटतें तोच प्रेमळपणा तुला तुझें मन कह्यांत ठेवण्यास मदत करील. तेव्हां ही अट सदैव लक्षांत ठेवण्याचा तूं प्रयत्न केलास म्हणजे पुरे !"

नंतर लगेच श्री. जोसेफ यांस बोलावून आणून त्यांचेकडोन बापूची बेडी काढविली. बापू मुक्त झाल्याचा आनंद त्याला तर झालाच पण मलाहि एकप्रकारची धन्यता वाटली, समाधान वाटलें. बापू म्हणजे एक सामान्य, अशिक्षित समजला जाणारा माणूस ! परंतु आपलें दुःख दूर होण्यासाठीं-

सुद्धां दुसऱ्यास दुःख होऊं नये अशी काळजी वाहणारा ! याला अशिक्षित कसें म्हणावें ?

यानंतर मी जेलमध्यें होतों तोंपर्यंत बापूनें केव्हांहि कोणतीहि गडबड केली नाहीं व त्याचे पायांतील बेडी जेलरचे ऑफिसांत राहिली ! त्याचा व दंडाबेडीचा योग आला नाहीं व मी सुटल्यावर तो थोड्याच काळांत सुटला.

# धोरणी व धाडसी

# लाखाजी

" साहेब, कायद्यानें आम्हांला डाकू ठरवून लांब मुदतीच्या शिक्षा केल्या असल्या, तरीसुद्धां आम्ही एकंदरीनें तुरुंगाबाहेर सभ्यपणें मिरवणाऱ्या, शिष्ट व सुशिक्षित गणल्या जाणाऱ्या अनेक व्यक्तींपेक्षां जास्त चांगले आहोंत. कांहीं परिस्थितीमुळें व कित्येक वेळीं अनावर भावना किंवा रागाच्या झपाट्यांत आमच्या हातून कांहीं गोष्टी झाल्या. त्याचें प्रायश्चित्त म्हणून आम्ही येथें आहोंत. तुरुंगांत कैदी आहोंत म्हणूनच आम्हांला " नीच " " घाण " लेखूं नका. झिडकारूं नका. "

सुमारें २४ वर्षें कैदेंत असलेला लाखाजी नांवाचा एक काठेवाडांतून शिक्षा होऊन आलेला कैदी बोलतां बोलतां याप्रमाणें मला म्हणाला. कॉंग्रेसचा स्वराज्याचा लढा व तुरुंगवास हा विषय होता. लाखाजीचें चरित्र ऐकतां ऐकतां ओघानेंच हा मुद्दा निघाला होता. तुरुंगांत अनेक प्रकारच्या कैद्यांशीं माझा परिचय जसजसा वाढूं लागला तसतशी माझीहि स्वाभाविक इच्छा प्रबळ होऊं लागली कीं निरनिराळ्या प्रकारचे गुन्हे करणाऱ्या कैद्यांची व विशेषतः दीर्घकाल जे कैदेंत आहेत त्यांच्या हकीकती ऐकाव्यात; कोणत्या कारणानें ते गुन्ह्यास प्रवृत्त झाले, जेलमध्यें त्यांना काय अनुभव आले, त्यांच्या सामान्य वृत्ती कशा प्रकारच्या होत्या व आहेत वगैरे गोष्टी जाणाव्या. त्यामुळें अशा कैद्यांना मी त्यांची हकीकत विचारत असे. अशा कैद्यांपैकीं लाखाजी हा एक होता.

साधारण उंचीचा, सुदृढ बांध्याचा, काळ्या वर्णाचा पण अतिशय पाणीदार डोळ्यांचा व सुंदर तऱ्हेनें दोन्ही बाजूस वळवून विंचरलेली दाढी असलेला हा एक " मियाणा " जातीचा (मुसलमान धर्माचा) कैदी होता. " मियाणे " लोक शूर, धाडसी, वाटेल तें करण्यास न कचरणारे पण त्या-बरोबर अंतःकरणाचे उदार व कोमल असे आहेत. गोरगरिबांच्या मदतीस

धावून जाणें, संकटग्रस्तास मदत करणें, वगैरे प्रकारची क्षात्रप्रवृत्ति त्यांच्यांत अजूनसुद्धां दिसून येते.

लाखाजीबरोबर हिंदुस्थानच्या चालू परिस्थितीविषयीं बोलणें चाललें होतें. गूढ राजकारण त्याला काय समजणार? पण सामान्य बुद्धीचा व चाणाक्ष असा तो होता. स्वराज्याच्या लढ्यांत जी मंडळी तुरुंगांत येत त्यांना सामान्य कैदी "भाषणिया" या नांवानें ओळखत असत. अगदीं पूर्वींपासून (लोकमान्य टिळकांचे वेळेपासून) बहुतेक राजकीय कैदी राजद्रोही भाषणें किंवा लेखा-मुळें तुरुंगांत येत असत. तेव्हां राजकीय कदी आला रे आला कीं, तो भाषण किंवा लेखामुळें आला असला पाहिजे अशी सामान्य कैद्यांची समजूत असे; व म्हणून ते त्यांस "भाषणिया" म्हणत व या "भाषणिया" विषयीं त्यांचे मनांत आदरहि असे. राजकीय हेतूचे खून, दरवडे वगैरे प्रकार मागाहून घडावयास लागले व सविनय कायदेभंग हा तर त्याचेहि मागून आला. तरी पण सरसहा राजकीय कैद्यांना "भाषणिया" याच नांवानें ओळखीत.

पण लाखाजीचे बोलण्यांत थोडा व्यंगार्थहि होता. वरीलप्रमाणें मला बजावण्यांत त्याचा मुद्दा हा होता कीं १९४२ त आमच्याबरोबर आलेले 'भाषणिया' लोक ज्या कोटीचे असावयास पाहिजेत तसे नव्हते; व म्हणूनच त्याचें म्हणणें होतें कीं खून दरवडे करणाऱ्यांचें मूल्यांकन समग्र दृष्टीनें केलें पाहिजे. केवळ एखादा गुन्हा त्यानें केल्यामुळेंच त्याला कमी लेखणें बरोबर नाहीं.

या मुद्यावर लाखाजी पुढें म्हणाला, "साहेब, आतांपावेतों चार वेळ कॉंग्रेस जेलमध्यें आलेली मीं पाहिली आहे. पहिल्यांदा १९२१–२२ मध्यें, दुसऱ्यांदा १९३० ते ३४ मध्यें, तिसऱ्यांदा १९४०–४१ मध्यें व आतां ही चौथ्यांदा १९४२ पासून. पण जसजसा काळ जात गेला तसतशी कॉंग्रेसवाल्यांची कळा उतरत जात आहे! सचाई, त्याग, सेवाभाव, देशप्रेम धडाडी वगैरे सद्गुण ज्या प्रमाणांत १९२०-२१ मध्यें व त्यानंतर १९३०-३१ मध्यें पाहिले ते आतां फारच थोड्या लोकांत दिसतात."

त्याचा भर सचाईवर, चारित्र्यावर, सेवाभावावर होता हें उघड आहे.

" अशा प्रकारच्या सैनिकांचे बळावर स्वराज्य कसें स्थिरावणार ? " हा त्याचा खोंचक, सूचक व विचार करण्यासारखा प्रश्न होता. राजकीय कैदी जेव्हां या दीर्घमुदतीच्या कैद्यांकडे ते चोर, दरोडेखोर आहेत असें समजून बेपर्वाईनें व किंचित् तिरस्कारानें पहात तेव्हां लाखाजीस त्यांचा राग येत असे व तो कांहीं अंशीं न्याय्यहि होता, असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. असो.

१९३०–३२ पावेतोंच्या कांहीं राजकीय कैद्यांची लाखाजी मुक्त कंठानें वाखाणणी करीत असे. साबरमती तुरुंगांत परमानंद नांवाचे पंजाबकडील गृहस्थ २५ वर्षे होते. त्यांचेबद्दल त्यास अत्यंत आदर असे. त्याप्रमाणें म० गांधी, सरदार पटेल वगैरे पुढारी मंडळीबद्दल अत्यंत आदर असे. तो कित्येक वेळां मला म्हणे, " दादासाहेब, कॉंग्रेसची थोर पुढारी मंडळी किंवा तुमच्यासारखा एकादा कॉंग्रेसवाला सांगेल तें करण्यास, माझे प्राणहि देण्यास आम्ही तयार होऊं. परंतु इतर बाजारबुणग्या मंडळींचें पुढारीपण स्वीकारण्यास आम्ही केव्हांहि तयार नाहीं. "

हें त्याचें मत व टीका आमचे यार्डांत सायंकाळचे प्रार्थनेनंतर मीं मित्रांस सांगितली व म्हटलें कीं " आपण अंतर्मुख होऊन या अभिप्रायाचा विचार केला पाहिजे. " परंतु दुर्दैव कीं अंतर्मुख होण्याऐवजीं बऱ्याचशा मंडळीचा माझेवर राग मात्र झाला. ' लाखाजीसारखा एक नालायक, चोर, डाकू सांगतो काय व तें तुम्ही ऐकतां काय ? ' असें माझ्या कांहीं मित्रांचें म्हणणें. कांहींना असेंहि वाटलें कीं अशा प्रकारचें बोलणें ऐकून घेण्यांतच मीं कॉंग्रेसचा द्रोह केला ! अर्थात् मला असें कधींच वाटलें नाहीं. लाखाजीचें मत बरोबर कीं चुकीचें हा प्रश्न अलाहिदा. पण त्याचें मत असें कां झालें याचा विचार करणें आवश्यक आहे असें मला वाटलें. निरनिराळ्या समयीं व निरनिराळ्या परिस्थितींत त्याचा कॉंग्रेस कैद्याशीं संपर्क आला, व त्यामुळें तुलनात्मक दृष्टीनें त्याला जें वाटलें तें तो सांगत होता. तें ऐकणें केवळ सौजन्यासाठींच नव्हे तर आमचे हितासाठींहि आवश्यक होतें असें माझें आजहि ठाम मत आहे.

परंतु त्याचे बोलण्यांत थोडासा रोषहि होता. त्याचा स्वाभिमान (Self-respect) डिवचला जात होता. आपल्यापेक्षां गुणांनीं पुष्कळच कमी प्रतीच्या असणाऱ्या लोकांनीं स्वतःस शिष्ट समजून इतरांस हलकें लेखावें ही गोष्ट त्यास असह्य वाटत होती.

लाखाजीनें आपल्या जीवनांतील अनेक गोष्टी सांगितल्या. दुर्दैवानें त्या सर्व टांचून घेण्याइतका वेळ मला रहात नसे. व या हकीकती अभ्यासाचे दृष्टीनें टांचण्यास कांहीं तरुण मित्रांना मीं वारंवार केलेली विनंति फळास आली नाहीं !

. लाखाजीच्या डाकू जीवनांतील एकच गोष्ट अशा मंडळींच्या अनेकविध गुणांची कांहीं कल्पना देण्यास पुरेशी आहे. त्याबरोबरच असेंहि वाटतें कीं अशा गुणांचा उपयोग राष्ट्रकारणासाठीं करण्याऐवजीं या मंडळींना तुरुंगांत डांबून ठेवलें जातें ही किती शोचनीय गोष्ट आहे ? त्या काळीं तर परकीय सरकार होतें, पण आतां आपल्या स्वराज्यांत तरी गुन्हे व गुन्हेगार यांचेविषयीं निराळ्या तऱ्हेनें विचार करण्यांत येईल अशी आशा आपण बाळगूं.

(२)

लाखाजी बोलण्याचे ओघांत म्हणाला, "काय सांगूं दादासाहेब, त्या दिवशीं आमची खूप हबेलंडी उडाली ! व मागाहून मौजहि वाटली ! आम्हीं (आमच्या टोळीनें) एका गांवीं रात्रीं दरोडा घालण्याचा बेत ठरविला. या गांवास चहूंबाजूनें कोट होता व रात्रीं दरवाजे बंद होत असत. आमच्या बेताची बातमी पोलिसांना कशीतरी आगाऊ कळली; व त्यामुळें सुमारें १००–१२५ सशस्त्र पोलिसांचे तुकडीनें कोटाला लागून असलेल्या व मध्यें मोकळा चौक असलेल्या धर्मशाळेंत मुक्काम टाकला; व आम्ही मंडळी गांवांत शिरल्यानंतर आमचा समाचार घेण्याची त्यांनीं जय्यत तयारी ठेवली."

धर्मशाळेला चहूंबाजूंनीं पडव्या होत्या व मधलें अंगण मोकळें होतें. शहरचे कोटावरून उड्या मारून आंत सरळ जातां येईल अशी एक जागा

होती. धर्मशाळेचा चौक अगदीं मोकळा ठेवून पोलिसांनीं आपला मुक्काम पडव्यांतून ठेवला होता.

लाखाजी पुढें म्हणाला, " आम्ही बहुतेक त्याच रात्रीं त्या गांवीं जाऊं अशी त्यांना बातमी होती; तरी पण खरोखर त्याच रात्रीं जातों कीं मागाहून हें त्यांस खात्रीनें माहीत नव्हतें. त्याचप्रमाणें रात्रीं आम्ही केव्हां येऊं—मध्यरात्रीं कीं पहाटे कीं दुसऱ्या·कोणत्या वेळीं—याची त्यांना कल्पना नसावी. म्हणून नेहमींप्रमाणें आपल्या संगीनवाल्या बंदुकी एकमेकाला टेकून उभ्या ठेवून पोलीस गाढ निद्रेंत गर्क होते. फक्त पहारा म्हणून चढविलेल्या संगिनीसह ३–४ जण उभे होते. धर्मशाळेंत पोलीस आहेत याचीच आम्हांला कल्पना नव्हती, मग त्यांच्या तयारीची कोठून असणार ?

" आम्हीं कोटावर चढून तेथून कानोसा घेतला. कर्मधर्मसंयोगानें आम्ही नेमके धर्मशाळेच्या वरच कोटावर होतों. धर्मशाळेचे आवारांत आम्हांस कोणी दिसलें नाहीं व तेथून आंत उड्या मारण्यासारखी जागा दिसतांच तेथूनच आम्हीं आंत शिरावयाचें ठरविलें. गांवाच्या सभोंवतालचे कोटाचे मुख्य दरवाजाजवळ धर्मशाळा असल्यानें तेथून उड्या मारणारांनीं पळत जाऊन, मुख्य दरवाजा उघडून बाहेरच्या साथीदारांस गांवांत घेणें सोपें व सोइस्कर होतें."

" अशा परिस्थितींत आम्हीं तिघांचौघांनीं मध्यरात्रीनंतर कोटावरून धर्मशाळेच्या आवारांत उड्या मारल्या. सापानें जबडा पसरावा व बेडकानें त्यांत उडी मारावी असाच कांहींसा आमचा प्रकार झाला! उड्या मारल्या-बरोबर आमची चूक आमचे लक्षांत आली. पण आतां करणार काय ? कांहींतरी प्रयत्न केलाच पाहिजे, नाहींतर आमचें मरणच प्रत्यक्ष पुढें उभें होतें. सुदैवानें आम्हांस प्रसंगावधान राहिलें. मोकळया जागेच्या चारहि बाजूला पडव्यांत निजलेले पोलीस व तेथें असणारे ३।४ पहारेकरी पहातांच आम्हीं एकदम निरनिराळ्या दिशांनीं त्या पहारेकऱ्यांशीं इतक्या लौकर व अशी लगट केली कीं ते बिचारे स्तंभितच झाले व मग त्यांच्याच बंदुका व त्यांचींच काडतुसें घेऊन आम्ही मांड ठोकून उभे राहिलों. बंदुका रोखल्या व मोठ्यानें गर्जना केली, ' खबरदार, जो उठेल व हालचाल करील

तो प्राणास मुकेल.' असें म्हणून मिनिट अर्धामिनिट थांबून आम्हीं सर्व तेथून प्रथम सावकाश व मग पळत कोटाचे बाहेर आलों; व मग पोलिसांच्या शिट्या सुरू झाल्या! सगळयांस हकीकत समजून ते सज्ज होऊन बाहेर निघेपावेतों १५ मिनिटें तरी झालीं. तोंपावेतों आम्ही बरेंच पुढें गेलों होतों. तेथें संरक्षणाची जागा पाहून आम्हीं ठाण मांडला व गांवाच्या बाजूनें येणाऱ्या पोलिसांची चाहूल लागतांच गोळीबार चालू केला. आमचे-पुढें येण्याची कोण छाती करणार? पोलीस इकडे तिकडे कांहीं वेळ आवाज करून परत गेले व आम्हांला तेथून निसटण्याची पूर्ण संधि मिळाली."

यावर मीं म्हटलें, "फार आश्चर्य आहे बुवा! शेंसवाशें पोलीस बंदुका व गोळ्यांनीं सज्ज असलेले; व ते तुम्हां चौघांना भ्याले? तुमचा पाठलाग करून सहज गराडा घालूं शकले असते व गोळ्यांचा वर्षाव करून एकास तरी मारूं किंवा जखमी करूं शकले असते. लाखाजी तुम्ही सांगतां तसें खरोखरच झालें का? कीं कांहीं काल्पनिक सांगत आहांत?"

लाखाजी:—"खरोखरच मी सांगत आहे असेंच झालें. मी उगाच खोटें कशाला सांगूं? पण दादासाहेब, जें झालें त्यांत आश्चर्य करण्याजोगें काय आहे? अहो, ही मंडळी सरकारचा पगार खाणारी! केवळ पगार मिळावा म्हणून नोकरींत शिरलेली! त्यांच्यापैकीं कोणीहि मरणास कां तयार होईल? ते पळाले त्यांत आश्चर्य नाहीं. उलट त्यांनीं आमचा पाठलाग केला असता व जीव संकटांत घातला असता तरच आश्चर्य! आणखी असें पहा, आम्ही आमचे जिवावर उदार झालेलों होतों. वांचलों तर वांचलों, नाहींतर मरण हें निश्चित, अशी आमची स्थिति; याच्या उलट पोलिसांची स्थिति. मनुष्य त्याग किंवा पराक्रम करतो तो आपलेपणाचे भावनेनें किंवा आपला आदर्श सिद्ध करण्यासाठीं करीत असतो. केवळ पोटाला मिळावें एवढ्याचसाठीं करावयाच्या भाडोत्री त्यागाला मर्यादा असतात."

लाखाजीचें हे बोल ऐकून मला त्याच्या सामान्य व्यवहारज्ञानाचें, मनुष्यस्वभावाच्या ज्ञानाचें फारच कौतुक वाटलें. हा मनुष्य खरोखरीच आपण समजतों तसा अशिक्षित, आडदांड नसून चाणाक्ष आहे व त्याच्यामध्यें अनेक प्रकारचे गुणहि आहेत अशी प्रचीति आली.

( ३ )

एकदां तो मला म्हणाला, "दादासाहेब, १९२१-२२ सालची कॉंग्रेस व आतांची कॉंग्रेस ( १९४२-४४ ) यांच्यांत किती जमीन अस्मानाचें अंतर आहे? हल्लींची तुम्ही मंडळी तुरुंगांत आल्यावर, यत्किंचित् अडचणीहि सोसूं शकत नाहीं! प्रत्येक बाबतींत तुम्हांला सुखसोयी हव्यात व त्यासाठीं कित्येक कॉंग्रेसवाले आम्हांला लाज वाटेल अशा प्रकारच्या लाल्चा वॉर्डरांना देतात, अधिकाऱ्यांच्या खुशामती करतात, भेकडपणा दाखवतात! अशी मंडळी का तुमच्या स्वराज्यासाठीं आपल्या जिवावर उदार होऊन प्राणार्पण करणार आहेत? स्वार्थावर पाणी सोडून गोरगरिबांची सेवा करणार आहेत? तुम्ही चतुर आहांत. तेव्हां सर्व समजतांच आहोंत; पण जर तुम्ही या मंडळींच्या आधारावर स्वराज्य चालविण्याच्या भ्रमांत असाल तर निश्चित तोंडघशीं पडणार आहांत."

धोक्याची सूचना देणारे हे त्याचे शब्द!

लाखाजीनें आणखीहि कांहीं गोष्टी सांगितल्या. या डाकू मंडळींचें एक प्रकारचें तत्त्वज्ञान किंवा कार्यनीतिहि होती. त्याला सामाजिक किंवा राजनैतिक तत्त्वज्ञान म्हणा किंवा नका म्हणूं, पण त्यांत अन्यायाची सामान्यतः चीड, गरिबांविषयीं सहानुभूति, स्त्रियांविषयीं आदर वगैरे गुण बऱ्याच अंशीं दिसून येतात. लाखाजी म्हणे, "आमच्या पोटासाठीं किंवा चैनीसाठीं आम्हीं कोणालाहि लुटलें नाहीं, गरिबांवर जुलूम केले नाहींत, स्त्रियांना केव्हांहि त्रास दिला नाहीं, उलट त्यांना आमच्या आयाबहिणी समजून त्यांचेशीं आदरानें वागलों. सासरीं जाणारी नववधू किंवा गरोदर स्त्री वाटेंत भेटली तर तिला लुटण्याऐवजीं आमचे जवळचे दागदागिने, कपडेलत्ते वगैरे तिला देऊन तिची बोळवण तिचे घरीं करीत असूं. आम्हीं पैशाचा संग्रह कधींच केला नाहीं. करूं शकत नव्हतों हेंहि खरें. पण समाजकंटकांना शिक्षा देणें हें आम्ही कर्तव्य समजत होतों. गरिबांना देण्यासाठीं पैसेवाल्यांना लुटत होतों.— असें असूनहि आम्ही चोर, डाकू, लुटारू आणि स्वार्थी राजकारण करणारे आमच्यापेक्षां श्रेष्ठ, चांगले! तुम्हीच विचार करा. आमचा तिरस्कार करूं नका."

ता. १०-३-१९४४ रोजीं मी साबरमती तुरुंगांतून सुटल्यानंतर सुमारें २ वर्षांनीं लाखाजी सुटला. मोठ्या प्रेमानें मला भेटावयास आला. हल्लीं तो काठेवाडांत (पूर्वींच्या मालिया राज्यांतील) आपल्या गांवीं शेती करून असतो. सुटल्यावर पोलिसचा ससेमिरा त्याचे मागें होता. पण पुढें मी व आणखी कांहीं मित्रांनीं सौराष्ट्र सरकारास आग्रहानें सांगितलेंवरून त्याला अविच्छिन्नपणें शेतीचा धंदा करून रहातां येणें शक्य झालें आहे. गेले २।३ वर्षांत त्याची कांहींच बातमी मला कळली नाहीं. त्यावरून त्याचें सर्व कांहीं ठीक चाललें असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

—*—

# सरकारी तंत्रांतील मानवता

"दादासाहेब, जेलरसाहेबांनीं सांगितल्यावरून या आमच्या वृद्ध वडिलांना तुमचेकडे घेऊन आलों आहोंत. यांचें वय सुमारें ७२–७५ आहे. तोंडांत दांत नाहींत व डोळ्यांनीं यांना दिसत नाहीं! कोणीतरी यांना हात धरून नेल्याशिवाय इकडे तिकडे जाणें अशक्य आहे. यांची शारीरिक स्थिति व यांनीं सुमारें १४ वर्षें भोगलेली कैद लक्षांत घेऊन यांची सुटका करण्याची शिफारस स्थानिक जेल कमेटीनें केली होती. त्यावरून हा सरकारी हुकूम आला आहे. तो पहा व आम्हीं काय करावें तें सांगा."

याप्रमाणें एका तरुण कैद्यानें आपला धाकटा भाऊ व बाप यांसह माझेकडे येऊन मला विनंति केली व हुकुमाचा कागद माझे हातांत दिला.

सरकारचा तो हुकूम वाचून मला संताप आला. मन खिन्नहि झालें. असें वाटलें कीं 'काय हा हुकूम? हा हुकूम लिहिणाऱ्या सेक्रेटरीएट-मधल्या सरकारी अधिकाऱ्याला, कांहीं सामान्य ज्ञान किंवा माणुसकी आहे कीं नाहीं? कीं नुसते ऑफिसांतील खुर्चीवर बसून काटेकोरपणें व सहानुभूति-शून्य रीतीनें नियमांचा अमल ही मंडळी करतात?' अशा प्रकारचे विचार माझे मनांत येऊं लागले. आमचें स्वराज्य नसल्यानें सरकारी तंत्र मानवता-शून्य आहे व ही सकृत्दर्शनीं दिसणारी लहान गोष्टहि, स्वराज्याचे मागणीस पुरतें कारण आहे असें मला वाटलें. असो.

माझेकडे आलेला तरुण कैदी, त्याचा बाप व लहान भाऊ हे मुळचे बोरसद (खेडा जिल्हा) येथील रहाणार. त्याच्या बापाला आणखी तीन धाकटे भाऊ होते. ही सर्व मंडळी बोरसदला (तेथील जवळचे एका खेड्यांत) अविभक्तपणें एकत्र कुटुंब म्हणून रहात होती व शेतीवर आपला निर्वाह करीत होती. शेताचे जमिनीचे बाबतींत ही मंडळी व त्यांचे शेजारचे शेतवाली मंडळी यांचेमध्यें कांहीं भांडण, बोलाचाली व अखेर

मारामारी होऊन परिणामीं २।४ माणसें ठार झालीं ! कांहीं यांचे बाजूचीं व कांहीं समोरचे बाजूचीं.

गैरकायदा मंडळी, मारामारी, खून वगैरे आरोप ठेवून दोन्ही पक्षांवर स्वाभाविकच खटले भरण्यांत आले. त्यांचा निकाल होऊन दोन्ही पक्षांच्या मंडळींना जन्मठेप, काळेपाणी व निरनिराळया मुदतीच्या कैदेच्या शिक्षा झाल्या. त्यांत माझेकडे आलेला तो तरुण कैदी, त्याचा भाऊ, बाप व दोन काका या सर्वांस जन्मठेप काळे पाण्याच्या शिक्षा झाल्या ! व त्यांचा सर्वांत धाकटा काका एकटाच मोकळा राहिला होता. मारामारीचे वेळीं तो शेतावर नसल्यानें सुदैवानें तो मोकळा राहूं शकला. कुटुंबांत बायका माणसें व लहान मुलें होतीं.

या कुटुंबापैकीं जे दोन चुलते होते त्यांची इतर जेलमध्यें बदली झाली होती; व बाप व दोन लेक असे साबरमती तुरुंगांत होते. या तुरुंगांत त्यांनीं १४ वर्षे काढलीं. व सुरवातीस लिहिल्याप्रमाणें स्थानिक जेल कमेटीनें दीर्घ मुदतीच्या कैद्यांच्या शिक्षेचा विचार करतांना, या तिघांपैकीं एकट्या अशक्त, वृद्ध व अंध बापाची सुटका करण्याची शिफारस केली होती.

सरकारी सुटकेचा हुकूम वाचून मला एवढें संतापण्यासारखें व दुःख वाटण्यासारखें होतें तरी काय त्यांत? सुटकेच्या अटी सरकारनें दिल्या होत्या त्याच वाचकांपुढें ठेवतों. त्यावर विशेष मल्लीनाथी करण्याची आवश्यकता नाहीं. या पहा त्या अटीः—

( १ ) या वृद्ध कैद्यानें सरकारला हमी दिली पाहिजे कीं, त्याला मोकळा सोडल्यावर तो **कोणत्याहि** प्रकारचा **कांहींहि** गुन्हा करणार नाहीं.— या अटीची व्यापक भाषा लक्षांत घेतली पाहिजे. केवळ मारामारी-सारखाच नाहीं, पण "**कोणताहि गुन्हा**"! म्हणजे यांत सर्व बारीकसारीक गोष्टी आल्या. संतापानें एकाद्यास शिवीगाळी केली किंवा असेंच कांहीं दुसरें क्षुल्लक कारण घडलें तरी या अटीचा भंग व्हावयाचा ! पण मुख्य प्रश्न असा कीं, ज्याला दिसत नाहीं, तोंडांत दांत नाहींत, चालावयाचीहि शक्ति नाहीं, असा मनुष्य गुन्हा तरी काय करणार? पण हें पहातो तरी कोण? सुटणाऱ्या

कैद्याकडून "मी कोणताहि गुन्हा करणार नाहीं." अशी हमी घ्यावयाची असा नियम ! व त्यास अनुसरून ही अट !

( २ ) या वरील अटीचा भंग झाल्यास बाकी शिक्षेची माफी रद्द होऊन सर्व शिल्लक शिक्षा भोगण्यास पुन्हा तुरुंगांत आलें पाहिजे ! यावर काय लिहावें ? ७२–७५ वर्षांचा अंध म्हातारा गुन्हा करील असें मानलें तरीसुद्धां त्याचे डोक्यावर बाकी राहिलेली १०–१५ वर्षांची शिक्षा टोकण्यांत येईल, असें म्हणण्यांत काय स्वारस्य ? पण ही अट नियमानुसारच होती. यापुढील अट तर आणखी मौजेची किंवा जास्त त्वेषजनक ! ती अशी:—

( ३ ) खुनासारखा भयंकर गुन्हा म्हाताऱ्यानें केलेला असल्यानें, त्याला जरी सोडण्यांत येत असलें, तरी त्याची बिनशर्त मुक्तता करणें इष्ट नाहीं म्हणून त्यानें तुरुंगाचे बाहेर निघाल्यापासून पांच वर्षे "गुन्हेगारांचे वसाहतींत" काढलीं पाहिजेत ! व त्या पांच वर्षांत दोषास्पद असें कांहींहि त्याचे हातून न घडलें तरच त्याची बिनशर्त मुक्तता करण्यांत येईल.

आतां ही 'गुन्हेगारांची वसाहत' ( Criminal Settlement ) म्हणजे काय ? हें थोडक्यांत सांगितलें पाहिजे. सभोंवतीच्या मोठ्या व उंच भिंतीचे आवारांत असलेलीं इतर लहान आवारें–ज्याला पुन्हां भिंती असतात–त्या आवारांतील कोठड्यांतून दिवसाखेरीज इतर वेळीं तुरुंगांतील कैदी कड्याकुलुपांत बंद असतात. त्याचे ऐवजीं, वसाहतींत फारच मोकळीक असते. तेथें कोणासहि कडीकुलुपांत ठेवत नाहींत. दिवसा वसाहतीचे आवाराबाहेर जाण्याफिरण्याची मोकळीक. फक्त सायंकाळीं अमुक वाजल्यापासून सकाळीं अमुक वाजेपर्यंत वसाहतींत राहिलं पाहिजे व बाहेर जातां येत नाहीं. त्या वसाहतीचे भोंवतीं तारांचें काटेरी कुंपण असतें व बाहेर जाण्याचा दरवाजा बंद असतो. दिवसा व रात्रीं पहारा असतो.

पण तुरुंगांत कैद्याचे भोजनाची व्यवस्था करण्याचा बोजा सरकारवर असतो तर वसाहतींत तो असतोच असें नाहीं. बाहेर जाण्याची मोकळीक असल्यानें मोलमजुरी करून उपजीविका करतां येते; व ज्याला वसाहतींतील

अन्न नकोसें असतें, त्यानें स्वतःचें मिळवून खाण्याची मोकळीक असे व याप्रकारें जेलमधील बंदिवासापेक्षां तरुण कैदी वसाहतींत रहाणें जास्त पसंत करितात; व म्हणून हा नियम म्हणजे एक सवलतच आहे. पण या केसमध्यें प्रश्न असा कीं अशक्त, वृद्ध व आंधळा कदी नाहीं आपल्या मुलांबरोबर, किंवा नाहीं घरीं आपल्या एकट्या भावाबरोबर! त्यानें असहाय्य अशा स्थितींत एकटें कसें रहावें? शिवाय वय व शरीरप्रकृति पहातां तो मरणाच्या दारीं उभा होता! त्यानें कोणाहि आप्तेष्टांच्या सांन्निध्यांत मरण्या-ऐवजीं मुलांपासून दूर राहून गुन्हेगारांच्या वसाहतींत, मायेचें व काळजी वाहणारें कोणी जवळ नाहीं अशा स्थितींत कां मरावयास जावें?

अशा परिस्थितींत त्या तरुण कैद्याला काय सल्ला द्यावी हें माझे मनांत लगेच ठरवलें. तरी पण त्याला सल्ला देण्यापूर्वीं विचारलें, "समजा कीं मी सांगतों त्याप्रमाणें केलें, व सरकारनें केलेला हुकूम रद्द करून तुझ्या बापास सोडतां येत नाहीं असें म्हटलें तर तुला चालेल का?" त्याला बिचाऱ्याला काय कल्पना होती? तो माझेवर विश्वास ठेवून आला होता. तेव्हां मी ज्या धर्तीनें सरकारास लिहिण्याचा विचार करीत होतों त्याच्या निरनिराळ्या परिणामांची त्याला कल्पना देणें आवश्यक होतें. मला मात्र अवश्य वाटत होतें कीं या प्रकरणीं सडेतोड व तडफी अशी वृत्ति धारण केल्यास म्हाताऱ्याची सुटका तावडतोब होईल. पण कोणी सांगावें, सेक्रेटरीएटमध्यें बसणाऱ्या अधिकाऱ्याच्या डोक्यांत काय विचार येतील? कदाचित् त्याला असेंहि वाटावयाचें कीं हा म्हातारा अशा गमजा दाखवतो काय? राहूं द्या त्याला डांबून! पण असा संभव फार कमी होता. त्या तरुण कैद्यानें फारसा कांहीं विचार न करतां मला पटकन् उत्तर दिलें, "तुम्ही जें कराल तें मला मान्य आहे. शरती सुटकेचा हुकूम रद्द झाला तरी आम्हांला त्याचा कांहीं शोक वाटणार नाहीं."

एवढी हमी मिळाल्यावर मग मी कसला संकोच ठेवणार? विनम्र पण स्पष्ट शब्दांत मी माझा संताप व दुःख व्यक्त करून अर्ज लिहिला; त्यांत पुढील मुद्दे मुख्य होते:—(१) "माझी शारीरिक अवस्था प्रत्यक्ष पाहून जेल कमेटीनें केलेली शिफारस सरकारनें स्वीकारली असती तर बरें झालें

असतें. पण सेक्रेटरीएटच्या खोलींत बसून प्रत्यक्ष स्थिति काय आहे याचें ज्ञान नसतां व तिचा विचार न करतां, विलक्षण अटी घालून सशर्त सुटका करण्याचा हुकूम केला याबद्दल अत्यंत उद्वेग व दुःख होत आहे. सरकारी तंत्रांत माणुसकीस वाव आहे कीं नाहीं अशी शंका वाटूं लागते आहे, ( २ ) मला जर बिनशर्त मुक्त करावयाचें नसेल तर गुन्हेगारांच्या वसाहतींत जाऊन एकट्यानें मरण्यापेक्षां तुरुंगांत माझ्या दोन मुलांच्या सांनिध्यांत मरणें मी ज्यास्त पसंत करतों. ( ३ ) बिनशर्त मुक्ति दिल्यास मी मोठ्या आनंदानें बऱ्याच वर्षांनीं मी माझ्या धाकट्या भावाच्या भेटीस जाऊन घरांतील कुटुंबीय मंडळींच्या सांनिध्यांत प्रसन्न मनानें व शांत चित्तानें माझे प्राण सोडीन.

तेव्हां सरकारनें जें वाटेल तें करावें. कोणत्याहि स्थितींत मी सारखाच सुखी आहें. मी कोणत्याहि प्रकारची हमी देऊं इच्छीत नाहीं."

या अर्जाचा तीर माझे अपेक्षेपेक्षां जास्त चांगला व जास्त लौकर लागला. त्याबरोबरच हेंहि म्हटलें पाहिजे कीं जडवत् अशा सरकारी तंत्रांतहि मधून मधून गोड असे माणुसकी दर्शविणारे प्रसंग घडूं शकतात.

आठवेच दिवशीं म्हाताऱ्याच्या बिनशर्त सुटकेचा हुकूम आला. इतक्या लौकर हा हुकूम आला याचें सर्वांनाच आश्चर्य वाटलें. ते तिघेहि मला भेटावयास आले व साहजिकच सर्वांस आनंदाश्रु आले. तिघांच्याहि चेहऱ्यांत आनंद व कृतज्ञता भरलेली पाहून मलाहि आनंदाचें भरतें आलें.

—※—

# परिशिष्ट

## मंगलदर्शन

( ख्यातनाम गुजराथी साहित्यिक उमाशंकर जोशी यांच्या मूळ गुजराथी प्रस्तावनेचा अनुवाद. )

न्यायासनासमोर आरोपीवर गुन्हा शाबीत करून त्याला तुरुंगांत ढकलण्यांत जो वर्ग बहाद्दूर आहे अशांपैकीं कांहींना तुरुंगाचा थोडाफार प्रत्यक्ष अनुभव आपल्या सत्याग्रहाच्या लढ्यांत मिळाला हा एक त्या लढ्याचा शुभ परिणामच म्हणावयाचा. खरें पाहतां शिक्षा फटकारण्याचें काम न्यायाधिशाचें, तेव्हां तुरुंगांतील क्लेशांचा अनुभव न्यायाधिशांच्या वांट्यास येण्यास हवा. तुरुंगांतील हवा कशी काय असते याचा आस्वाद या न्यायाधीशांना मिळणें अगत्याचें आहे. पण वकीलवर्ग ज्याप्रमाणें स्वतंत्र असतो तशी गोष्ट न्यायाधिशांची नाहीं. स्वतःची खुर्ची झुगारून देऊन किंवा पेन्शनीवर पाणी सोडून एखादे न्यायमूर्ति सत्याग्रहाच्या खळबळींत सांपडले असतील; नाहीं असें नाहीं. पण वकीलवर्गातील बऱ्याच देशभक्तांना तुरुंग म्हणजे काय याचा अनुभव सत्याग्रहांत मिळाला ही गोष्ट जगजाहीर आहे.

सत्याग्रह म्हणजे मानवतेचा मार्ग. तेव्हां मानवतेच्या भावना ज्यांच्या हृदयांत स्फुरत होत्या असे वकील साहजिकच या संग्रामाकडे विशेष जोरानें खेंचले गेले. तुरुंगांत गेल्यानंतर सामान्य कैद्याकडे पाहण्याची या महा-पुरुषांची दृष्टि अर्थात्च वेगळी. गुन्हेगार कैद्यांच्या मदतीस यावें, त्यांची सजा कमी करण्याचा प्रयत्न करावा, शक्यतों त्वरित त्यांची सुटका करण्या-साठीं झटावें म्हणून ही मंडळी सारखा प्रयत्न करीत. १९२२-२३ मध्यें येरवड्याच्या तुरुंगांत असतांना स्वतः सत्याग्रहाचे प्रणेते गांधीजी यांनींहि आपल्या वॉर्डरची सुटका करण्यासाटीं " अर्जावर अर्ज " खरडले. त्यावेळीं आदन नांवाचा एक एडनहून आणलेला कैदी त्यांच्या दिमतीस देण्यांत

आला होता. शक्य तर त्याची सुटका होऊन त्याला परत त्याच्या वतनीं म्हणजे मूळ सोमालीलँडला पाठविण्यांत यावें, निदान त्याची बदली परत एडनला व्हावी म्हणून महात्माजींनीं पुष्कळ परिश्रम केले ही गोष्ट सर्वांना माहीत आहे. हिंदुस्थानांतील वेगवेगळया तुरुंगांत अनेक सत्याग्रही वकीलांनीं कैदी बांधवांच्यासाठीं बरेच परिश्रम केले. १९४२ च्या लढ्यांत तुरुंगाचा कारभार जरा ढिला पडला; तेथील बंधनें बरींच शिथिल झालीं. त्या संधीचा फायदा घेऊन कैदी बांधवांची सेवा करण्याचें जें पुण्य नामदार दादासाहेब मावळंकर यांनीं जोडलें तितकें पुण्य अगर तशी तपश्चर्या इतर कुणाची असेल असें वाटत नाहीं. नामदारांचें हें सेवाकार्य अनुपम होय.

फांशीच्या एका प्रसंगावरून नामदारांचें लक्ष्य फांशी कैद्यांच्या मनःस्थितीकडे वेधलें गेलें आणि खुनाच्या खटल्यांतील आरोपी व विशेषतः फांशीची शिक्षा झालेले कैदी यांना मदत करण्याचा त्यांनीं निर्धार केला. श्री. दादासाहेब हे निष्णात कायदेपंडित आहेत. कायद्याचें सारें ज्ञान व हृदयाची सारी तळमळ त्यांनीं या कामीं लावली. तिरस्कृत गुन्हेगारांना मदत करण्याच्या कामीं त्यांना यशहि चांगलें आलें. क्वचित् त्यांचे प्रयत्न निष्फळ झाले हें खरें. पण यशापयशाचा प्रश्न बाजूला ठेवला तरी मानवतेला मूर्तिमंत स्वरूप देण्याचा त्यांनीं प्रयत्न केला; व ही त्यांची खरी तपश्चर्या आहे हें कोणीहि नाकबूल करणार नाहीं. गुन्हेगार, खुनी, समजल्या जाणाऱ्या फांशी कैद्यांच्या विश्वांतहि मानवतेच्या अमृतसागरास कशी भरती येऊं शकते याचा साक्षात्कार त्यांना झाला. हें साक्षात् दर्शनच या पुस्तकाचें सर्वांत मोठें आकर्षण होय यांत शंका नाहीं.

गुन्हे हुडकून काढण्यांत व न्याय देण्यांत ज्यांचा सर्व वेळ जातो त्या वकील मंडळींना व न्यायाधिशांना या सत्यकथांतून मनुष्यस्वभावाची ओळख व्हावी अशीच कुणीहि इच्छा करील. ज्या कैद्यांना ही मंडळी जन्मठेप अगर लांबमुदतीची शिक्षा फर्मावितात अथवा सृष्टिकर्त्यानें कांहीं जीव निर्माण करण्यांत जणूं कांहीं भयंकर चूक केली अशी ठाम समजूत करून अशा जीवांना फांसावर लटकावून, परत त्या सृष्टिकर्त्याकडे धाडून देण्याचा प्रयत्न करतात, त्या फांशी कैद्यांच्या मनाची ठेवण कशाप्रकारची असते

व माणुसकीच्या मापानें त्यांचें अन्तःकरण किती उच्च दर्जाचें असतें याचा जर या मंडळींनीं अभ्यास केला तर ही आपली वकील—न्यायाधीश मंडळी, या कैद्यांशीं वागतांना फार वेगळ्या दृष्टीनें पाहतील यांत शंका नाहीं. १९२०-१९४५ या पंचवीस वर्षांत वकील मंडळींना फार मोठ्या प्रमाणांत तुरुंगांत जाण्याची संधि मिळाली तशी मिळणें आतां कठीण आहे हें खरें. वकिलांच्या दुनियेचे प्रतिनिधि म्हणून दादासाहेबांनीं जें हें फांशी कैद्यांचें अंतरंग समजावून घेऊन एक प्रकारचें हें मंगलदर्शन घेतलें आहे त्याचा भविष्यकालांत उपयोग होईल अशी आशा करूं या.

( २ )

हा मंगल अनुभव एका निष्णात कायदेपंडिताला प्राप्त झाला या मुद्यावर मी मुद्दामच भर देतों. श्री. दादासाहेब वकील नसते तर या प्रकारचा अनुभव त्यांना प्राप्त होण्याची संधि कदाचित् मिळालीच नसती. पण तुरुंगांत वकिली ज्ञानाचा उपयोग करण्यास श्री. दादासाहेबांनीं सुरुवात केली तेव्हां या वस्तूचें सारें स्वरूपच बदलून जातें! मोठाल्या न्यायालयांत "मिलॉर्ड" म्हणून ऐटींत आपल्या बुद्धिवैभवानें अशिलाला विजयी करणाऱ्या वकिलाचें चित्र कल्पनेसमोर आणावें आणि तुरुंगांत डोळ्यांतून अश्रू वाहत आहेत, कंठ सद्गदित झाला आहे, मन व्याकुळ झालें आहे; व अशा स्थितींत महमद मुसाला दादासाहेब विनवणी करीत आहेत! या वास्तववादी चित्राशीं तुलना करावी. "महमद, तूं खरें सांगत नाहींस. तुझा माझ्यावर विश्वास नाहीं का? शक्य ती मदत तुला करण्यासाठीं मी येथें आलों आहें. तेव्हां खरें काय असेल तें सांगून टाक." या शब्दांत महमदशीं आपुलकीनें बोलणारे दादासाहेब यांचें चित्र पहा. न्यायालयांत न्यायाच्या नांवानें चाललेली ती हृदयहीन बुद्धीची खेंचताण! त्या रस्सीखेंचींत मनुष्यप्राण्याच्या भविष्याच्या चिंधड्या झाल्या तरी तिकडे कुणाचें लक्ष जाणार? तुरुंगांत असतांना अशा दुर्दैवी कैद्यांच्या उरल्या आयुष्याचा थोडातरी भाग नीट बचावून शाबूद ठेवतां आला तर केवढें तरी कार्य झालें! या भावनेनें केवढी तपश्चर्या चालते! कोर्टांत पैशाच्या तालावर बुद्धि नाचते; आणि तुरुंगांत

प्रेमानें भारून मन सत्याचा प्रकाश हुडकून काढण्यांत दंग होऊन जातें. कोर्टदरबारीं 'मला कांहीं माहीत नाहीं' हा मंत्र सर्रास आरोपीला पढविण्यांत येतो. येथें दादासाहेबांच्या संग्रहीं एकच मंत्र "सत्य सांग." वकिली करीत असतांना अनेक वेळां या मंत्राचें रहस्य त्यांनीं जाणलें असेल; आणि जाहीर जीवनांतहि हाच मंत्र त्यांच्या मनावर पूर्णपणें ठसला असेल; आणि तुरुंगांतहि कैद्यांपुढें त्यांनीं या मंत्राचाच सदोदित पुरस्कार केला. सत्यासारखा अन्य रक्षक नाहीं हेंच खरें.

या पुस्तकांतील पहिल्या चार गोष्टी वरील तत्त्वाची प्रतीति आणवून देण्यास पुऱ्या आहेत. सत्य हें केवळ अव्यवहार्य, आदर्शवादी लोकांच्या-साठींच होय असें खास नव्हे. रोजच्या जीवनांत दरएक मनुष्याला एकंदरींत सत्याचरणानें फायदाच होतो असें हें सूत्र आहे. या चार गोष्टींतून हेंच तात्पर्य अगदीं स्पष्ट आढळतें.

सत्याचा मार्ग म्हणजे अलबत् तलवारीच्या धारेवर चालण्याचा मार्ग. त्यांत धोका अर्थातच आहे. कानजी किंवा महमद या कैद्यांपासून श्री. दादासाहेबांनीं ही गोष्ट मुळींच लपविली नव्हती. फांसावर जाण्याचा प्रसंग टळला नाहीं तर त्या क्षणीं "दादांनीं मला अखेर लटकावलेंच" अशी त्या कैद्यांची कल्पना होण्याचा संभव. म्हणूनच श्री. दादासाहेबांनीं साऱ्या बाजूचा विचार करून त्यांच्याजवळ सर्व परिस्थिति स्पष्ट शब्दांत मांडली! धोळक्याच्या बाजूच्या शेतकऱ्यानें खरें सांगितलें नसतें तरी कदाचित् कोर्टाच्या दृष्टीनें त्याचा फायदा होण्याचा संभव होता. पण मोठ्या आनंदाची गोष्ट कीं सर्व प्रसंगीं गुन्हेगार मंडळींनीं आपआपला गुन्हा कबूल केला. या चारी गोष्टींत सत्याचा आश्रय करून सर्व गुन्हेगार बचावले यावरून कोर्टात असत्याच्या ऐवजीं सत्यावर भिस्त ठेवून जर सर्व खटल्याची मांडणी झाली, तर त्यांतच अधिक शहाणपणा आहे याचा अनुभव खात्रीनें येईल व हा एक फार मोठा महत्त्वाचा मुद्दा आहे. त्याहूनहि अधिक महत्त्वाची बाब म्हणजे मनुष्याच्या मनांतच सत्याला चिकटून रहाण्याची एकसारखी किती खळबळ चाललेली असते—जणूं सत्य हाच मनाचा स्वाभाविक धर्म होय—या गोष्टीची या सर्व कथांवरून वाचकांना

प्रचीति येते. धोका पत्करूनहि कानजी अगर महमद अगर धोळक्याचा शेतकरी हें सत्य सांगण्यास धजतात. सोमा आणि शहाजादा यांनीं आपल्या दयेच्या अर्जांत सत्याचीच कांस धरली. महंमद व शिवराम हे तर फांशीच्या माच्यावर चढतांना देखील सत्याचा जयघोष करितात. व साधु मंत्राक्षरी देखील जाहीर नाहीं तरी खासगी बोलण्यांत श्री. दादासाहेबां-समोर सत्य गोष्ट कबूल करतो.

ही सर्व मंडळी कांहीं सत्यवादी नव्हती. तरी देखील ती सत्याचा आश्रय घेतात. तें कां? तर सत्यासारखें आश्वासन देणारें परमसाधन नाहीं म्हणून. सत्याचें कवच घालतांच मनुष्य फुलासारखा हलका होतो. त्याच्या छातीवर असलेली हिमालयासारखी एखादी प्रचंड धोंड जणूं बाजूला झाल्यासारखा त्याला अनुभाव येतो; आणि स्वतःचे दोष धुवून काढण्यास तो मोकळा होतो. हृदयाचे बोल बोलून श्री. दादासाहेब या कदीबंधूंचें मन जिंकतात. सत्याकडे त्यांचीं मनें वळतात आणि सत्याचा स्वीकार करतांच त्यांच्या मनांत पश्चात्तापाचे पाट खळखळां वाहूं लागतात; व दोष धुतले जातांच त्यांचे जीव अगदीं हलकेफुल होऊन उंच तरूं लागतात. रागीट पण प्रेमळ पति म्हणतो, "बस् आतां अगदीं कृतनिश्चय! जें घडलें तें सर्व तसेंच सांगायचें. पत्नीची माफी मागून परमेश्वरावर हवाला टेवावयाचा." फांशी सुटली पण चार वर्षांची सजा भोगणें आलें. श्री. दादासाहेबांनीं विचारलें, "काय? पुढें अपील वगैरे कांहीं?" क्षणभर निःशब्द राहून तो पति उत्तर देतो, "बायको जन्माची गेली तर प्रायश्चित्त म्हणून चार वर्षे तुरुंगांत सजा भोगणें कांहीं फारसें मोटें नाहीं." फांशीच्या माच्याकडे चढून जाणारा महमद म्हणतो, "मला तर न्यायच मिळाला. मी माझ्या बायकोची माफी मागतों." शिवरामाच्या तोंडून देखील अखेरचे शब्द याच स्वरूपाचे. "खून करण्याचा इरादा होता याचा मी इन्कार करतों. तरीहि झालेली शिक्षा हा देवाघरचा न्याय होय असेंच मी मानतों. तेव्हां मला आतां कसला असंतोष नाहीं." सोमा मणीला शेवटच्या घटकेला म्हणतो, "मी तुझा अपराधी आहें, मला क्षमा कर." शहाजादा तर बबलीचा खून केल्यानंतरहि असा कांहीं बबलीमय झाला असतो कीं, "ज्या दिवशीं बबली

गेली त्याच तिथीला मी पण हजरताच्या दरबारीं चाललों. तिची मृत्युतिथि आणि माझी फांशीतिथि एक. केवढा मी भाग्यशाली!" याच निशेच्या आनंदांत गडी अगदीं चूर! *कलापीनें लिहिलेल्या ओळी किती सार्थ वाटतात!

" पस्ताव्याचा झरा विपुल हा उतरे स्वर्गांतुनी
पापी मारुनि बुडी त्यांत तो होतो पावन क्षणीं "

या घडलेल्या सत्यकथांतून श्री. दादासाहेबांना जो एक मंगल अनुभव प्राप्त झाला त्यावरून, पश्चात्तापाचा प्रभाव ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे असें मला वाटतें. केवळ हृदयाला धक्के बसतात म्हणून नव्हे पण समाजधारणेच्या दृष्टीनें गुन्हेगाराला शिक्षा करण्यांत जर प्रायश्चित्ताची पद्धत सर्वश्रेष्ठ मानून तिचा परिणाम किंवा प्रतिक्रिया काय होते तें अजमावण्याच्या दृष्टीनें या साधनाचा उपयोग केला, तर खात्रीनें एक प्रकारची इष्ट अशी क्रांति घडून येईल, या दृढभावनेनें मला हें असें वाटत. समाजाचें गाडें नीट सुरळींत चालावें म्हणून, त्यांत खीळ घालूं पहाणाऱ्यांना न्यायासनासमोर खेंचून त्यांच्यावर खटला चालविण व आरोप शाबीत झाल्यास त्याला सजा करण्याचा आत्मरक्षणाच्या दृष्टीनेंहि समाजास हक्क आहे. पण सुधारलेल्या आजच्या या दुनियेंतहि विरोधी तत्त्वांना पायबंद घालण्याचे जे रूढ कायदेशीर मार्ग आहेत त्या मार्गांनीं समाजाचें गाडें पुढें नेण्यास कांहीं मदत झाली असेल असें वाटत नाहीं. समाजाच्या प्रगतींत फारच मोठा कुणी व्यत्यय आणण्याचा यत्न केला तर त्याला आम्ही फांशीची शिक्षा ठोठावतों. पण लेखकांनीं एका ठिकाणीं सवाल टाकून विचारलें आहे कीं, " फांशीची सजा कित्येक वर्षांपासून चालत आली आहे म्हणून खून वगैरे गुन्ह्यांची संख्या घटली आहे काय?" झाल्या किंवा होणाऱ्या खुनाचा फांशी हा कांहीं इलाज नव्हे हें उघड आहे. समाजविरोधी लोकांना तुरुंगांत डांबण्यांत त्या माणसाला केवळ अटकेंत ठेवावा किंवा त्याला जरा अधिक कष्टमय शिक्षा व्हावी हा हेतू असतो. पण एकंदरींत तुरुंगाची अंतर्गत व्यवस्थाच अशी असते कीं, चोर म्हणून तुरुंगांत धाडलेला कैदी

---

* हे एक प्रख्यात गुजराथी कवि होऊन गेले. काठेवाडांतल्या एका राजघराण्यांत त्यांचा जन्म झाला.

गट्टीचोर म्हणून साऱ्या कला शिकून बाहेर पडतो. आपल्या देशांत काय अगर इतरत्र सुधारलेल्या देशांत काय तुरुंग म्हणजे तुरुंग. सैबिरियाच्या तुरुंगाचा अनुभव घेतल्यानंतर क्रापोट्कीन राजपुत्र पॅरिसला आला, आणि तेथें त्याला अगदीं प्रासादतुल्य तुरुंगांत ठेवण्यांत आलें. दोन्हीकडचे अनुभव पाहून क्रापोट्कीन म्हणतो कीं दोन्ही तुरुंग सारखेच.

कारावासाच्या शिक्षा करण्याच्या कल्पनेनें तर समाजाचें नुकसान करण्याचें कांहींच शिल्लक ठेविलें नाहीं. समाजाचें बौद्धिक दिवाळें वाजल्याची ही प्रत्यक्ष साक्ष आहे. ज्याला तुरुंगाची शिक्षा झाली तो माणूस शिक्षा पुरी करून बाहेर आला म्हणजे पापक्षालन करून तत्त्वतः शुद्ध झाला. तो नंतर समाजाचें कांहीं देणें लागत नाहीं अशा रीतीनें वागूं पहातो. पण तो शुद्ध, ऋणमुक्त झाला या दृष्टीनें समाज त्याच्याकडे पहातच नाहीं. याचा परिणाम म्हणजे सजा भोगून परत आलेला मनुष्य समाजाविरुद्ध अधिकच बिथरतो. पुनः गुन्हे करतो. समाज त्याला पुनः जबरदस्त शिक्षा ठोठावतो. म्हणजे एक प्रकारें समाज आपल्या स्वतःलाच शिक्षा करीत असतो. यांतून सुटका करावयाची तरी कशी ?

गुन्ह्यावर खरा उपाय शोधावयाचा तर तो कायद्याच्या कलमांत किंवा खच्चून भरलेल्या पीनलकोडाच्या पोटकलमांत सांपडणार नाहीं. यावर उतारा म्हणून मोठालीं कोर्टें धुंडाळूनहि कांहीं शोध लागावयाचा नाहीं. फर्ड्या बॅरिस्टरांच्या पल्लेदार भाषणांत अगर न्यायाधिशांच्या अतिशय महाग अशा निवाड्यांतहि तो दिसणार नाहीं. पण आरोपीच्या हृदयांतच तो आढळेल. जिथें मूळ तिथेंच त्या रोगावर इलाज. तिथेंच तो शोधून काढला पाहिजे. गुन्हेगाराचा अंतरात्मा जागृत झाला म्हणजे त्याला होणाऱ्या वेदना पाहून वेगळी सजा समाजानें स्थापलेल्या कोणत्या तुरुंगांत कशी मिळणार ?

समाजानें तुरुंगांत डांबवून लादलेली सजा व अन्तरात्मा जागृत होऊन त्यानें स्वतःच स्वतःला दिलेली सजा यांत महदंतर आहे. दुसऱ्या प्रकारची सजा भोगून झाल्यानंतर परत समाजांत येऊं पहाणारा गुन्हेगार "घे तुझी शिक्षा मीं भोगून पचविली. आतां काय म्हणून माझा छळ ?" अशा

तुसडेपणानें वागत नाहीं. तर स्वतःच्या दोषांची जाणीव होऊन विनम्र-भावानें समाजाच्या उपयोगी पडावें म्हणून तो प्रयत्न करूं लागतो. एक घाव कीं दोन तुकडे या रीतीनें न्याय देऊन माणुसकीचे तुकडे करूं पहाणारा हा समाज केव्हां स्वतःची चूक समजून सुधारणा करील कोण जाणें! गुन्ह्यावर योग्य उपाय म्हणजे गुन्हेगारांचें अन्तःकरण जागृत करणें. हें झटदिशीं होणारें काम नव्हे. त्याला अवधि लागेल व धीर धरून शांतपणें तें व्यवस्थित करावें लागेल. पण पश्चात्तापाच्या मार्गें सजा देण्याचा प्रयत्न करणें व त्या मार्गानेंच गुन्ह्यावर योग्य ती उपाययोजना करणें हीं कामें अत्यंत महत्त्वाचीं आहेत यांत शंका नाहीं.

श्री. दादासाहेबांनीं या सर्व प्रकरणांत जरूर तेवढें कोर्टदरबारांतील कायद्यांचें साहाय्य घेतलें आहे. पण त्यांची मुख्य मदार, ज्याला सामान्य माणसें प्रभूचा दरबार म्हणतात, त्या दरबारावरच आहे. म्हणून ज्या कैद्याची फांशीची शिक्षा निश्चित झाली त्याच्या बाबतींत आतां कांहीं कर-ण्याचें उरलें नाहीं म्हणून ते हात धुवून टाकीत नाहींत. पण अशा दुर्दैवी कैद्यांच्या अन्तःकरणांतील ईश्वराला ते जागें करून, पश्चात्तापाच्या मंगल स्नानानें त्या जीवाला पावन करूं पहातात. प्रभूच्या दरबारांत न्यायासना-समोर उभे राहतां यावें म्हणून ते अशा कैद्यांच्या मनाची तयारी करितात. एखाद्या बंदी बंधूची मुक्तता करावी किंवा शिक्षा कमी करावी म्हणून प्रयत्न करण्यांत त्यांना तितकें महत्त्व वाटत नाहीं. पण अशा दुर्दैवी कैद्यानें कळत नकळत तोल सुटून एखादें दुष्कृत्य केलें तर खुल्या दिलानें त्याला त्याचा पश्चात्ताप अनुभवतां यावा आणि अशा रीतीनें माणुसकीची ओळख पटून जें चार दिवस उरलें आयुष्य तें त्यानें अशा मनःपवित्र वातावरणांत घालवावें म्हणून ते प्रयत्न करितात. त्यांत त्यांना एक प्रकारची सार्थकता वाटते. सत्यतत्त्वांचा स्वीकार केल्यानंतर गुन्हेगाराला त्याचेंच मन जी सजा देते त्यापुढें कोर्टानें शिक्षा दिली अगर न दिली याचें महत्त्व उरत नाहीं. साधु मांत्रिकाच्या विरुद्ध पुरावा होऊन त्याचा गुन्हा शाबीद होऊं शकला नाहीं म्हणून तेथून तो सुटला. पण त्यानें एका मानवबंधूसमोर सत्य हकीकत सांगतांच त्याला पश्चात्तापाच्या आगींत तापून शुद्ध होण्याची सजा

सुरू झाली. कोर्टाची शिक्षा भोगवल्याला आली, आणि ती भोगून सुटका झाली अगर ती न भोगतां, कांहीं अकल्पित घटना घडून त्याची मुक्तता झाली, एवढ्यानें खरें कार्य होत नाहीं. पश्चात्तापाच्या आगींत तापून सुलाखून शुद्ध होण्याची आत्मशक्ति गुन्हेगार म्हटल्या जाणाऱ्या लोकांच्या हृदयांतहि आहे आणि ती शक्ति जागृत करून तिला कामाला लावतां येणें शक्य आहे ही गोष्ट या सर्व कथानकावरून दृष्टोत्पत्तीस येते. अशा या आत्मशक्तीचा शोध ही कांहीं लहानसहान गोष्ट नव्हे.

फांशीची सजा कायम झालीच तर नंतर मनःस्वास्थ्य न ढळूं देतां फांशी कैदी त्या शिक्षेतून शांतपणें पार पडतो यांत आश्चर्य तें काय? सत्यव्रताचा स्वीकार केला कीं पश्चात्तापाची खाई फुलूं लागते, आत्मा त्यांत भाजून तापून शुद्ध होतो आणि असें झाल्यानंतर मृत्यूचें भय तें कसलें? या पुस्तकाच्या दुसऱ्या भागांतील चारहि गोष्टींत आपणांस हें दिसून येतें. महमद मुसा, शिवराम, सोमा आणि शहाजादा या चौघांनीं मृत्यूवर जय मिळविला. त्या दिव्यांत त्यांना झालेल्या पश्चात्तापाचा कांहीं कमी हिस्सा नाहीं. स्वतः आप्तेष्ट बनून पुढें त्यांच्या मदतीस येणाऱ्या श्री. दादासाहेबांचा हिस्साहि कांहीं कमी नाहीं. फांसावर लटकणारा पांचवा कदी हा प्रेमी आहे हाहि केवळ योगायोग एवढेंच नाहीं. एकानें पत्नीचा खून केलेला, तिघांनीं आपल्या परींचे खून केले व पांचव्यानें आपल्या प्रियेच्या पतीचा खून केला. कामविकार हा वाममार्गाकडे सहज खेंचूं शकतो. पण हा त्या शक्तीचा उसळून येणारा लाव्हा रस आहे. आणि तो रस शुद्ध होऊन सन्मार्गाकडे वळविला तर त्याला जिंकण्याच्या दृष्टीनें अशक्य तें काय? स्वतःच्या देहावर आणि परस्त्रीच्या देहावर ममत्व असणारा सोमा अखेर "हा देह म्हणजे तर केवळ खोका" असें म्हणतो ही कांहीं कमी महत्त्वाची गोष्ट आहे का? पुढें विक्राळ स्वरूप धारण करून उभा टाकलेला यमदेव! त्याचा प्रभावहि न जुमानतां तसाच जबरदस्त गोसावीबुवा ओंकाराचा जप करीत ज्या रीतीनें फांसावर चढून जातो, तें पाहिलें म्हणजे वाटतें कीं, मृत्यूचें दर्शन होतांच माणसाच्या अंतःकरणांतील आध्यात्मिक शक्ति स्फुरण पावते व क्षणार्धांत ती प्रगट होऊन सर्व मन भारून टाकतें. "माणसाच्या

मनोरचनेंत असें कोणतें तत्त्व ईश्वरानें राखून ठेवलें असेल कीं मृत्यु समोर आलेला पाहातांच त्याच्याशीं सामना करण्याचें तत्त्वज्ञान निमिषार्धांत तें आत्मसात् करून टाकतें ?" म्हणून लेखक विचारतो. आणखी एका ठिकाणीं लेखकानें अनुमान काढलें आहे तें असें : "कदाचित् स्वतःच्या मरणाची तीव्रता पटूं लागतांच माणसाची दृष्टि आध्यात्मिक होऊन एक प्रकारचे स्थितप्रज्ञतेचे पाठच तें मन घेत असावें."

मानवाच्या तत्त्वज्ञानाचें मूळ 'मृत्यू टळत नाहीं' हा सिद्धांत गळीं कसा उतरवावा—अगर दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हटलें तर 'अमर कसें व्हावें'—याच्या शोधांत आहे. भागवतांतील कथानक काय ? परीक्षिताला सातव्या दिवशीं सर्पदंश होऊन त्याचा प्राण जावयाचा हें निश्चित झालें तेव्हां त्या सात दिवसांच्या अवधींत परीक्षित राजा अशा कांहीं तत्त्वज्ञानाच्या चर्चेत गढून गेला आहे कीं अखेर त्याला चावणारा सर्प हा त्याच्या देहाचाच काय तो अंत घडवून आणूं शकतो. नचिकेताच्या बापानें त्याला मृत्यूच्या हवालीं करतांच त्यानें अन्नपाणी वर्ज केलें. यमाच्या घराच्या उंबरठ्यावर तीन दिवस नचिकेता पडून राहिला. आणि तेथें त्याला श्रेय कोणतें व प्रेय कोणतें याचें ज्ञान प्राप्त झालें. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे मृत्यू समोर उभा ठाकला आहे याचें भान झालें कीं देहरूपानें जगण्याचें प्रेम नाहींसें होऊन अखेर आत्मरूपानें अमरस्थितींत जगावें अशी श्रेयस्वरूप भावना स्फुरूं लागते व एक प्रकारच्या नवीन तत्त्वज्ञानाचे बोधपाठच जणूं माणसाचें मन त्यावेळीं घेऊं लागतें. आत्मज्ञान जागृत करणारी मृत्यूसारखी बोधप्रद शक्ति इतर कुणी नाहीं. "वक्ता चास्य त्वादृगन्यो न लभ्यः" (या तत्त्वाचा तूंचिरे एक वक्ता.)

निरक्षर आणि अडाणी अशा दिसणाऱ्या कैद्यांच्या ठायीं अखेरच्या घडीला हें तत्त्वज्ञान अगर अध्यात्मिक बळ कोठून येतें ? लेखक साहजिकच अगदीं समर्पक प्रश्न टाकतो. "यांना खरोखर अशिक्षित कसें म्हणतां येईल. आचार्य आनंद शंकरभाई म्हणत असत कीं यांना तुम्ही निरक्षर म्हणा पण संस्कृतिहीन म्हणून मात्र कधीं संबोधूं नका. शिकल्यासवरल्या लोकांमध्यें दिसून येत नाहींत असे सुंदर संस्कार या अशिक्षितांच्या ठायीं अगदीं

सहज आणि स्पष्ट दिसतात. मोती जेणा दादासाहेबांच्या सान्निध्यांत तुरुंगांत होता. त्या प्रसंगीं त्याच्या अंगचे अनेक गुण मीं अगदीं जवळून पाहिले. तो अप्रसिद्ध म्हणून वाटल्यास तो अगदीं लहान माणूस असें म्हणावें पण गुणांचें मूल्यमापन करायचें म्हटलें तर त्याला मी मोठा माणूस असेंच म्हणेन." व साहजिकच लेखक पुढें म्हणतो, "भारतीय संस्कृतीचें प्रतीक म्हणून या देशांत लाखो लोक असे पडले आहेत; आणि आज जर आपली संस्कृति टिकून राहिली असेल तर अशा प्रकारचे लहान-सहान समजले जाणारे लोक आपल्या देशांत असंख्य आहेत यामुळेंच होय. त्यायोगानेंच आपण जगांत एक विशिष्ट लोक म्हणून जगूं शकलों आहोंत असें म्हणण्यांत अतिशयोक्ति नाहीं."

येरवड्याच्या तुरुंगांत गांधीजींच्याबरोबर त्यांची साथीदार मंडळी प्रथम-प्रथम प्रार्थनेस बसत असत. पुढें ही मंडळी येण्याचें बंद झालें. तेव्हां प्रार्थनेच्या वेळीं "मी एकटाच असलों तर मला कसें वाटेल आणि कदाचित् माझ्या मनाला पण वाईट वाटेल" या भावनेनें गंगाप्पा नांवाचा वॉर्डर कैदी तेथें गुपचुप येऊन बसे; व माझ्या प्रार्थनेंत भाग घेई." गंगाप्पाच्या गुणा-विषयीं लिहितांना गांधीजी लिहितात: "ज्या माणसांत इतकें उच्च चारित्र्य असल्याचें प्रगट करण्याची अशी गूढ शक्ति आहे अशाहि माणसाला समाज शिक्षा करतो आणि सरकार तुरुंगांत डांबून टाकतें याचा मला अचंबा वाटतो. गंगाप्पा निरक्षर आहे. तो राजद्वारीं कैदी नाहीं. खून किंवा असा कांहींतरी भयंकर गुन्हा करून तो तुरुंगांत आला आहे." (येरवड्याचे अनुभव)

गुन्हेगाराकडे समाज कोणत्या दृष्टीनीं पाहतो; व कोर्टकचेऱ्यांत वकील न्यायाधीश त्याच्याकडे पाहतांना कोणता चष्मा वापरतात आणि त्याबरोबरच तुरुंगांत निकटचा सहवास आल्यानें स्थितप्रज्ञ अगर समदर्शी राष्ट्रपुरुषांना हे कैदी जवळून कसे वेगळे दिसतात हा प्रश्न आमच्या मनाला विचार करावयास लावल्याखेरीज राहात नाहीं.

तुरुंगाच्या विश्वांत सांपडलेल्या कैद्यांच्या मनाचा काटा सत्याकडे कसा स्वाभाविक झुकतो, पश्चात्तापाच्या मार्गानें आत्मशुद्धि करून दाखविण्याची

त्यांच्या मनाची जी तयारी असते आणि त्याबरोबरच फांशीची सजा झाली तर मृत्यूवर जय मिळविण्याची आध्यात्मिक शक्ति प्रगट करण्याची त्यांची तत्परता, आणि एकंदरींत या लोकांच्या जीवनांत जे संस्कार दिसून येतात त्यावरून या सर्व प्रासंगिक कैद्यांना "मानवतेचे पाझर" हें नांव दिलें तें सार्थ होय असेंच कुणीहि म्हणेल.

मानवतेचे हे झरे संतत वहातील; तुरुंगाच्या आवारांतच ते लुप्त होऊन जाणार नाहींत याबद्दल समाजानें आस्थापूर्वक खबरदारी घेतली पाहिजे व तुरुंगाकडे पहाण्याच्या दृष्टींत सत्वर बदल केला पाहिजे. गुन्हेगार म्हणजे मानसिक रोगी व त्या दृष्टीनें त्यांना रोगमुक्त करून स्वतःच्या पायावर उभे राहतां येईल अशी समाजानें व्यवस्था केली पाहिजे.

या बाबतींत मि. सॅम्युअल बटलर यांच्या अध्यक्षतेखालीं नेमलेल्या लेबर ऑफिस कमेटीच्या अहवालाला बर्नार्ड शॉनें प्रस्तावना लिहिली आहे त्यांत, तसेंच इकडे महात्माजींनीं दिग्दर्शन केलें आहे त्यांत, मनन करण्याजोगें पुष्कळच आहे. 'येरवड्याचे अनुभव' (पा. ५५–५६) या पुस्तकांत गांधीजी लिहितात, "तुरुंगांत मानवी परिश्रमाची अगदीं उधळपट्टी चाललेली आहे. फक्त पैसा आणि इतर साधनसामुग्री यांत मात्र अत्यंत काटकसर केली जाते. दवाखान्यांतील प्रकार याच्या अगदीं उलट. तरीपण या दोन्ही संस्था माणसाच्या व्याधी दूर करण्यासाठींच असतात. एका संस्थेंत मानसिक आधींवर उपचार करण्यांत येतात व दुसरींत शारीरिक व्याधींवर इलाज करतात. मानसिक व्यथेला अपराध म्हणतात व म्हणून त्यावर शिक्षेचा तोडगा निश्चित केलेला असतो. शारीरिक व्याधि निसर्गाचे नियम भंग केल्यामुळें झालेली शिक्षा म्हणून त्याबाबत विशेष काळजी घ्यावी असें समाजास वाटतें. वास्तविक असा भेदभाव करण्याचें कांहींच कारण नाहीं. शारीरिक व्याधींवर जरा काळजीपूर्वक आणि सौम्य उपाय करण्यांत येतात याचें कारण बहुधा समाजांतील श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या वर्गांचेच लोक कनिष्ठ म्हटल्या जाणाऱ्या वर्गांतील लोकांपेक्षां बऱ्याच मोठ्या प्रमाणांत निसर्गाचे नियम मोडून आजारी पडतात हें असावें. या वरिष्ठ लोकांना स्वतःला सामान्य चोऱ्या कराव्या लागत नाहींत आणि सामान्य चोऱ्या

चालू राहिल्या तर त्याची झळ या लोकांना विशेष लागते म्हणून, व स्वतःच समाजासाठीं कायदे घडविणारे असे हे लोक असल्यानें, त्यांनीं सामान्य चोरीसाठीं अशा शिक्षा सांगितल्या आहेत. क्षणोक्षणीं त्यांना ही जाणीव असतेच कीं त्यांचीं स्वतःचीं कृत्यें अशा प्रकारचीं असतात त्यापुढें चोऱ्या म्हणजे कांहींच नव्हत. तरीपण त्यांच्याविषयीं कुणी ब्र काढीत नाहींत. खरें पाहतां हीं कृत्यें सामान्य चोऱ्या वगैरेपेक्षांहि समाजाची जास्त हानि करतात!

त्याबरोबर हेंहि म्हटलें पाहिजे कीं, तुरुंग काय अगर दवाखाने काय, या दोहींच्या संख्या समाजांत वाढत आहेत याचें कारण तेथें रोगांचें निदानच चुकीचें असतें. दवाखान्यांची संख्या वाढते याला कारण तेथें आजारी लोकांना लाडावून ठेवण्यांत येतें म्हणून आणि तुरुंग दिवसेंदिवस वाढतात याचें कारण समाजाला कैदीलोक कधींहि सुधारतील असें मुदलांतच वाटत नाहीं हें होय. तुरुंगांतून बाहेर पडणारा कैदी आणि दवाखान्यांतून बाहेर येणारा रोगी हे दोघेहि शरीरानें आणि मनानें आरोग्याचे शुद्ध नियम पालन करणारे प्रचारक म्हणून बाहेर पडले पाहिजेत.

( ३ )

या पुस्तकांत वर्णिलेले सारे प्रसंग खरे आहेत. कसलाहि रंग भरल्या-खेरीजच्या या कथा. भाषाशैलींत वकीलाची विवेचक बुद्धि आहे त्याबरोबर अनुकंपा वाटल्यानें विव्हळ होणाऱ्या हृदयाचें स्फुंदनहि आहे. बारीकसारीक मुद्दे व्यवस्थितपणें मांडण्याची वकीली दृष्टि असल्यानें "गुरुमहाराज" बाजीची सविस्तर चर्चा पण यांत आलेली आहे, तर कुठें बुद्धिवैभवानें दिपलेला मनुष्य ज्या रीतीनें कांहीं प्रसंगाचें वर्णन करणार नाहीं त्या रीतीचा अवलंब केलेलाहि यांत आढळेल (उ. मणीची कैफियत). सत्य हकीगत हुडकून काढण्याच्या प्रयत्नांत लेखकाबरोबर जणूं आपण वाचकहि गुंग झालों आहोंत असें वाचतांना वाटूं लागतें. लिखाणांत नीटनेटकेपणा साधण्यासाठीं मुद्दाम प्रयत्न केल्याचें आढळत नाहीं. पण "शहाजादाचें प्रेम" हें "तर नुसते खोगीर" "मोती जेणा" "बिचारी आई" "ब्रह्मानंद बुवा" इत्यादि गोष्टी लघुकथेच्या सदरांत तंतोतंत बसतील अशा आहेत. कांहीं

ठिकाणीं एखादा प्रसंग अल्प वर्णिलेला असल्यानें त्याची द्विरुक्ति पण झाली आहे. पण या सर्व उणीवा दुसऱ्या आवृत्तींत दूर करतां येतील. शेवटच्या दोन गोष्टी ' मृत्यूवर विजय ' या खंडांत न घालतां "सत्याची प्रतीति" या नव्या खंडांत समाविष्ट करणें अधिक योग्य होईल.

महमद मुसाच्या कथेंत थोडें आत्मनिवेदन पण आलें आहे. या असल्या कथानकांत आत्मनिवेदन थोड्या फार अंशानें सर्वत्र आढळतें आणि तें अनिवार्य होय. महमदाला मृत्यूसमोर उभा करीत असतांना स्वतःला वाटणाऱ्या दांभिकवृत्तीचें समर्थन करण्याचा नैसर्गिक प्रयत्न हें एक खरोखरी मोठें सहृदय आणि मनोवेधक प्रकरण आहे. व्यवहारज्ञ महापुरुष या नात्यानें श्री. दादासाहेबांच्या जीवनांत समाजांतील वेगवेगळीं जीवनाचीं कोडीं सोडविण्याचे अनेक प्रसंग आले असतील. उपवासप्रकरणाबाबत त्यांनीं काढलेली तोड हा एक त्यांचे प्रयत्न कोणत्या प्रकारचे असतात याचा सुंदर नमुना आहे. मोती जेणा हा जणूं मानलेला भाऊच अशा नात्यानें त्याच्याशीं त्यांची वागणूक आहे. मोतीविषयीं हा भ्रातृभाव एक प्रकारचा शुद्ध पूजाभाव असाच आहे. गोसाव्याला फांशी देण्याचा दिवस उजाडतो त्या दिवशीं सकाळीं भल्या पहांटे दादासाहेब त्याच्या खोलीवर जाऊन गीताध्याय पाठ म्हणतात. त्यावेळच्या त्यांच्या मर्तीवर एक डोळा आणि दिल्लींतील लोकसभेंत अध्यक्ष म्हणून विराजणाऱ्या त्यांच्या मूर्तीवर दुसरा डोळा अशा दोन डोळ्यांना दिसणाऱ्या दादासाहेबांच्या या दोन मूर्ती म्हणजे खरोखरीच किती सुभगदर्शनाचा प्रत्यक्ष साक्षात्कार !

गोष्टी सांगण्यांत दादासाहेब अगदीं पोक्त वयोवृद्ध अधिकारी आहेत. कित्येक वर्षांपूर्वी घडलेले प्रसंग अगदीं जसेच्या तसे वर्णन करण्यांत त्यांचा अगदीं हातखंडा आहे. असे अनुभव ते किती रसाळ वर्णन करून बिनचूक सांगतात याचा अनुभव त्यांच्या परिचयांत आलेल्या मंडळींना आहेच. विनोदवृत्ति पण मधून मधून डोकावते आणि दृष्टींतील चमक पण नजरेंत भरते. भगवें जाऊन त्या ठिकाणीं कैद्याचे साधे कपडे अंगावर चढले त्याप्रसंगीं ब्रह्मानंदबुवांनीं तीन बोटें दाखविलीं त्या सर्वांचें वर्णन वाचलें म्हणजे याची प्रतीति येईल.

डोळे असतील तर उघड्या डोळ्यांना मनुष्य कसा मानवतेनें भरलेला आहे याचें मंगल दर्शन प्राप्त करून देणारें अशा प्रकारचें हें साहित्य आपल्या भाषेचें एक अमोल धन आहे.

आपल्या या भागांत स्व. मेघाणींनीं "तुरुंगाच्या दारांतून" आणि "मानवतेचे दीप" या प्रकारचें साहित्य निर्माण करून साहित्याला एक प्रकारचें गौरवाचें स्थान प्राप्त करून दिलें आहे. या दिशेनें पुस्तकरूपानें अशीं वेगवेगळीं वाङ्मयरत्नें भाषासरस्वतीला अर्पण होत आहेत हें खरोखरी मोठें सद्भाग्य. आम्हां लोकांना मोठे अनुभवदक्ष म्हणण्यांत येते. मोठमोठे वकील, डॉक्टर, उद्योगपति, व्यापारी, शिक्षक, समाज-सेवक इत्यादि मंडळींनीं आपापले विशिष्ट अनुभव लिहून जीवनरहस्याच्या एकेक कोपऱ्यावर प्रकाश फेंकला तर या स्वानुभवाच्या प्रसंगांचें वर्णन, हें आपल्या भाषेला एक सुंदर साहित्याचें लेणें लाभेल यांत शंका नाहीं. लांबलचक लिहिण्याची संवय (अगर व्यसन) नसेल तर असे अनुभव लिहून काढण्याचा जरा कंटाळा येईल हें खरें; पण वेगवेगळ्या प्रसंगांवरच्या लिखाणाचें स्वरूपच असें आहे कीं, त्याला साजेशी भाषा आपोआप येते आणि लिहिण्याची शैली पण सहज साधते. ते प्रसंगच जणूं आपल्याला हवासा भाषेचा घाट आणि वर्णनाचा थाट घडवून आणतात.

श्री. दादासाहेबांच्याकडून असेंच अमोल साहित्य आपणाला प्राप्त होईल अशी आपणा सर्वांना आशा आहे. मृत्यूच्या दारांत उभ्या असणाऱ्या मंडळीवर प्रेम करणारी आणि या दुदवी बंधूंचें प्रेम संपादन करणारी श्री. दादासाहेबांची मूर्ति या पुस्तकद्वारां सर्वांना जरूर प्रेरणा देत राहील.

अहमदाबाद
१७–१२–१९५१

उमाशंकर जोशी

# महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

## ★ प्रकाशन ★

सौ. मालतीबाई दांडेकर

१ कथामालती २-०
२ विद्युत्‌रेखा १-१२
३ तेजस्विनी ५-०
४ अमोल आहेर ३-४
५ उद्यांची कन्या ३-०
६ कृष्णरजनी ५-०
७ लोकसाहित्याचें लेणें ६-०
८ कन्येस प्रेम भेट १-४
९ मातृमंदिर [छापत आहे]

वि. ज. सहस्रबुद्धे

१० पद्यमीमांसा १-८
११ दुहिता २-०

व्यं. रा. खंडाळीकर

१२ आघाडीवर २-०

गणपतराव बोडस

१३ झांशीची राणी १-८

कु. प्रेमा कंटक

१४ अग्नियान ३-०

श्री. रा. पोतनीस

१५ महागाई कां ? १-८

यदुनाथ थत्ते

१६ जीवनधर्म १-४

आय्. सी. शेख

१७ पाकिस्तानची छाया २-८

ना. ल. व्हटकर

१८ अपराधी २-०

१९ गांधीवाद : समाजवाद ३-०

माधवराव बागल

२० कला आणि कलावंत ३-०
भाग २ रा

वि. अ. कुलकर्णी, एम्. ए.

२१ मराठी काव्यसमीक्षा ६-०

सौ. मालतीबाई चोळकर

२२ चित्रलेखा ३-८

टॉलस्टॉय

२३ सैतान २-०

डॉ. अष्टपुत्रे

२४ चारुमित्रा २-४

भाऊ धर्माधिकारी

२५ बदला वळी ३-०

खलील जिब्रान

२६ मानवतेचे राखणदार २-८
( बंडखोर आत्मे )

२७ सलमा २-८

सरदार प्रतापसिंग

२८ जोहार २-८

के. रा. पालकर

२९ शाळा व शारीरिक शिक्षण २-०

काका कालेलकर

३० जीवन संस्कृति १-२

अप्पासाहेब पटवर्धन

**३१ सेवाधर्म** २– ०

के. पंडित मुंडले

**३२ कार्ल मार्क्स व त्याचें कार्य** २– ०

दादासाहेब मावळंकर

**३३ कांहीं पाऊलें** २– ८

महात्मा गांधी

**३४ विद्यार्थ्यांशीं हितगूज** २– ०

**३५ स्त्रियांशीं हितगूज** २– ८

पं. जवाहरलाल नेहरू

**३६ आव्हान** १– ८

ग. आ. लाड

**३७ ग्रामराज्य** २– ०

भारतन् कुमारप्पा

**३८ पुंजीवाद, समाजवाद कीं ग्रामवाद?** ५– ०

नाणावटी आणि अंजेरिया

अनु. मो. स. श्रीखंडे

**३९ हिंदी ग्रामीण जीवनाचा प्रश्न** ७– ०

स्वयंसेवक

**४० समाजमनाचा ध्येयतारा** ५– ०

आॅर्थर कोसलर

अनु. वसंतराव नारगोळकर

**४१ भरदुपारच्या अंधारांत** ६– ०

आपटे गुरुजी

**४२ भारताचा लाडका मुलगा** १– ८

रफ प्रत १– ०

डॉ. सुमति क्षेत्रमाडे

**४३ आधार** ४– ८

**४४ प्रतिपदा** २– ८

रणजित देसाई

**४५ रूपमहाल** २– ८

## आमचे सण

| | |
|---|---|
| **१ गुढी पाडवा** | ०– ८ |
| **२ वसंत गौरी** | ०– ४ |
| **३ सती सावित्री** | ०–१० |
| **४ नागपंचमी** | ०– ६ |
| **५ हरितालिका** | ०– ८ |
| **६ मंगलमूर्ति** | ०– ८ |
| **७ सोन्याचा दसरा** | ०– ५ |
| **८ तिळगूळ घ्या गोड बोला** | ०– ५ |
| **९ महाशिवरात्र** | ०– ५ |
| **१० होळी** | ०– ५ |
| **११ नाताळ** | ०– ८ |

## इतर बालवाङ्मय

| | |
|---|---|
| **१ आमचे गांधीजी** | ०– ८ |
| **२ फुलराणी** | ०– ५ |
| **३ गुलाबकळी** | ०– ५ |
| **४ राया** अथवा **बालमूर्तिकार** | ०–७ |
| **५ पुण्यश्लोका कस्तुरबा** | ०–१० |
| **६ माझें पुस्तक** | ०– ८ |
| **७ सृष्टीचा संदेश** | ०–१२ |